'हे आत्मन ! तू आपले यथार्थ दर्शन घडव'

९ सप्टेंबर १९६७
चाळीस पैसे

# माणूस



सचित्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : पंधरावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशाची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

स. न. ऑगस्ट, ३१

आपल्या दि. २–९–६७ च्या अंकात पहिल्याच पानावर श्री. यशवंत अभ्यंकर, कुर्ला–यांनी लिहिलेले पत्र आपण छापले आहे. पत्र वाचून धक्काच बसला व आश्चर्य पण वाटले. त्या पत्रात माझा उल्लेख डोंबवली नगरपालिकेचे एक जनसंघीय सभासद श्री. बाबाराजे हे केवळ अध्यक्षपद मिळाले नाही म्हणून पक्षांतर करते झाले. असा आहे. आपल्याला मी कळवू इच्छितो की, मी जनसंघाचा सभासद केव्हाही झालेलो नाही व नव्हतो. डोंबिवली नगरपालिकेच्या निवडणुकीत मी एक स्वतंत्र उमेदवार म्हणून उभा होतो व जनसंघाने मला या निवडणुकीत पाठिंबा दिला होता. तसे पत्रकही माझेजवळ आहे. याचा अर्थ, मी जनसंघीय आहे असा कोणीतरी श्री. अभ्यंकर यांचा गैरसमज करून दिलेला दिसतो. आणि मी अध्यक्षपदासाठी पक्ष बदलला हे तर त्याहूनही खोटे आहे. मी पहिल्यापासून कॉंग्रेसच्याच मतप्रणालीचा आहे आणि आता तर कॉंग्रेसचा चार आणे सभासदही आहे. मी पक्षांतर केले हा चुकीचा समज आहे. तसेच जनसंघाचे उमेदवार पक्ष बदलणारच नाहीत, असे मात्र म्हणता येणार नाही. **बाबाराजे** (द. वि. राजे)

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच, असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

# सत्तास्पर्धा कोणत्या थराला पोचणार ?

उत्तर प्रदेशातील पेचप्रसंग, तात्पुरता का होईना, मिटतो न मिटतो तोच आत बिहारमधील संयुक्त विधायक दलाच्या मंत्रिमंडळाला फाटाफुटीचे हादरे बसू लागले आहेत. उत्तर प्रदेशातील संयुक्त विधायक दलामध्येही अंतर्गत मतभेद इतके विकोपाला गेले की, शेवटी चरणसिंगांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याची तयारी केली. परंतु चरणसिंगांनी जर खरोखरच राजीनामा दिला तर हाती आलेली अर्धीमुर्धी सत्ताही आपल्या हाती राहणार नाही, याची संयुक्त दलात समाविष्ट झालेल्या अन्य राजकीय पक्षांना जाणीव झाल्यामुळे आपण राजीनामा देऊ नका, अशी त्यांनी चरणसिंगांना विनंती केली व हा पेचप्रसंग मिटलेला आहे. परंतु तो पुन्हा उद्भवणार नाही अशी खात्री देता येत नाही. कारण चंद्रभानु गुप्ता यांना खुर्चीवरून खाली खेचण्याच्या निमित्ताने एकत्र झालेल्या या पक्षोपपक्षांत इतकी मतभिन्नता आहे की, कोणतेही एक धोरण अवलंबणे चरणबाबूंना सर्वस्वी अशक्य झाले व अशा अगतिक अवस्थेत त्यांनी राजीनाम्याची धमकी दिली. उर्दू भाषेला राज्यकारभारात सहभाषेचे स्थान द्यावे किंवा नाही याबाबत संयुक्त विधायक दलात सहभागी झालेल्या पक्षांत एकमत होणे कधीही शक्य नाही. वस्तुतः हा भाषाविषयक प्रश्न व्यावहारिक पातळीवरून सोडविणे आवश्यक होते. परंतु हा साधासुधा प्रश्नही आपल्या तीस-चाळीस वर्षांतील राजकारणामुळे कमालीचा अवघड होऊन बसला आहे. उर्दू भाषा ही उत्तर प्रदेशांतील बऱ्याच मोठ्या नागरिकांची व्यवहार-भाषा असेल तर तिला राज्यकारभारात सहा भाषेचा दर्जा मिळवयास काहीच हरकत नाही. परंतु उर्दू भाषेच्या निमित्ताने मुसलमान समाज जर आपल्या अस्तित्वाची आणि स्पष्ट बोलावयाचे तर वेगळेपणाची जाणीव करून देत असेल तर ती मागणी मान्य करणे अनुचित होईल. जनसंघ उर्दू भाषेला विरोध करीत आहे तो याच भूमिकेवरून व संयुक्त समाजवादी किंवा कम्युनिस्ट उदारमतवादाच्या पायघोळ आवरणाखाली उर्दू भाषेचा पुरस्कार करीत आहेत तोही मुस्लिम नागरिकांना खूष करण्याच्या

उद्देशानेच. अशा तऱ्हेने हा प्रश्न केवळ भाषिक स्वरूपाचा न राहता त्याला जातीय स्वरूप आलेले आहे.

उत्तर प्रदेशातील राजकारणाचे हे धक्के बिहारपर्यंत पोचले नसले तरच नवल! तेथेही आता फाटाफुटीच्या कारवाया सुरू झाल्या असून रांची येथील निदर्शनांच्या निमित्ताने आतापर्यंत पडद्याआड सुरू असलेल्या मांडणांना आता उघड स्वरूप प्राप्त झाले आहे. बिहारमध्ये संयुक्त समाजवादी पक्षाच्या सदस्यांनीच याबाबत बंडाचा झेंडा हाती धरला असून विधानसभेची बैठक सुरू होण्यापूर्वी या फुटीर गटाची समजावणी करण्याच्या कार्यात यश आले नाही तर महामायाप्रसाद सिंहा यांच्या मंत्रिमंडळावर राजीनामा देण्याची पाळी येईल अशी परिस्थिती आहे. सध्या संयुक्त समाजवादी पक्षाला लढाऊ वृत्तीची ऊर्मी आली असून हा पक्ष आपल्या मूळ प्रतिज्ञेचा विचार न करता या लढाऊ कृतीसाठी कम्युनिस्टांशी सख्य करीत आहे. संयुक्त समाजवादी पक्षाच्या या वाटचालीला पक्षातील एका गटात विरोध असून कम्युनिस्टांसारख्या राष्ट्रद्रोही पक्षाशी हातमिळवणी करता कामा नये, असा त्यांचा आग्रह आहे.

## एकजुटीचा केवळ देखावा

परंतु हा ध्येयवादाचा विचार करण्याचा आता कोणत्याच पक्षाला अधिकार उरलेला नाही. कारण वैचारिक शुद्धतेच्या भूमिकेवरून राजकारण हाताळण्याची आज तरी कोणत्याच पक्षाची तयारी नाही. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेसला मतदारांनी धूळ चारल्यामुळे कॉंग्रेसेतर पक्षांना अपेक्षेपेक्षा अधिक जागा मिळाल्या व सत्ता राबविण्यासाठी या घटनेचा फायदा घेण्याच्या हेतूने प्रत्येक राज्यात डाव्या कम्युनिस्टांपासून स्वतंत्र पक्षापर्यंत भिन्न भिन्न विचारसरणीचे पक्ष एकत्र आले. प्रारंभीच्या काळात किमान कार्यक्रमाच्या देखाव्याखाली 'एकजुटीचा पुकारा करण्यात आला. परंतु प्रत्यक्ष राज्यकारभार करताना ही एकजूट टिकविणे कोणालाच जमू शकले नाही आणि जसजसे दिवस जात आहेत तसतशी फूट वाढतच चालली आहे. प्रत्येक पक्ष आपले घोडे कसे पुढे दामटले जाईल या विचारात गर्क झाला असून मतदारांचे भले आपणच काय ते तेवढे करू शकतो हे सिद्ध करण्याची स्पर्धा चालू झाली आहे.

शिवाय या एकजुटीचे स्वरूपही पूर्णतया प्रादेशिक आहे. प्रत्येक राज्यातील राजकारण तेथील स्थानिक परिस्थितीनुसार आकार घेत आहे. याबाबतीत कॉंग्रेस पक्ष आणि इतर पक्ष यांची पातळी एकच आहे. ज्याप्रमाणे बंगालमधील किंवा पंजाबमधील कॉंग्रेस कार्यकर्ते कामराजांचा आदेश धुडकावून देऊन गमावलेली सत्ता परत मिळविण्यासाठी अनेक युक्तायुक्त मार्ग वापरीत आहेत; तसेच इतर पक्षांशी सत्तेची भागीदारी करताना संयुक्त समाजवादी, प्रजासमाजवादी, जनसंघ, स्वतंत्र आदी पक्षांनीही राष्ट्रीय धोरण आखण्याऐवजी प्रादेशिक शाखांनाच सर्वाधिकार

दिल्याचे दृश्य दिसत आहे. बंगालमध्ये डाव्या कम्युनिस्टांशी सहकार्य करण्याचे तेथील संयुक्त समाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प्रथम ठरविले व त्यावर केंद्रीय कार्यकारणीला अगतिकतेने शिक्कामोर्तब करावे लागले. नक्षलबारीसारख्या घटना झाल्यानंतर आपल्या पक्षाची बंगालमधील अब्रू टिकविण्यासाठी या पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना किती श्रम पडले हा इतिहास काही जुना झालेला नाही.

म्हणजेच सत्तास्पर्धेबरोबर राजकीय धोरणाचेही विकेंद्रीकरण होऊ लागले असून पक्षांतर्गत फुटीर वृत्ती वाढीस लागली आहे. महाराष्ट्र आणि म्हैसूर यांच्यांतील सीमावादाचे उदाहरण घेतले असता ही गोष्ट स्पष्ट होऊ शकेल. या सीमावादाबाबत केवळ महाराष्ट्रीय आणि म्हैसूरी कॉंग्रेस कार्यकर्त्यांतच मतभेद आहेत असे नसून कम्युनिस्टांपासून प्रजासमाजवादी पक्षापर्यंत सर्वच पक्ष महाराष्ट्र आणि म्हैसूर अशा दोन गटांत विभागले गेलेले आहेत. पाचवा पोलाद कारखाना कोठे असावा याबद्दल वाद चालू असताना आंध्रमधील सर्वच पक्षांनी तो कारखाना विशाखापट्टण येथे उभारला जावा यासाठी प्रखर आंदोलन केल्याची घटनाही ताजी आहे. कृष्णा-गोदावरी या नद्यांच्या पाणी वाटपाबाबत केवळ नाईक-निजलिंगप्पा आणि रेड्डी यांच्यांतच मतभेद आहेत असे नसून इतर सर्व पक्षही प्रादेशिक तत्त्वावर विभागले गेलेले आहेत.

## विधायक कार्याकडे दुर्लक्ष

अशा रीतीने प्रत्येक राज्याचे राजकारण वेगळे होऊ लागले असून संसदेतील कामकाज सोडले तर भारतीय राजकारण नावाची वस्तू अस्तित्वात राहते की नाही, अशी भीती वाटू लागते. गेल्या वीस वर्षांतील वाटचालीनंतर भारताच्या एकात्मतेला जे तडे जात आहेत ते पाहिल्यानंतर स्वातंत्र्य लढ्याच्या निमित्ताने निर्माण झालेली राष्ट्रीय जाणीव स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कितपत टिकणार आहे, अशी शंका वाटू लागते. प्रथमच सर्व राजकीय पक्षांतील जनसेवेची भावना लुप्त झालेली आहे. निवडणूक लढविण्यासाठी विशिष्ट चिन्ह घेतलेला उमेदवार म्हणजे विशिष्ट राजकीय पक्ष एवढे ढोबळ समीकरण सोडले तर जनतेच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेले प्रश्न सोडविण्यासाठी कोणता पक्ष किती विधायक कार्य करीत आहे याचा आढावा घेण्याचा जर कोणी प्रयत्न करील तर त्याच्या पदरी निराशा पडल्यावाचून राहणार नाही. संसदीय कामकाजाबरोबर विधायक कामकाजाची म्हणून काही एक बाजू असते, याचे कोणत्याच राजकीय पक्षाला भान राहिलेले दिसत नाही. कुटुंबनियोजनाचा साधा प्रश्न घेऊ. देशातील वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी काही तरी परिणामकारक मार्ग योजावयास हवेत, याबद्दल दुमत होण्याचे कारण नाही. या कार्याबाबत विशेष जागृती करण्याची आवश्यकता आहे ती ग्रामीण भागात. परंतु एक सरकारी प्रचारक सोडले तर कोणत्याही राजकीय पक्षाने आपले कार्यकर्ते धाडून ग्रामीण जनतेला या प्रश्नाची नीट माहिती समजावून

दिली आहे असे घडलेले नाही. आणि सरकारी प्रचाराचा दर्जा काय असतो हे आपणा सर्वांना माहीत आहे. कामगारांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून देणाऱ्या राजकीय पक्षांनी या कामगारांमधील अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला आहे काय ? हा प्रश्न या संदर्भात विचारण्यासारखा आहे. कामगारांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी यासाठी राजकीय पक्षांमार्फत शिबिरे चालविण्यात आल्याची बातमी कधी कोणी वाचली आहे काय ? उलट कामगार वर्ग किती बेजबाबदार होईल याचीच समाजवादाचा उद्घोष करणारे डावे पक्ष चिंता वाहत आहेत. प्लॅटफॉर्मवर गाडी उशीरा लागली एवढ्या क्षुल्लक कारणासाठी हातात दगड घेण्याला कामगारांना प्रवृत्त करण्यातच राजकीय कार्यकर्त्यांची शक्ती वापरली जात आहे. परंतु या फत्तरबाजीने रेल्वेची म्हणजेच पर्यायाने नागरिकांच्या राष्ट्रीय संपत्तीची हानी होत आहे हे सांगण्याचा विवेक कोणी दाखवीत आहे का ?

लोकांच्या असंतोषावर आपली सत्ताबाजीची भूक शमवून घेण्याची ही प्रवृत्ती दृढमूल झाली की, मग जो पक्ष ही भूक शमवू शकतो तिकडे पक्ष कार्यकर्त्यांनी आपली दिशा वळवावी हे घडणे क्रमप्राप्तच आहे. अर्थात हाती आलेली सत्ता टिकविण्यासाठी या तंत्राचा प्रथम काँग्रेसनेच अवलंब केला ही गोष्ट खोटी नव्हे ! परंतु काँग्रेसच्या नावाने खडे फोडणारे इतर पक्षही हेच तंत्र अवलंबतात तेव्हा त्याना काँग्रेसच्या नावाने बोटे मोडण्याचा कोणता अधिकार उरतो, एवढाच प्रश्न शिल्लक उरतो. उत्तर प्रदेशात काय किंवा बिहारमध्ये काय संयुक्त विधायक दलाला सध्या जे हादरे बसू लागले आहेत त्यामागे तात्त्विक मतभेदांचे यत्किंचितही कारण नसून पक्षनेत्यांनी सोयीस्करपणे अवलंबिलेली सत्ताबाजीची प्रवृत्ती हेच मूळ कारण आहे. पंजाब-हरियानामध्ये असंतुष्टांना मंत्रिपदे देऊन हा विरोध शमविण्याचा प्रयत्न करण्यात आला. उद्या चरणसिंगांना किंवा महामायाप्रसाद सिंहांना हाच प्रयत्न करून पाहावा लागणार आहे.

काँग्रेसपेक्षा अधिक काटकसरीने व अधिक निस्पृहपणे कारभार करू अशी मतदारांना आश्वासने देऊन सत्ताधिष्ठित झालेल्या या पक्षांनी आपण आपल्या निवडणूकपूर्व आश्वासनांना गेल्या सहा महिन्यांत कितपत जागलो आहोत याचा विचार करून त्याबाबतचे आपले प्रामाणिक आत्मनिरीक्षण मतदारांपुढे सादर करण्याचे धैर्य दाखवावे. त्यांनी तसे केले तरच संयुक्त दलातील असंतुष्टांना फोडण्याच्या काँग्रेसच्या कारवायांबद्दल निषेधाचा शब्द उच्चारण्याचा त्यांना अधिकार राहील. एरव्ही कृष्णवल्लभ सहाय आणि महामायाप्रसाद सिंहा यांच्यांत फरक आहे असे मानण्याचे मतदारांना कारण उरणार नाही.

सदाशिव पेठकर

# मुक्ताफळे



## □ शस्त्र म्हणजे काय ?

भारताचे जिगरदोस्त कोसिजीन यांनी पाकिस्तानला हेलिकॉप्टर विकली. म्हणजे मागितली डॉ. चंद्रशेखरनी आणि मिळाली अयुबखानला. आम्ही म्हणतो काही बिघडले नाही. पाकिस्तान हे काही आपल्याला परके थोडेच आहे ? भारताची फाळणी झाली असे लोक समजतात. नकाशा नीट पाहिलात तर भारताने पाकिस्तानची फाळणी केलेली आहे, असे दिसून येईल. पश्चिम पाकिस्तानातून पूर्व पाकिस्तानात जायला अयुबखानांना विपुल हेलिकॉप्टर विमाने लागणार हे उघड आहे.

राज्यसभेत कुणीतरी छागलाजींना विचारले– " रशियाने पाकिस्तानला कॉप्टर विमाने विकली आहेत याचा निषेध भारत सरकार करणार आहे काय ? "

छागलाजींनी ताडकन सांगितले– " निषेध कशाबद्दल बुवा ? हेलिकॉप्टर विमान ही काही शस्त्रे नव्हेत ! उद्या तुम्ही जीपगाड्या, मोटारी, ट्रक यांनादेखील शस्त्रे म्हणाल ! "

छागलाजींचे हे तेजस्वी उद्गार ऐकताच प्रश्न विचारणारा गप्प झाला. वस्तरा हे शस्त्र आहे काय ? समजा, जो न्हावी नाही किंवा ज्याला स्वतःची दाढीही करायची नाही, अशा माणसाने वस्तरा हस्तगत केला तर लगेच काही ते शस्त्र होत नाही ! आता तो माणूस ज्या अर्थी जरुरी नसून वस्तरा मिळवतो, तो काही बटाटे चिरायला खास नाही, व कदाचित तो कुणाची मान कापू शकेलही. परंतु म्हणून काय वस्तरा शस्त्र झाले की काय ? कसायाच्या हातातला सुरा हे काही शस्त्र नाही. तो त्याचा धंदाच आहे.

मागील युद्धात लष्करी मोक्याच्या डोंगर–दऱ्यांतील जागा जर्मनांनी कॉप्टर विमाने वापरून हां हां म्हणता कबजात घेतल्या. पण 'हाजीपीर'सारख्या मोक्याच्या जागा आपण स्वतःच खाली केल्यानंतर, आता या कॉप्टर विमानांचा पाकिस्तानला उपयोग काय ? रसद पोचविणे, टेहळणी करणे, दूरदूरच्या लष्करी

चौक्यांशी संपर्क ठेवणे अशा गोष्टींसाठी मुख्यतः कॉप्टर विमाने लागतात. जो आक्रमक असतो त्यालाच ही तयारी करावी लागते. जेवढी ज़ास्त कॉप्टर विमाने पाकिस्तान खरेदी करील तेवढा तोच आक्रमक आहे ही गोष्ट जगाच्या लक्षात येईल. त्यांचे लष्करी बळ वाढले तरी आपले नैतिक बळ कित्ती कित्ती वाढेल !

शिवाय कोसिजीन साहेबांच्या कृपेने 'ताश्कंद' झाल्यानंतर आपण कोसिजीन साहेबाचा निषेध करणे योग्य होईल काय ? पाकिस्तान अमेरिकेच्या कच्छपी लागू नये म्हणून कोसिजीन साहेबांनी मुद्दामच हा डाव टाकलेला असेल ! अयुबखानला कोसिजीनने बनवले आहे, शस्त्रे म्हणून दिली त्याला कॉप्टर विमाने. तो खुळाही फसला !

समजा, हेलिकॉप्टर शस्त्र असले, तरी या देशातली माणसे अजून शस्त्र ओळखू शकतात याचे आम्हांला दुःख आहे. साबुदाण्याच्या खिरीसारखी पांढरीशुभ्र, खादीधारी, अहिंसक माणसे गेली चाळीस वर्षे भारताचे नेतृत्व करीत असताना अजून जनतेला शस्त्रे ओळखू यावीत हीच आम्हांला शोकांतिका वाटते.

इंदिराजींनी परवा दिल्लीच्या सभेत सांगितले– "अहिंसेवर दृढ विश्वास ठेवून ताठ मानेने आपण चालले पाहिजे !" कदाचित धडामासून मान वेगळी होईल. परंतु महत्त्वाची आहे ती अहिंसा ! जगात मरेनात का बाकीचे देश. पाकिस्तान हेलिकॉप्टर घेऊ दे नाहीतर चीनला अणुबॉम्ब फोडू दे. आपल्या लोकसभेत आणि राज्यसभेत असल्या हिंसक चर्चा तावडतोब बंद होणे अगत्याचे आहे. भारताच्या बंदरांची धान्य उतरवून घेण्याची शक्ती गेल्या वर्षात दुप्पट झाली आहे, आणि ती तिप्पट कशी होईल याचा आपण अधिक विचार करा. भारताला एवढा मोठा किनारा असताना फुटाफुटांवर धान्य उतरवणे सहज शक्य आहे. जगातला हा एकमेव अहिंसक देश उपाशी राहू नये, म्हणून मुंबई ते कन्याकुमारी व कन्याकुमारी ते कलकत्ता या सर्व किनाऱ्यावर हिंसक देशांतून धान्याच्या भरभरून बोटी येऊन थडकत आहेत आणि फुटाफुटांवर धान्यासाठी लोकांच्या रांगा लागल्या आहेत हे दृश्य लवकरच साकार कसे होईल याचा लोकसभेत अधिक विचार झाला पाहिजे, असे आम्हांस वाटते. कारण, तांदूळ हे शस्त्र नाही; गहू हे पण शस्त्र नाही !

## ☐ व्हायव्हा उर्दू ! !

"जगात खंड किती ?" हा प्रश्न भूगोलाचे मास्तर पूर्वी माझ्यासारख्या शेंबड्या पोरांना सारखा विचारीत असत आणि बाहीला मधून मधून नाक पुशीत (रुमालाचा शोध हा अलीकडला आहे. तोडलेल्या बाहीलाच रुमाल म्हणतात.) पोरं सांगत असत,– "मास्तर आशिया खंड, मास्तर युरोप खंड..........." पोरांनी कधीही ध्यानात न बाळगलेले ऑस्ट्रेलिया खंड स्वतः सांगून मास्तर हा 'खंडोगणती' प्रश्न समाप्त करीत असत ! हल्ली जो प्रश्न विचारला जात असला

पाहिजे तो म्हणजे– "जगात खांडं किती ?" दुसऱ्या महायुद्धानंतर देशाच्या फाळण्या होऊन इतक्या देशांची खांडोळी झाली आहेत की, विचारू नका. इतिहासात नवी खांडं झाली की नवा भूगोल होतो.

सुपारीचे खांड आपल्या देशात लोकमान्यांपर्यंत सर्वांना सारखेच प्रिय असले तरी देशांची झालेली खांडं सगळ्यांनाच सगळी आवडतात असे नाही. पाकिस्तानचा बाप महंमद अल्ली जिना हा ज्या समाजवादी काँग्रेसजनांना थोर पुरुष वाटतो, त्यांनाच व्हिएटनामची फाळणी करू पाहणारा जॉन्सनसाहेब खलपुरुष वाटतो. जॉन्सन ज्यांना खलपुरुष वाटतो त्या लालभाईला बर्लिनची फाळणी करून बसलेला पोसिजीन युगपुरुष वाटतो. पॅलेस्टाईनला पाठिंबा देणारा जनसंघीय नासरला दुष्ट समजतो; परंतु अखंड भारताचा अखंड आग्रह सोडत नाही. फाळणीमुळे देशाचे अनहित होते असे समजल्यानंतरही जगातल्या कोरिया, अरबस्थान इथल्या फाळण्या मजबूत करायला इंदिराजींच्या भारताच्या सैनिकांचा उत्साह अमाप असतो. यामुळे होते काय आपले सैनिक दोन्हीकडून मरतात. परवा अरब–इस्रायल युद्धात मोशे दायान याने आपल्या सैनिकावर चुकून हल्ला केला की मुद्दाम केला हे अजून नक्की ठरलेले नसले, तरी आपले सैनिक मेले हे नक्की झालेले आहे. भीमसेन साचार यांच्या सुपुत्राला ज्यूंनी 'वीरमरण' दिले म्हणून त्यांना कुठले चक्र द्यावे, याचा विचार केंद्रीय मंत्रिमंडळ करू लागले, तोच विजय साचार हे अरबांनी पेरलेलाच सुरुंग उडून मेल्याचे वृत्त आले. आता अरबांनीच मारलेल्या साचार पुत्राला 'चक्र' दिले तर नासर नाही का– रागवणार ? केवढे दुष्टचक्र हे !

आतापर्यंत आयर्लंड, भारत, कोरिया, व्हाईटनाम, जर्मनी या काही जन्मजात दुबळ्या व काही कर्मजात दुबळ्या देशांची खांडं करून बडे देश गंमत पाहत होते. परंतु आता फाळणीचे खंड बड्याबड्या घरांत चवळायला सुरवात झाली असून 'पोकळवासे' हलू लागले आहेत.

कॅनडा देशाचा नवा भूगोल करू पाहणाऱ्याला 'द गोल' याला म्हणूनच पंतप्रधान पिअर्सनसाहेब यांनी कॅनडातून हाकलून दिले. कॅनडाचा दौरा अर्धवट टाकून द गोल पळाले. हा मनुष्य पळण्यात फार पटाईत आहे. दुसऱ्या महायुद्धात जर्मन सैन्य फ्रान्समध्ये शिरल्याबरोबर हा पळाला. परंतु एकदा पळून जाऊन पुनः सन्मानाने हा परत येतो हा मोठाच धोका आहे !

अमेरिकेचा शोध लागल्याबरोबर ब्रिटिश व फ्रेंच लोक त्या देशात गेले. इंग्लिश लोक पुढच्या दाराने आले आणि फ्रेंच लोक मागच्या दाराने आले. फ्रेंचांनी कॅनडात वस्ती केली. इंग्लिश पूर्वेच्या वॉशिंग्टनला उतरले तर फ्रेंच पश्चिमेस क्विबेक बंदरात उतरले. डॉ. चंद्रशेखर यांना लोकसंख्येची वाढ ज्या पद्धतीने मंजूर नाही त्या पद्धतीने 'फ्रेंच' वाढले. परंतु ब्रिटिशांनी जशी भारतातून फ्रेंचांची सत्ता उलथवली, तशी कॅनडातूनही उलथवली व कॅनडा राणीच्या राज्यात दाखल झाला. सात वर्षे हे

युद्ध झाले. परंतु कॅनडात फ्रेंच आपले नुसते संख्येने वाढतच होते. राज्य करायचे नसले, की लोकांना दुसरा उद्योग तरी काय ?

इकडे फ्रान्समध्ये नेपोलियन बादशहा झाला. अमेरिका स्वतंत्र झाली. नेपोलियनला वाटले की कॅनडात इतके फ्रेंच लोक झाले आहेत. पण इतक्या लांबवर आपण राज्य करणार कसे ? त्याने कॅनडा विकून टाकला, जसे आपण पाकिस्तान विकले. फक्त देश विकून नेपोलियनला २,७२,६७,६२२ इतके डॉलर मिळाले ! आपल्याच देशाची विक्री करायची ? काय हा अधःपात ! आपण पाकिस्तान विकले नाही, सालंकृत कन्यादान केले ! ५५ कोटी हुंडा दिला. जाऊ द्या !

नेपोलियन श्रीमंत झाला. फ्रान्समध्ये राजवाडे निर्माण झाले. 'एफेल टॉवर' झाला. मजा मजा उडाली. बिचाऱ्याला काय कल्पना की पुढे लोकशाही येणार आहे ! लोकशाही म्हणजे संख्याशाही ! १० मूर्ख माणसे ही एका शहाण्या माणसाहून श्रेष्ठ, ५० आंधळे १ डोळाधाऱ्याहून डोळस, १०० मुके १ वक्त्याहून परिणामकारक, २०० लंगडे १ धावणाऱ्या माणसाहून पटाईत. ३०० आळशी १ काम करणाऱ्या माणसाहून कामसू. कारण सगळे मतदार.

धर्मांतरानंतर जसे राष्ट्रांतर होतेच होते, त्याचप्रमाणे राष्ट्रांतरानंतर गंडातर येतेच येते ! ही फ्रेंच माणसे गेली शंभर वर्षे मतदार निर्माण करीत होती. त्यांनी एकदम लोकशाहीविष्ठित मागणी केली– "आम्हांला स्वतंत्र राज्य हवे !" (व्हायव्हा क्विबेक लिबरे !)

कॅनडा सरकारने इंग्लिश भाषेतून सर्व शिक्षण सक्तीचे केले. परंतु फ्रेंच पाद्री लोकांनी या शाळांवर बहिष्कार घालायला लोकांना सांगितले. फ्रेंच चर्चमधून फ्रेंच भाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळा त्यांनी काढल्या. या फ्रेंचांना ब्रिटिशधार्जिणा कानडा आपला वाटावा म्हणून, 'युनिअन जॅक'सारखे दिसणारे आपले राष्ट्रीय निशाण कॅनडा सरकारने बदलले. त्यावर मॅपल वृक्षाचे पान काढले. परंतु कॅनडा सरकारने असे पान मांडले तरी फ्रेंच काही पानावर धडपणे बसले नाहीत. हेच आम्हांला आवडत नाही. ते जास्ती तिखट आहे. हे किती खारट आहे ! खोडचाळ कुठले !

फ्रान्सचा नवा लोकशाही अविष्ठित बादशहा, शहेनशहा द गोल हे कॅनडाला शाही भेट देण्यासाठी नुकतेच आले. कॅनडातील मॉंट्रीअल शहरात त्यांच्या स्वागताला जमलेल्या असंख्य फ्रेंच लोकांनी प्रचंड गर्जना केली–" व्हायव्हा क्विबेक लिबरे !" क्षण दोन क्षण द गोल यांच्या नजरेसमोर पृथ्वीचा गोल फिरला. जुना इतिहास त्यांना आठवला. आणि त्यांनी प्रतिसाद दिला– " स्वतंत्र क्विबेक अमर रहे !"

झाले ! पिअर्सनसाहेब दचकले. या बॉम्ब स्फोटाने हादरले. त्यांनी जाहीर केले– " द गोल यांनी असे म्हणायला नको होते. हे अलायनमेंट झाले. फ्रान्सने भारतासारखी नॉन–अलायनमेंट पाळायला हवी होती !"

[पान ६४ वर चालू]

## ☐ दुष्काळग्रस्तांना खरी मदत कोणती ?

बिहारमधील दुष्काळग्रस्तांना साहाय्य करण्यासाठी ज्याप्रमाणे निरनिराळ्या प्रांतांतले भारतीय धावले आहेत त्याप्रमाणे परदेशी आबालवृद्धही आले आहेत. अशी एक इंग्रज वृद्धा सौ. जिल् बक्स्टन हिचे 'दुष्काळग्रस्तांना खरी मदत कोणती ?' या विषयावरचे विचार मननीय आहेत. बिहारमधील दुष्काळपिडित जनतेला स्वतःच्या पायांवर उभे राहण्यास मदत करण्यासाठी अन्न, वस्त्र, औषधे इत्यादी सर्व गोष्टींची जरुरी आहे; पण केवळ त्यांचे जीवन नव्हे तर त्यांचा स्वाभिमान वाचविणे ही आजच्या घटकेची सर्वांत मोठी आवश्यकता आहे. पुष्कळशा साहाय्य-संस्था सद्हेतूने तात्पुरती मदत पुरविण्यावर अवास्तव मेहनत व पैसा खर्च करीत आहेत. पण अखेर या तात्पुरत्या मदतीचा परिणाम शेतकऱ्यांची स्वावलंबनाची इच्छा खच्ची करण्यात होतो. निसर्गाच्या प्रकोपाचे निवारण करण्याच्या सदिच्छेने सरकारने व बऱ्याच खाजगी साहाय्य-संस्थांनी फुकट अन्न आणि वस्त्र वाटले आहे व इतरही बऱ्याच मार्गांनी शेतकऱ्यांना मदत केली आहे. पण बऱ्याच ठिकाणी याचा परिणाम असा झाला आहे की, दुष्काळाचे व रोगराईचे संकट जसजसे दूर जाऊ लागले आहे तसतसे शेतकरी कारण नसतानाही हात पसरायला व निरनिराळ्या मागण्या करायला उद्युक्त झाले आहेत.

पोलंड आणि तुर्कस्तानात निर्वासितांच्या मदतीचे कार्य करताना बक्स्टन बाईंना दिसून आले की मदत-कार्यात एक वेळ अशी येते की त्या वेळी एकतर्फी मदतीची उपयुक्तता संपून स्वावलंबनाची कल्पना रुजवावी लागते. "योग्य वेळी प्रोत्साहन दिले तर सर्व लोक स्वावलंबी व्हायला उत्सुक असतात. उलट अयोग्य वेळी त्यांचे लाड केले तर त्याचा परिणाम चांगला व्हायच्याऐवजी अनिष्ट होतो."

मदत-कार्य करणारी मंडळी कशी आहेत ?

बक्स्टन बाईंचे उत्तर : तरुण भारतीय स्वयंसेवकांनी फारच प्रशंसनीय कार्य केले आहे. या मंडळींत आणखी प्रशिक्षित शेतकी-तज्ज्ञ असते व वयाने मो चा मंडळींनीही "मातीत हात घालायची" तयारी दाखविली असती तर खूपच अधिक कार्य होऊ शकले असते. साठ वर्षांची ही वृद्धा म्हणते : "माझ्या वयाची खूपच माणसे स्वस्थ बसून राहिली आहेत."


बिहारमध्ये तरुण स्वयंसेवकांनी केलेल्या कार्याची प्रशंसा आणखी एकाने नुकतीच केली व तो म्हणजे जॉन्सन नावाच्या परदेशी स्वयंसेवक. तो म्हणतो : बिहारमध्ये मदतकार्य करीत असताना आपण काही तरी महत्त्वाचे कार्य करीत असल्याचे समाधान मला लाभले. या कार्यात गुंतलेली तरुण मंडळी एक मोलाचा धडा शिकली व तो म्हणजे खेड्यापाड्यांत स्वाभाविकपणे पसरलेले नैराश्य दूर करून त्यांच्या अंगी अडचणी व गलथानपणा नष्ट करण्याची ईर्षा कशी निर्माण करावी, या कामात येथल्या तरुणांनी आम्हा परकीयांची अपेक्षा होती त्यापेक्षा अधिक हुशारी दाखविली. एका खेड्यात संप, आंतरजातीय बेबनाव आणि भुरट्या चोऱ्या यांची बजबजपुरी माजली होती, पण महिन्याच्या आत भारतीय विद्यार्थ्यांनी त्या खेड्याचे शांततेच्या नमुनेदार स्थानात रूपांतर केले. पाचशे माणसे अंगमेहनतीच्या कार्यांना लावली. या विद्यार्थ्यांनी खायला घातलेल्या व कामाला लावलेल्या हजारो दुष्काळग्रस्तांचा विचार केला तर त्यांचे हे कार्य जगभर गाजावे इतके मोलाचे वाटते.

## □ व्यावसायिक एकतेची आवश्यकता

जपानमधील एक अग्रगण्य कामगार-कार्यकर्ते फुमिहिको ताकारागी यांनी भारताला नुकतीच चौदावी भेट दिली तेव्हा ते म्हणाले, जपानमध्येच नव्हे तर या भूभागातील इतर देशांतही व्यावसायिक एकतेची फार आवश्यकता आहे. तांत्रिक प्रगती, आत येणाऱ्या परदेशी भांडवलाचा वाढता प्रवाह, उद्योगधंद्यांचे एकत्रीकरण करण्याची वाढती प्रवृत्ती आणि त्यामुळे भांडवलांचे वाढते एकत्रीकरण, या कारणांमुळे जपानमध्ये व्यावसायिक एकता अनिवार्य झाली आहे. " आम्हांला एकजूट केली पाहिजे, नाही तर आम्ही कामकऱ्यांच्या हक्कांचे नीट रक्षण करू शकणार नाही. "

जपानमध्ये " सोहियो " आणि " डॉमी " या दोन मध्यवर्ती कामगार संघटना आहेत. सोहियोची सभासद-संख्या ४२ लाखांच्या वर आहे तर डॉमीची १८ लाख आहे. पूर्वी डॉमी सोहियोत अंतर्भूत होती, पण आठ वर्षांपूर्वी अमेरिका व जपान यांच्यांत झालेल्या लष्करी कराराच्या बाबतीत मतभेद होऊन काही कामगार-संघटना फुटून निघाल्या व त्यांनी डॉमीची स्थापना केली. मात्र आता कामगारांनी राजकारणाशी संबंध सोडण्याचा काळ आला आहे. " आता जपानी कामगारांना राजकीय वादात न शिरता केवळ संघटित व्यवसायाच्या तत्त्वाची कास धरण्याची इच्छा आहे. त्यांना आता राजकीय पक्षांचे–विशेषत: साम्यवाद्यांचे–वर्चस्व नाहीसे करायचे आहे. इतर बऱ्याच आशियाई देशांतही – उदाहरणार्थ, फिलिपाइन्स, इंडोनेशिया, भारत–व्यावसायिक एकतेची ही चळवळ चालू आहे.

O



# इर्शाद पंजतन आणि झरीन इंजिनिअर

शेजारच्या छायाचित्रातल्या माणसाला तुम्ही कुठं पाहिले आहे काय ? त्याचे तोंड पांढरे आहे आणि त्याच्या अंगावरच्या वेषामुळे तो एखाद्या इस्पितळातल्या पेशंटसारखा वाटतो आहे किंवा त्याचा सगळा अवतार मिळून तो एखाद्या सर्कसमधल्या विदूषकाच्या नात्यातला दिसतो आहे. हा माणूस तुमच्या अगदी जवळच्या परिचयातला आहे. तुम्ही त्याला जाणता, इतकेच नव्हे तर तोही तुम्हांला जाणतो. रोज तो तुम्हांला भेटतो. नव्हे, तो तुमच्याबरोबर आणि तुमच्यातच एकसारखा असतो. भेट क्वचित होत असेल, साहजिक आहे. अगदी आपल्या आणि आपल्यातल्या या माणसालाही भेटण्याला आपल्या पोटार्थी धावपळीच्या जिण्यात सवड होत नाही. आपल्यात असूनही याची आपली दिवसचे दिवस गाठ असते पण भेट मात्र नसते.

## रातराणी

तुम्हांला उगीच जास्त कोड्यात टाकत नाही. हा आपल्यातल्या अगदी आतल्या आतल्या आपला समूर्त प्रतिनिधी. म्हणजे साक्षात आपणच. बाहेरचे आपण दिवस-भर, अष्टौप्रहर बडबडत असतो. जागेपणीच तर काय, झोपेतदेखील बडबडतो. हा मात्र अगदी सशासारखा मुका. बाह्यत: आपण अनेक बढाया मारतो, केल्या न केल्या (बहुधा न केल्याच) पराक्रमांची रसभरित वर्णने कुणाकुणाला ऐकवून स्वत:ची स्वत:च पाठ थोपटून घेतो. हा अगदी बुजरा–भित्रा–जगाच्या पसाऱ्यात गांगरलेला, हास्यास्पद, एकाच वेळी रडणाऱ्या आणि हसणाऱ्या चेहऱ्याचा. आपल्या दृष्टीने आपण व्यवहारात भलतेच हुशार किंवा व्यवहार न पाहणारे भाबडे संत. हा व्यवहार जमवण्याच्या अखंडित आणि याच्या परी चतुर प्रयत्नांत व्यवहारातल लाभ सदा हुकवून हात हलवीत आणि मनगटे चावीत उरणारा. नाव : काही नाही

# दोन कलाकारांचे शब्दातीत नाट्य

किंवा हवे तर कुठलेही चालूनले. हवे तर आपलेच.

सोबतच्या छायाचित्रात याच्या शेजारी आहे ती खुबसूरत, यौवनसंपन्न आणि दहा–बारा वर्षांच्या पोरीसारख्या आविर्भावाची. ती याच्या स्वप्नजीवनात सदा विहर-णारी, याला जागोजाग भेटणारी, भुलवणारी आणि ऐनरंगात याच्या हातून निसटणारी बालिश, लाडिक, मोहक, दाहक, सदा अप्राप्य अशी परी.

छायाचित्रात ही दोघे मोठाल्या कचेऱ्यांच्या जंगलाच्या आसमंतातल्या एका सार्वजनिक उद्यानात दोनप्रहरी भेटली आहेत. उद्यानात कितीही माणसे असेनात का, या दोघांपुरती एकटी दोघेच त्या उद्यानात आहत. 'तो' आहे एक कारकून आणि 'ती' कुणी चटपटीत स्टेनो. आणि 'तो' 'ति'ला आपल्या लंच–बॉक्स-मधले पदार्थ आग्रहाने 'ऑफर' करतो आहे नि 'ती' नको नको म्हणते आहे.

तुम्ही म्हणाल, कुठे आहे लंचबॉक्स ? त्याने तर नुसतेच हात पुढे धरले आहेत

— — — —

विजय तेंडुलकर

— — — —

आणि कारकून आहे तर पँट, शर्ट कुठे आहे ? बरे, स्टेनो असेल तर तिचा पोषाख हा असा कसा ? उद्यान कुठे आहे ?

मी म्हटलेच की, ही बाह्यतः दिसणारी माणसे नव्हेत. माणसांच्या अगदी आतली–आतली ही त्यांची रूपे आहेत. जनसामान्यांची ही हळवी, मावडी, चतुर होण्याची धडपड करणारी, बुजरी, गोंधळलेली, लोभस प्रतीके आहेत. म्हणूनच त्यांना माणसांच्या बाह्य चेहऱ्यांसारखे एकेक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असणारे भारदस्त प्रौढ चेहरे नाहीत. बाह्य जीवनातले शक्य ते सर्व तपशील अगदी शब्ददेखील त्यांनी टाकले आहेत आणि लंचबॉक्सऐवजी उरले आहे केवळ जवळचे काहीतरी आवडते ' ऑफर ' करण्यातले उत्कट अगत्य आणि ते नको नको असे वरपांगी म्हणून हवे असे दर्शविणारा लटका तोरा. यापुढची पायरी म्हणजे देऊ केलेले प्रथम मर्यादेने, मग मोकळेपणाने, नंतर एका हक्काने घेणे आणि अजाणतेपणीच, सगळे संपवून सगळे दिलेल्याला वर अंगठा दाखवून अखेर तोऱ्याने निघून जाणे. केलेल्या ' त्यागा 'च्या बदल्यात काही बेभान क्षण आणि अंती एक दारुण निराशा हा देणाऱ्याचा लाभ ! हे सर्व शब्दांशिवाय, शक्य तेवढे बाह्य तपशीलाशिवाय–फक्त शारीरिक हालचालींतून आविर्भावातून लहान पोरापासून प्रौढ पंडितांपर्यंत सर्वांस कळेल, हसवील असे. भाषेचा अडसर नाही. स्थळकाळाची दृढ बंधने नाहीत. जातजमात, धर्म-संस्कृतीची मर्यादा नाही. हे काहीतरी वैश्विक म्हणावे असे.

या नाटचप्रकाराला ' माइम ' (mime) असे म्हणतात. वर्णन केला हा अशा एका प्रयोगातला केवळ मासला. मी पाहिलेल्या प्रयोगात याहून उजवे आणि डावे असे अनेक मासले छायाचित्रातल्या दोन चिरंतन रूपांमागे स्वतःला दडविलेल्या इर्शाद पंजतन आणि कुमारी झरीन इंजीनियर यांनी आमच्यापुढे एका संध्याकाळी सादर केले. सुमारे दीड पावणेदोन तासांत आमच्या दैनंदिन परिचयाच्याच अनेक दृश्यांची, प्रसंगांची ही अशी बाह्य तपशिलाआतली मुग्ध करणारी, हसविणारी, थरारून टाकणारी आणि ओझरते गहिवरविणारी रूपे त्यांनी आम्हांला दाखवली आणि आमच्यातल्या रंजनोत्सुकांचे भरपूर रंजन केले, तर त्याहून अधिक काही मागणाऱ्यांना आंतरिक मानवी जीवनाची एक काव्यात्म, करुणरम्य आणि कलात्मक झलक दाखविली.

उदाहरणार्थ, इर्शाद यांनी एकट्यानेच विनपडद्याच्या प्रकाशित रंगमंचावर रस्सीशिवाय आणि ती खेचणाऱ्या प्रतिस्पर्ध्यांशिवाय दाखविलेली रस्सीखेचच घ्या. यातला हास्यास्पद अवताराचा पांढऱ्या तोंडाचा ' हीरो ' प्रथम ' मैदाना 'त उतरला तो केवढ्या सराईत रुबाबाने ! जणू हा ' उस्ताद ' रोज रस्सीखेच करीत असतो आणि जिंकणे हा तर याच्या हातचा मळ. अनेक प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध बेटा एकटा, याला–त्याला डोळा घालीत, हाताला माती घासून उभा राहिला. आणि जोर एवढा लावला की, वहाव्वा रे पठ्ठे ! हा निघाला रस्सी आपल्या बाजूला

खेचत, अगदी इंच इंच लढवीत विजयाकडे. पण हाय ! पारडे फिरले. याचा 'राक्षसी' दम फारच लौकर आटोपला आणि हा रस्सीसकट गेला फरकटत, भेलकांडत पार रंगमंचापलीकडे.

आता यात रस्सीशिवाय हुबेहूब रस्सीखेच–अगदी तिच्यातली खेचदेखील, नसलेली रस्सी साक्षात भासावी इतकी अस्सल–हे प्रकरण विनोदी होते. ही खेच करताना 'हिरो'च्या 'प्रचंड' फाटक्या शरीराच्या स्नायू न स्नायूच्या चाललेल्या डौलदार आणि शिस्तशीर हालचाली नजर बांधून टाकण्याइतक्या सुंदर आणि वर आश्चर्यजनक होत्या. आणि या रस्सीखेचीचा झालेला शेवट आम्हांला अगदी आमचाच वाटला. आम्ही नाही का एकेकदा फार भावात जाऊन अखेर बाराच्या भावात निघत ? अशा वेळी आम्ही इतरांना कसे दिसत असू याचेच जणू सारी कटुता आणि शब्द वगैरे अनावश्यक तपशील काढून घेतलेले एक हास्योत्पादक, लोभसवाणे चित्र इर्शाद पंजतननी आमच्यासमोर उभे केले. आम्ही हसलो. पण मारलेल्या टाळ्या ही 'ओळख' पटल्याची पावती होती.

त्यांनी आणखी जुगाऱ्याचा एक याच वळणाचा 'खेळ' रंगमंचावरून दाखवला. आरंभी 'हिरो'चा हाच सराईत रुबाब. मग प्रत्यक्ष खेळ रंगमंचावर नसलेल्या खुर्चीत बैठक, नसलेले पत्ते पिसणे, वाटणे, हातात नसलेली पाने हुशारीने आणि सावधगिरीने न्याहळणे, नसलेल्या प्रतिस्पर्ध्यांकडे शोधक कटाक्ष, जवळ नसलेले पैसे, मग सोन्याची बटने, नंतर मनगटी घड्याळ असे एकेक नसलेलेच साक्षात आहेच असे इरेस टाकून हरणे, वाढती अस्वस्थता, खोटे हास्य, अखेर 'खिसे उलटे'! अवस्था, येथवर रस्सीखेचीचाच प्रकार. पण सबूर! यापुढे 'हिरो'ने हताशपणे, नसलेल्या खिशातून नसलेले पिस्तूल काढले आणि ते स्वतःच्या मस्तकावर दाबून धरले–वस्स ! एकच शेवट : आत्महत्या ! पण अजून सबूर ! निमिषात त्याची वाकडी, रडवी, हताश मुद्रा बदलली. तो एकदम हुशारला, नजर चमकू लागली, मुद्रेवर विजयी हास्य विलसले. त्याने आत्महत्येसाठी स्वतःवर रोखलेले पिस्तूल इतरांवर रोखले होते आणि आविर्भावाने तो सांगत होता, जवळचे असेल तेही प्रत्येकाने निमूट काढून ठेवा ! चलो ! त्याने सगळे भराभर गोळा केले– हरलेले, जिंकलेले, आणि गडी हरणासारखा उड्या मारीत झाला पशार !

इथेही आम्ही भरपूर हसलो आणि चिकार टाळ्या हाणल्या. शक्तीत उणा पण बुद्धीत चढ असा हा संधिसाधू 'बुद्धिजीवी' हिरो कोण, सांगा ! आम्हीच की !

कु. झरीन इंजिनिअरनी (या प्राध्यापिका आहेत !) रंगमंचावर आमच्या स्वप्नजीवनातली चटचटीत यौवनाची, बालबुद्धी पण लुब्ध पुरुषाच्या हमखास शेवटी 'मामा' करून जाणारी चिरंतन 'परी' अनेक 'खेळां'त समूर्त आणि निःशब्दतेच्या नाट्यपूर्ण भाषेने बोलकी केली. परंतु शेवटी 'शृंगार' या खेळात

स्वतःवर निहायत खूष असलेली एकांतातली शृंगारमग्न खरीखुरी उच्चवर्गीय स्त्री रंगमंचावर अगणित बारकाव्यांनिशी दाखवून पदोपदी खुणेच्या कडाडून टाळ्या घेतल्या त्या इर्शाद पंजतननी. आपल्या जून, केसाळ, आटीव, पुरुषी देहाने आणि मर्कटसदृश चेहऱ्याने हा कलावंत कोणत्याही साधनाविना, रंग किंवा वेषभूषेविना पाहता पाहता प्रत्येक स्त्रीच्या अंतरंगातली रूपगर्विता बनला. त्याने लांबसडक रेशमी केशकलाप शास्त्रशुद्ध विंचरला, गुंतवळ बोटाभोवती गोळा करून वयाचे नकोसे भान दाखविणाऱ्या आविर्भावाने अल्लद बाहेर फेकली, केशभूषा केली, आकडे खोवले, थुंकी लावून बटांना वळणे दिली, लिपस्टिक लावली, इतके कशाला, अगदी पद्धतशीर निऱ्याबिऱ्या काढून साडी गुंडाळली आणि एकेक पायाने तिच्या भुईवर लोळणाऱ्या घेरावर हलका आघात करून ती सारखी केली. हे सारे करताना केवढी एकाग्रता, समोरच्या आरशातल्या स्वतःविषयी केवढी खुशी आणि अखेर एवढ्या शृंगारानंतर 'इकड'ची अॅपॉइंमेंटच फोनवरून रद्द झाल्यामुळे झालेला अनावर वैताग हे सारे आमच्यासमोर शब्दांशिवाय, साधनांशिवाय हुबेहूब एकूण एक स्त्रीसुलभ खुब्यांनिशी उभे करताना क्षणात आपल्या मर्कटसदृश अवताराने हा 'बाप्या' आमच्यातल्या स्त्रियांनाही खळखळून हसवीत होता तर क्षणात साऱ्या प्रतिकूल गोष्टींनिशी स्त्रीतले मार्दव, तिचा ठसका, तिच्या देहातली आणि हालचालींतली विलोभनीय सौंदर्यस्थळे आम्हांला अव्वल स्वरूपात, आपल्या अद्‌भुत कलेने भासवून एकीकडे बालगंधर्वांच्या परंपरेशी आपल्या कलेचे घनिष्ट नाते अजाणता पण दृढ स्वरूपात जोडीत होता. स्वरूपसुंदर गंधर्व झगमगत्या नेपथ्यापुढे साऱ्या साग्रसंगीत साजानिशी जो भास प्रेक्षकांसमोर हुकमी उभा करीत असतील, तोच—तसाच भास मर्कटसदृश मुद्रेने, नेपथ्याशिवाय आणि साजाशिवाय इर्शाद पंजतनने त्या दिवशी आमच्यापुढे उभा केला आणि त्यावर कडाडलेल्या स्त्रीपुरुष प्रेक्षकांच्या टाळ्या किती तरी वेळ मुळी थांबेचनात.

'माइम' हे शब्दातीत नाट्याचे माध्यम पाश्चात्त्य. आपल्या अव्वल भारतीय नृत्यांतही स्वतंत्रपणे ते प्रकटताना दिसते. परंतु नृत्यात भावाभिव्यक्तीसाठीच त्याचा वापर होतो तर निखळ 'माइम' मध्ये त्यावाटे प्रतिभावान कलावंत जीवनाचा आशय अत्यंत रंजकपणे प्रकट करतात.- इर्शाद पंजतन फ्रान्समध्ये या नाट्य प्रकारातील आचार्य मानले जाणारे मार्सल मार्सो यांच्या कलेचा व्यासंग ठेवून आणि त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन या नाट्यप्रकारात निष्णात बनले. त्यांची अंगकाठी या नाट्यप्रकाराला हवी तशी सुटसुटीत, चपळ, लवचीक, काटक आणि स्वतःचा असा डौल प्रत्येक हालचालीत दाखविणारी आहे. झरीन इंजीनिअर यांनी त्यांच्यापाशी या कलेचे धडे गिरवले. त्यांचा बांधा सुडौल परंतु अभिव्यक्त आशयापेक्षा किंवा तो व्यक्त करताना उमटणाऱ्या हालचालीतल्या डौलापेक्षा स्वतःचीच जाणीव अधिक देण्याइतका स्त्रीत्वाने भरलेला आहे. या नाट्यप्रकाराच्या दृष्टीने हा एक

दोषच म्हणता येईल. एरवी त्या इर्शाद पंजतनना मात्र चांगली साथ करतात.

तुम्ही या दोघांचा कार्यक्रम एकदा पाहिलाच पाहिजे. गावोगाव हा कार्यक्रम झाला पाहिजे. नाटयाचा हा अगदी अबालवृद्ध स्त्रीपुरुषांना रुचू शकेल असा शब्दातीत अत्यंत रंजक आणि कलासंपन्न प्रकार साजेशा वातावरणात रसिकपणे पाहिला गेला पाहिजे. या मंडळीला गाठायचे कुठे ? मी पाहिला तो कार्यक्रम ज्या जहांगीर आर्ट गॅलरीत झाला तिच्याच लगत 'सॅमोव्हर' म्हणून एक छोटे उपाहारगृह आहे. इथे मुंबईतल्या अनेक चित्रकारांचा, चित्ररसिकांचा, इंग्रजी–हिंदी नाटयसृष्टीतील दिग्दर्शकांचा, नटनटींचा वावर वेळी, आड–वेळी असतो. दोनप्रहर इथे कधी कधी टपका आणि चौकशी करा. तो पांढऱ्या तोंडाचा, एकही शब्द न उच्चारता हसून मुरकुंड्या वळवणारा आणि टाळ्यांवर टाळ्या घेणारा इर्शाद इथे आला आहे का ?

कदाचित् ज्याला हे विचाराल, तो किरकोळ वाटणारा निरहंकारी मुद्रेचा अत्यंत गंभीर गृहस्थच स्वत: इर्शाद पंजतन असेल !

□ □ □

# 'ताज आर्ट' मधील स्वैर, बेबंद चित्रकृती

जनसामान्यांना न जुमानणाऱ्या चित्रकलेच्या प्रदर्शनांचीही मंत्र्यांच्या, नाहीतर कोठल्या तरी वकिलातीच्या अधिकाऱ्याच्या, नाहीतर कधी कधी चक्क चित्रपट नाटक-तारकेच्या हस्ते मुंबईत उद्घाटने केली जातात हे तुम्हांला ठाऊक आहे काय ? एरवी आपल्या मुक्त वागण्यात प्रतिष्ठितपणा, रीत, अपेक्षा, व्यवस्था, शिस्त यांची पर्वा न बाळगणारी ही सध्याची कलंदर चित्रकार मंडळी एवढया एका बाबतीत भलतीच प्रतिष्ठित बनतात. उद्घाटनाची रूढ रीत काटेकोरपणे सांभाळतात; प्रतिष्ठित माणसे बोलावतात; शिस्तीने वागतात, बोलतात, नम्रतादेखील दाखवतात. याचा अर्थ एवढाच की, या लोकांची मुक्त वृत्तीदेखील सापेक्ष असते. मनात आले

तर हे सारे अगदी तुमच्या-आमच्यासारखेदेखील जगू लागतील !

हे सारे आठवण्याचे कारण गेल्या २४ ऑगस्टला प्रभाकर गोरे यांच्या चित्र-प्रदर्शनाचे ताज आर्ट गॅलरीत झालेले उद्घाटन. साहित्यातली, साहित्याच्या काठा-वरची आणि बिगर साहित्यिक अशी बरीच मंडळी उद्घाटनासाठी जमली होती. काही चित्रकारदेखील उशीरा येऊन पोचले. सरकारी कारखानदारीच्या क्षेत्रातले ग. बा. नेवाळकरदेखील आपल्या कार्यमग्नतेतून सवड काढून चित्रकलेपेक्षा चित्रकार गोऱ्यांविषयीच्या लोभामुळे असेल—उपस्थित झाले, उद्घाटनासाठी मंत्री रफिक झकेरिया आले. मग काही भाषणेही आलीच. चित्रकलाप्रदर्शनातल्या भाषणांत थोडेतरी गहन आणि आध्यात्मिक होण्याची रीत आहे. चित्रकाराशी झालेल्या पूर्व संभाषणांच्या जोरावर त्याचा एखादा दोस्त चित्रांविषयी गौरवपूर्ण पायघोळ बोलतो. मग मंत्री चित्रकलेविषयीचे आपले अज्ञान थट्टामस्करीच्या स्वरात एकीकडे कबूल करून काही ज्ञान अधिकारी स्वरात प्रदर्शित करतो. जमलेले योग्य वेळ साधून अधूनमधून हलक्या टाळ्या वाजवतात. नंतर हारतुरे, आभार, इत्यादी.

एरवी हे सगळे रीतसर आणि ठीकच असते; पण चौफेर मांडलेल्या गूढ, अनाकलनीय, बेबंद चित्रकृतींच्या मधोमध जेव्हा असला रीतीसारखा सोहळा चित्रकार घडवून आणून त्यात नम्र विनयाने भाग घेतो तेव्हा या दोहोतले एक काहीतरी फार खोटे वाटते—चित्रकृतीतला बेबंदपणा किंवा चित्रकाराचे उद्-घाटनाच्या, वस्तुतः चरबट झालेल्या परंपरेशी हौसेने चाललेले सविनय सहकार्य.

## प्रतीकांची भाषा

गोऱ्यांची प्रदर्शनात मांडलेली चित्रे स्त्रीविषयक होती. प्रत्येक चित्रातल्या नजरकैद करणाऱ्या वेधक रंगसंगतीतून आणि पक्षी, फुले, रंगांचे जाडजाड ठिपके अशा बऱ्याच तपशिलाच्या हुशारीने केलेल्या रचनेतून न चुकता एकेक स्त्रीदेह किंवा स्त्रीदेहाचा एक ना एक भाग, वैशिष्टय, आकार घेत होते. कधी अशी अनेक वैशिष्टचे एकत्र गुंफून एकाच चौकटीत एक अर्थपूर्ण आकृतिबंध बांधण्याचा प्रयत्न होता. कधी यात केनेडींच्या खुनासारखा विषयदेखील—चित्रशीर्षकापुरता का होईना—आला होता.

गोऱ्यांच्या कुंचल्याला पुस्तकांची वैशिष्टचपूर्ण मुखपृष्ठे वर्षानुवर्षे काढून एक सराईतपणा आला आहे. वरपांगी स्वैर, बेबंद वाटणाऱ्या त्यांच्या चित्रांना पुढच्याच क्षणी एक हुशार रचना भासते. ही रचना एकदा उमजली की चित्रात बाकी फारसे काही शोधणे उरत नाही आणि एखादे 'झिग-झॅग पझल' सोडवल्याचा माफक आनंद मिळतो. या प्रदर्शनातली त्यांची बहुतेक चित्रे अशी सुटणारी आणि सुटण्यास अवघड अशी वेधक, नेत्र-सुखद कोडी वाटत होती. त्यांतली ही प्रथमदर्शनी ध्यानी न येता पाहता पाहता प्रतीत होणारी विशिष्ट विषयानुसारी मुलायम, अनेकपदरी

रचना हीच त्यातली खरी गंमत होती. यांना अपवाद दोन-तीन. तुलनेने सरळ आणि साधी चित्रे. कोणत्याही गुंतागुंतीचा प्रयत्न त्यात नसल्याने ही चित्रे वेगळीच नजरेत भरत होती; मुख्यतः त्यातल्या चित्रीकरणासाठी, रेषेतल्या सामर्थ्यासाठी, गतिमानतेसाठी, रंगांच्या उठावदार आकर्षक योजनेसाठी आणि या सगळ्यामागच्या अस्वस्थ, शोधक, वास नेने पेटलेल्या, कसल्यातरी ध्यासाचा पाठपुरावा करणाऱ्या अंतर्मुख प्रतिभेसाठी.

या प्रदर्शनातील बहुतेक चित्रांपुरता गोरे यांच्यातील पुस्तकांची मुखपृष्ठे बनविणारा व्यापारी-चित्रकार प्रत्यक्षपणे उणा होता. प्रत्येक चित्र हे नवनिर्मितीच्या एका अनावर ध्यासाने आणि आवेगाने हातावेगळे करून टाकलेला प्रयत्न वाटत होते. परंतु प्रत्यक्षपणे गैरहजर असला तरी चित्रकलेतला व्यापार वर्षानुवर्षे करून गोरे यांच्या पिंडात आणि रक्तातच हा व्यापारी-चित्रकार काही ना काही प्रमाणात आता मिसळला असावा; एरवी या चित्रांना विषयनिरपेक्षपणे हमखास आलेली रंगरेषांची आकर्षकता आणि सुबकता एवढी आली नसती. विषय बीभत्स असूनही एखादे चित्र यामुळेच आकर्षक आणि मुलायम वाटत होते. तर काही चित्रे स्वतःचेच काही व्यक्त करण्याऐवजी एक उपरा वैचारिक वा भावुक आशय एका प्रतीकप्रधान गुंतागुंतीच्या, फसव्या शैलीने स्पष्ट करणारी होती. प्रतीकांचा तर गोऱ्यांच्या कुंचल्याला फार सोस, हे वारंवार उमटणारी काही प्रतीके पाहून लक्षात येत होते. आणि प्रतीकांची भाषा ही तशी चित्राची भाषा नव्हे, ही सचित्र साहित्यिक भाषा म्हटली पाहिजे. उदाहरणच द्यायचे तर प्रसिद्ध चित्रकार गायतोंडयांच्या चित्रात एकही रूढ, परिचित तपशील औषधालादेखील नसतो. केवळ रंगांच्या आणि क्वचित जोडीस रेषांच्या सावध, सुनियंत्रित, एकाग्र आणि किमान मांडणीतून ते सारे काही सुचवतात. हे सुचवणे आणि सुचवलेले सर्व, अनेकपदरी आणि चित्राचे अंगचे असते. चित्राचा आशय कोडयासारखा सुटत नव्हे तर लाटांसारखा पसरत पार जाणीवेच्या क्षितिजापर्यंत जातो आणि आपण चित्रात पुरते भिजून निघतो. गोऱ्यांची प्रतीकप्रधान चित्रे पाहून आपण त्यांतील आशयापासून कोरडे आणि अलिप्तच राहतो. पोचतो तो मेंदूपर्यंत वैचारिक वा तात्त्विक आशय. आणि नजर रंगरेषातल्या गुणसंपन्नतेने विद्ध होते. इतकेच या चित्रांचे फलित.

चित्रकाराची आणि चित्राची आपली स्वतःची अशी स्वयंपूर्ण अभिव्यक्ती अद्याप गोरे यांना गवसावयाची आहे असे वाटते. आज तरी ते कविता आणि विचार किंवा एकंदरीने शब्द-माध्यमच सुंदर, सुबक आणि कधी कधी आपल्या उघडेपणाने सौम्यसा धक्का देणाऱ्या चित्रांतून खुबीदारपणे मांडताहेत.

O

## एकदा स्वप्न पडलं--

एकदा स्वप्न पडलं
वॉल्ट डिस्नेच्या मिकी माउसचं
स्वप्नात आला तो इटुकला पिटुकला...
आपल्या मिशांची टोकं साफ करीत
म्हणाला होता ..(असं वाटतं)
'तू ती मांजर पाहिलीस...?
भारीच वाईट बुवा. नेहमी माझ्या मागे
थकल्यानंतरही सोडत नाही.'
मला थोडी कीव वाटली
तो मात्र खूप हसला
खरं तर
आमच्याही मागे कुठलं तरी;
काळजीचं मिशाळ मांजर असतंच
थकल्यानंतरही विसावा न घेऊ देणारं
एक मात्र अगदीच खरं
आम्ही आपले थकतोच नेहमी;
सगळ्या काळज्या टाळता टाळता
तो मात्र हसत विचारीत होता
'तू ती मांजर पाहिलीस...?'
नाहीच...!
मी फक्त पाहिला होता
वॉल्ट डिस्नेचा इटुकला-पिटुकला उंदीर
मला हसताना...!

*प्रकाश कामतीकर*

एक मोठी बोधप्रद कहाणी थोडी अधिक रंगती तर बरे झाले असते असे वाटल्यावाचून राहते. प्रकाश कामतीकर यांना एकदा स्वप्न पडलं आणि 'वॉल्ट डिस्नेचा उंदिर' त्यांना भेटायला आला. हा गंमतीदार प्राणी मुलांना फार आवडतो. आणि कवी शैशवाला सतत जपत असल्यामुळे त्याला मिकी माऊसचे आकर्षण असावे, हे साहजिकच नाही का? आपल्याला मांजराची भीती वाटते असे मिकीने सांगितले. कवीही विचार करतो की चितारूपी मार्जारी आपणांलाही सदैव अशीच त्रास नाही का देत? म्हणजे मिकी माऊस आणि आपण यांत काही फरक नाही. मग तो कवीला मांजर पाहिलीस म्हणून का विचारतो? हे चित्र मोठं रंजक आहे. शेवट तर विशेष रंगतो. कारण मिकी माऊस कवीला हसताना दिसतो आहे. माझ्याप्रमाणे तूही चितामग्नच आहेस ना, असे तर त्याला विचारायचे नसेल? यात कुठेतरी आणखी रंग भरायला पाहिजे होता. कुठे ते मात्र सांगता येत नाही. एक गोष्ट खरी की, आपले हृद्गत किंचित स्पष्ट करण्याची ही पद्धती नवीन आहे.

# आस्वाद

## वाटल्याने सुख वाटे

पंचपक्वान्ने भोजना
पोट तरी का भरेना ?
उणे तयास की हेच–
घास दिला नाही कुणा !
तळमळे रात्रभरी
जरी बिछाना परांचा
नाही लाविला कुणाच्या
हात पाठीस मायेचा
केला प्रवास अमाप
समाधान ना विमानी
सुख वाटून घ्यायाला
होते बरोबरी कोणी ?
पाणी सुगंध-मिश्रित
प्यावे–समाधान नाही
आहे उपाय की सोपा
घोट एक दुज्या देई
रेशमाचेही कपडे
सुख देत का न बरे ?
एक दिवस घालाया
दिले दुज्यास की पुरे !
असूनीही कल्पवृक्षा
तळी बोचती सराटे
कधी मज कळावे की
वाटल्याने सुख वाटे !

–विष्णुदत्त देवधर

'वाटल्याने सुख वाटे' या कवितेत एक नेहमीचाच विचार विष्णुदत्त देवधर यांनी स्पष्ट केला आहे. सुख एकटे भोगायचे म्हटले की कुठेतरी खटकते. सुंदर वनश्रीच्या समागमातसुद्धा कुणीतरी प्रेमी जीव जवळ असेल तरच परमानंद मिळतो. हा अनुभव दिव्यच असला तरी तो अलौकिक खास नाही ! कारण सामान्य मनुष्यही याचा पडताळा पाहू शकेल. विमानात किंवा कल्पवृक्षाखाली एकटे राहिल्याने सुख मिळणार नाही. कसल्यातरी अपूर्णतेचे काटे बोचतील. सुखाचा पेला कुणासाठी थोडा रिकामा करतो तेव्हाच तो काठोकाठ भरून वाहू लागतो. कवितेच्या शेवटच्या ओळीत कवितेतला आवेश एकदम ओसरला आहे. मथळ्याला दिलेला शेवटचा चरण फार फिका वाटतो. 'वाटणे' या शब्दावर कोटी करण्याच्या मोहात कवीने रसोत्कर्ष कमी केला आहे. विमानसुद्धा अगोदरच येऊन जाते. ते जरा पुढे यायला पाहिजे होते.

–गोपीनाथ तळवलकर

# वेदांत आणि पश्चिम

कन्याकुमारी येथील विवेकानंद खडकांवर स्वामी विवेकानंद यांचे भव्य स्मारक उभारले जात आहे. विवेकानंद शिला स्मारक समितीच्या महाराष्ट्र शाखेने दि. ८ ते १५ सप्टेंबर हा निधीसप्ताह पाळण्याचे ठरविले असून या सप्ताहात स्वामींच्या कार्याची स्मृती अनेक कार्यक्रमांद्वारा जागवली जात आहे.

ज. शा. देशपांडे

इ. स. १८९४ मध्ये स्वामी विवेकानंदांनी न्यूयॉर्क येथे रामकृष्ण मिशनची वेदांत सोसायटी स्थापन केली. चाळीसएक वर्षे स्वामी बोधानंद तिचे प्रमुख होते. इ. स. १९५१ मध्ये स्वामी पवित्रानंदांनी तिची सूत्रे घेतली. इ. स. १९२५ मध्ये स्वामी प्रभवानंदांनी पोर्टलंड (ओरेगॉव) येथे वेदांत सोसायटीची स्थापना केली. तेथील विश्वविद्यालयाने १९५२ मधील जागतिक धर्मपरिषदेसाठी त्या सोसायटीचे स्वामी देवतात्मानंद यांना हिंदूधर्माचे प्रतिनिधी म्हणून आमंत्रण दिले. इ. स. १९३३ मध्ये स्वामी निखिलानंद यांनी न्यूयॉर्कमध्ये दुसरे वेदांत केंद्र स्थापन केले. इ. स. १९३८ मध्ये स्वामी विदिशानंद यांनी सीटल् ( वॉशिंग्टन ) येथे केंद्र स्थापले. हल्ली अमेरिकेत अकरा वेदांत केंद्रे आहेत. तीन कॅलिफोर्नियात, दोन न्यूयॉर्क व इलिनॉइस, मॅसाचुसेट्स मिसौरी, ओरेगॉव, ऱ्होड बेट आणि वॉशिंग्टन येथे प्रत्येकी एक. यात विशेष प्रकारचे केंद्र दक्षिण कॅलिफोर्नियातले हॉलिवुड केंद्र हे आहे. हे इ. स. १९२९ मध्ये स्वामी प्रभावानंदांनी स्थापन केले. इ. स. १९३८ पासून ' वेदांत व पश्चिम ' (वेदांत अँड दि वेस्ट) हे मासिक तेथून निघत असून तेथे वेदांताची छाप बसवीत

## १८९३ : ११ सप्टेंबर
## वेदांताचे ' इवलेसे रोप '
## स्वामी विवेकानंदांनी पश्चिमेकडे लावले
## त्याचा हा ' वेलू '

आहे. या मासिकातले इ. स. १९५१ पासूनचे काही लेख गोळा करून सोळा पाश्चिमात्त्यांना वेदांताबद्दल काय वाटते ते ' व्हॉट वेदांत मीन्स टु मी ' या पुस्तकात उत्कृष्ट तऱ्हेने मांडलेले आढळते. या पुस्तकात स्वामी अतुलानंद या डच गृहस्थांचे व रूथ फॉलिंग ऊर्फ शारदादेवी यांचे लेख आहेत. प्रसिद्ध अमेरिकन लेखक व्हिन्सेंट शीन हे पुस्तकाच्या प्रास्ताविक चार शब्दांत म्हणतात, " रामकृष्ण मिशनसारखी उदारमतवादी संस्था पश्चिमेत ठाऊक नाही. ती कोणावर कसलीच सक्ती करीत नाही. मला महात्माजींनी ईशावास्योपनिषद् वाचण्यास सांगितले. ते पाहिले तर त्याची सुरुवातच हे विश्व परमेश्वरमय आहे, या उदात्त कल्पनेने होते. हे छोटे उपनिषद्, पण केवढे भव्य ! त्यात वेदांताचे सार भरलेले दिसते. " पुस्तकातल्या काही लेखांचा सारांश खाली दिला आहे.

### चिरंतन विचार

जॉन येल यांनी संपादकीय प्रस्तावना व एक लेख लिहिला आहे. प्रस्तावनेत ते म्हणतात, " वेदांत हा आध्यात्मिक धर्म असून संसारातल्या मायेच्या जादूपासून मुक्त होऊन परमोच्चतत्त्वाशी एक्य पावणे हे वेदांताचे उद्दिष्ट होय. माया कशी येते हा प्रश्न गौण व व्यर्थ वाटतो. आग लागली तर ती कोठून आली हे तपासण्याआधी ती विझवली पाहिजे. परमोच्चतत्त्वाशी ऐक्य पावण्याचा प्रयत्न करावयाचा असेल तर जगातल्या चांगल्या गोष्टींवर निष्ठेने प्रेम करा. तुम्ही पत्नीवर, मुलावर प्रेम केले तरी चालेल, पण या भावनेने करा. आधुनिक शास्त्राने विश्व विविध परंतु एकसूत्री असल्याचे दाखविले असून त्याच्याशी जमणारे एकमेव तत्त्वज्ञान वेदांत हे आहे."

लेखात ते म्हणतात, " ख्रिश्चन धर्माबद्दल विचार करताना नाना तऱ्हेच्या शंका येऊ लागल्या. जगात वाईट का आहे याचे उत्तर मिळेना. मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांच्याबरोबर कार्य केले पण पत्ता लागेना. वयस्कर लोक पाहिले तर पराभूत होऊन शांतिहीन झालेले. तेवढ्यात ख्रिस्टॉफर ईशरवुड यांचे ' वेदांत फॉर दि वेस्टर्न वर्ल्ड ', हक्स्ले यांचे ' दि पेरेनियल फिलॉसॉफी ' व हक्स्ले यांच्या असामान्य प्रस्तावनेने युक्त असे स्वामी प्रभावानंदांचे गीतेचे भाषांतर वाचले. आणि मी एका नवीन विश्वातच प्रवेश केला. माझ्या सर्व शंकांचे उत्तर मिळाले. आपण जन्मत: सगळे समान नसतो ही गोष्ट स्पष्ट ओळखली पाहिजे. कर्म व पुनर्जन्म हे मान्य करावे लागतातच. अनेक संस्कृती का येतात व जातात हे वेदांतावरून कळते.

दुराचार फार माजला की परमेश्वर अवतार घेऊन अधर्माचा मोड करणार हे निश्चित. सर्व विश्व सापेक्ष आहे, फक्त परमेश्वर सापेक्षतेच्या पलीकडचा. त्याच्यापर्यंत पोचण हे एका जन्माचे काम नव्हे. जग कशासाठी उत्पन्न झाले हे पाहिले, तर ते एक नाटक वाटते." ईशरवुडनी एका लेखात लिहिले होते, " जग हे कल्पतरूसारखे व आपण सर्व लहान मुलांसारखे आहोत. लहान मुले कल्पतरूपासून नाना गोष्टी मागतील. क्वचित् एखादा मुलगा म्हणेल की मला फक्त आई हवी. आपण या मुलाप्रमाणे नाना इच्छा करतो व त्यापासूनची फळे भोगतो."

**गेराल्ड साइक्स** या लेखकांना रामकृष्णांचे चरित्र वाचल्यावर उन्मन होण्याचा अनुभव मिळाला. मनुष्याचा उन्माद कमी करणारे वेदांत हे एक उत्तम औषध आहे. त्याचा पाश्चिमात्त्यांचा न्यायाकडील ओढा व आधिभौतिक प्रगती यांच्याशी मेळ बसविला पाहिजे असे त्यांचे म्हणण. भारतात येऊन तेथील दारिद्र्याच्या मध्यतेत राहावे, असे त्यांना फार वाटते.

**गेराल्ड हर्ड** म्हणतात, " वेदांताचे तत्त्वज्ञान समतोल व बुद्धीवादी असून हे जगातल्या दु:खाबद्दल निराश पावत नाही अथवा सोपे उपाय दाखवू पाहत नाही. त्याच्यात स्वर्ग नाही व नरकही नाही. फक्त पुर्नजन्म आहे. आधुनिक शास्त्रज्ञ वंशपरंपरेने गुण कसे पिढ्यांतून उतरतात ते दाखवून एका तऱ्हेने पुर्नजन्म सिद्ध करते. दु:ख नष्ट करण्याचा उपाय वेदांत दाखवतो. अकबराने येशूचे एक वाक्य कोरवले होते, असे म्हणतात. ' जग हा पूल असून त्यावरून जा, पण त्यावर घर बांधू नका.' वेदांत हेच सांगतो. वेदांत मानव जातीचा धर्म झाला पाहिजे. "

**मरिआना मासिन** : गेल्या महायुद्धात सर्व उद्ध्वस्त होऊन या ज्यू बाईंच्या कुटुंबाची वाताहत झाली. त्या म्हणतात, " बिकट अशा अवस्थेत असताना रोमा रोलांचे ' प्रॉफेट्स् ऑफ न्यू इंडिया ', मुकर्जींचे ' फेस ऑफ सायलेन्स ' व ईशरवुडचे वेदांतावरचे पुस्तक, इत्यादी ग्रंथांमुळे वेदांताकडे ओढले गेले. पण पुस्तके वाचून काय उपयोग ? तेव्हा गुरू शोधण्यास हॉलिवुडला गेले. मनुष्याची बुद्धी ही एक मोठी शक्ती खरी पण तिलाही मर्यादा असते. वेदांतापासून नवीन दृष्टीचा लाभ होऊन शांती मिळाली. मानव जातीतले भेद, बंध, वेदांत तोडते व माणसाला नवीन व्यक्तिमत्त्व देते. त्याची परमेश्वराची कल्पना किती सोपी आहे ? म्हणूनच संस्कृतमध्ये परमेश्वराला सहज म्हणतात."

**डोरोथी मर्सर** : " स्वामी त्रिगुणातीत इ. स. १९०३ मध्ये सॅन फ्रान्सिस्कोला गेले, तेव्हा माझी आई त्यांची शिष्या झाली. माझा एक आप्तही वेदांती होता. हे दुसऱ्या नातलगांना आवडत नसे. इ. स. १९१३ मध्ये स्वामींच्या ' कम्युनिटी प्रोजेक्ट 'मध्ये आईबरोबर गेले. हा प्रयोग यशस्वी झाला नाही. इ. स. १९१४ मध्ये स्वामी निधन पावले. इ. स. १९१८ मध्ये स्वामी अभेदानंद भेटले. पुढे स्वामी बोधानंद भेटले. विवेकानंदांचे ग्रंथ वाचीत होते व जगाच्या शृंखला तोडून संन्यासी

होण्याची उत्कंठा लागली. मी ऑक्सफर्डला शिकले, कॅलिफोर्नियात Ph.D. झाले पण मी जे काही विशेष शिकले व मला जी दृष्टी मिळाली त्याचे श्रेय आईला व स्वामींना आहे. अजून सत्याचा शोध घेण्याची ताकद मला आलेली नाही. परंतु मला आशा वाटते की, स्वामी त्रिगुणातीत म्हणाले त्याप्रमाणे एक दिवस खिडकीबाहेर पाहिल्यावर रस्त्यावर नुसती वाहतूक चालली एवढेच न दिसता, तो एक चित्रपट असल्याची खरीखुरी जाणीव होईल."

**कुर्ट फ्रेडरिक्स्:** "तरुणपणी एक दिवस हेलिगोलँड बेटावर खडकावर बसून समुद्राकडे पाहत बसलो असता विचारच काही काळ नष्ट झाले. नंतर गीता वाचली, उपनिषदे वाचली, पण तो अनुभव परत येईना. उलट ऐहिक गोष्टींवरचे मन उठविणे फार कठीण असल्याचे आढळून आले. इ स. १९३० मध्ये स्वामी यतीश्वरानंद भेटले व चुकलेली वाट सापडली. लढाईचे भयंकर क्षण अनुभवले. त्यांत सर्व काही गेले, पण वेदांताने धीर खचला नाही. जीवनात आत्मसंशोधनाखेरीज दुसरे काही नाही याचा प्रत्यय आला."

**स्वामी अतुलानंद :** " मला पुष्कळ लोक विचारतात, 'तुम्ही हिंदू का झालात ?' मी संकुचित अर्थाने हिंदू झालो नाही. मला येशू ख्रिस्ताबद्दल अत्यंत आदर आहे. स्वामी विवेकानंद म्हणत, 'मी तुम्हांला हिंदू व्हा असे सांगत नाही तर अधिक चांगले ख्रिश्चन व्हा असे सांगतो.' तथापि मला जीवन व तत्त्वज्ञान याची सांगड घालणारा उदात्त सहानुभूतिपूर्ण असा वेदांत हा जगातला एकमेव धर्म वाटतो. त्यात धर्मांतराची सक्ती नाही. देवळे पाडणे नाही अथवा इन्क्विझिशनचे अत्याचार नाहीत. हिंदू होणे म्हणजे विश्वबांधव होणे ही खात्री पटून मी वेदांती हिंदू झालो."

**जेन मोलार्ड :** "तरुणपण आल्यापासून बेचैन होऊ लागले. पॅरिसला राहिले, एका फ्रेंच तरुणाशी लग्न केले तरी चैन पडेना. कॅलिफोर्नियाला गेले. तरी आपण कोण, कोठून आलो हे विचार सतावीत. स्वामी प्रभवानंदांची गाठ पडून वेदांत वाचण्यास सुरुवात केली. नंतर फ्रान्सला गेल्यावर ग्रेट्झ् येथील वेदांत केंद्रात स्वामी सिद्धेश्वरानंदांना भेटले व त्यांना गुरू केले. हळूहळू माझे संशय फिटू लागले. तोपर्यंत सुंदर तेवढेच परमेश्वराचे रूप असे मी मानीत होते. आता परमेश्वर सर्वत्र आहे हे कळल्यावर मला सर्व जग निराळे दिसू लागले."

**अमिया कॉर्बिन अथवा कौंटेस ऑफ सँडविक् :** " मला पूर्वीचे विलक्षण आयुष्य आठवले म्हणजे कर्माच्या तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवल्याखेरीज गत्यंतर राहत नाही. इंग्लंड सोडण्यापूर्वी प्रो. नरेंद्रनाथ गांगुली यांनी मला एक पुस्तक दिले व त्यावर लिहिले, 'आपले आयुष्य अर्थपूर्ण करा.' हे वाक्य नेहमी आठवते. इ. स. १९३० मध्ये अमेरिकेतल्या माझ्या बहिणीने आपल्या तुटपुंज्या ऐपतीत स्वतःच्या खर्चाने मला अमेरिकेत नेले. पण लवकर मंदीची लाट येऊन तिचे दुकान बुडाले व तिचेच मागण्याची पंचाईत झाली. तेवढ्यात सॅन फ्रान्सिस्कोचे स्वामी विदिशानंद व अशोका-

नंद यांची ओळख झाली. इ. स. १९३१ मध्ये हॉलिवुडला स्वामी प्रभवानंद भेटले. त्यांनी भगिनी ललिता हिची ओळख करून दिली. हळूहळू माझा मीपणा जाऊ लागला. मी शिवणकाम करण्याचा प्रयत्न केला, पण ते जमेना. माझी ओढाताण पाहून स्वामी नेहमी जेवण्यास बोलवीत, पण ते ब्रिटिश स्वाभिमानाला पटेना. मग एका नटीकडे नोकरी धरली. तिथे आर्थिक काळजी नव्हती. तरी तेथे राहवेना. परत केंद्रात आले. तेवढ्यात एक अद्‌भुत गोष्ट घडून आली. स्वामी विवेकानंद हिंदुस्थानात परत आले तेव्हा त्यांचेबरोबर आल्बर्टो स्टर्जेस होती. तिने जॉर्ज मॉंटेग्यूबरोबर विवाह केला. तो पुढे १९१६ मध्ये लॉर्ड सँडविक् झाला. त्याचाही वेदांताकडे ओढा होता व त्याने भारतात बेलूर मठाला भेट दिली. इ. स. १९५१ मध्ये आल्बर्टो मृत्यू पावली. पुढल्या वर्षी लॉर्ड सँडविच लॉस अँजेलिस येथे वेदांत केंद्रात आले व दोन दिवसांनी सॅन फ्रान्सिस्कोला गेले. तेवढ्यात जहाजाला आग लागल्याने त्यांना राहावे लागले. स्वामी प्रभवानंदानी ते कळताच त्यांना परत बोलावून ठेवून घेतले. त्या अवधीत आमची ओळख झाली व आमचे लग्न होऊन मी इंग्लंडला परत आले. अजून मला वेदांत म्हणजे काय हे कळावयाचे आहे. पण सर्वांवर प्रेम करणे हे सर्व धर्मांचे सार आहे एवढे तरी सध्या समजते."

**जोन रेयने ऊर्फ दया** : "मी तरुणपणी कला-काव्यात भाग घेतला, खूप वाचले, नाटककार झाले, पण त्यामुळे अंगात मीपणा शिरला. युद्धात रेडक्रॉसमध्ये काम केले. स्त्रियांच्या राखीव दलात होते. तेव्हा विमानवेधी तोफांवर काम करावे लागले. आमच्या तोफांचे गोळे शत्रूच्या विमानाला कधीच लागत नसत. एकदा आम्ही आमच्याच विमानावर सरबत्ती केली व अधिकाऱ्यांच्या शिव्या ऐकून घ्याव्या लागल्या. पुस्तके वाचता वाचता अध्यात्माकडे वळावेसे वाटू लागले. शिक्षित लोकांचा शिष्टपणा जवळ होताच, त्यांत बुद्धिवादी म्हणविणाऱ्या मंडळींशी गाठ पडून पोपटासारखी बडबड करू लागले. तेवढ्यात डॉ. केनेथ वॉकर यांचे 'डायग्नॉसिस ऑफ मॅन' हे पुस्तक वाचून वेदांताबद्दल कुतूहल उत्पन्न झाले. काही मित्रांबरोबर नाटकगृहाच्या धंद्यात पडले. तेथे जबरदस्त ठोकर खाल्ली व कळले की, घोड्यांच्या शर्यतीपेक्षा अधिक सट्टेबाजीचे ते काम. या भानगडीला मध्यंतरी आलेले औदासीन्य जाऊन लोकांनी मला मोठे म्हणावे, माझ्या पुढे पुढे करावे, अशा पोरकट आकांक्षा निर्माण झाल्या व त्या पूर्णही होऊ लागल्या. त्यामुळे मी एक टिनच्या पत्र्याची देवता बनले. लोक मला श्रीमंत समजत. धंद्यात अनेक हलकट गोष्टी कराव्या लागतात. त्यांचे काही वाटेनासे झाले. एका मैत्रिणीमुळे सहज वेदांताशी संबंध आला व ईशरवुड यांचे पुस्तक वाचले. मग मला मात्र राहवेना. सर्वांच्या मनाविरुद्ध सगळ्या गोष्टींचा त्याग करून मी अमेरिकेत हॉलिवुड केंद्रात जाऊन दाखल झाले, व स्वामी प्रभवानंदांना आपल्या मंडळात समाविष्ट करून घेण्याची विनंती केली. त्यांनी काही काळ वाट पाहण्यास सांगितले. इकडे माझा व्हिसा संपत आला होता.

स्वामींच्या अनुमतीने भारतात गेले व बंगलोर येथे जाऊन स्वामी यतीश्वरानंदांचे शिष्यत्व पत्करले. दोन वर्षांनंतर इ. स. १९५३ मध्ये स्वामी प्रभवानंदांनी मला केंद्रात घेण्याचे कबूल केले व वर्षभर भारतात तीर्थयात्रा करण्यास सांगितले. त्या सुमारास इ. स. १९५४ मध्ये स्वामी यतीश्वरानंद युरोपमध्ये परत गेले. भारतातली तीर्थयात्रा व देवळे आणि त्यांतले गूढ व उदात्त वातावरण मी कधीच विसरणार नाही. नंतर फ्रान्समध्ये वेदांत केंद्रात स्वामी सिद्धेश्वरानंदांची गाठ पडली. ते तेथे इ. स. १९३७ पासून १९५७ पर्यंत होते. इ. स. १९५५ मध्ये मी अमेरिकेला जाण्याची तयारी केली. रिवाजाप्रमाणे अमेरिकेच्या वकिलाकडे गेले. त्याने सहज विचारले, " अमेरिकेला कशाकरता जाता ? " मी हिंदू मठात प्रवेश करण्यासाठी जाते, हे सांगितल्यावर त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. ते म्हणाले " बाई, लोक अमेरिकेला पैसा मिळविण्यासाठी जातात. तुमच्यासारखी गोष्ट मी प्रथमच पाहतो परमेश्वर तुमचे उद्दिष्ट सफल करो. "


आता मी दया हे संस्कृत नाव धारण करते. माझी आईही ख्रिश्चन असून तिने संस्कृत नाव धारण केले आहे. मला गुरुचे महत्त्व पूर्ण कळले. पौर्वात्य गुरू पाश्चिमात्यांपेक्षा फार श्रेष्ठ आहेत. कारण पौर्वात्य गुरू आपण केवळ एका मोठ्या शक्तीचे अधिकरण आहोत असे मानतात. मला जगातल्या उलाढालीत भाग घेण्यास परत जावे असे बिलकूल वाटत नाही. मला वेदांतापासून शांती, तृप्ती सर्व काही मिळाले. केव्हा केव्हा थोडेसे मन चलबिचल पावते, पण ते तेवढ्यापुरते. अशा वेळी गेराल्डिन कॉस्टरचे ' योग अँड वेस्टर्न फिलॉसॉफी ' यांसारखी पुस्तके उपयोगी पडतात. आता पूर्ण कळून आले की, जगातल्या बाह्य दुःखांना अंत नाही, पण मनातल्यांना आहे. "

## विलक्षण प्रार्थना

ईशरवुड हे एक प्रख्यात लेखक आहेत. ते म्हणतात, " मला सुरुवातीपासून ख्रिश्चन धर्म पटेना. भोवती पाहावे तर ढोंगांचे राज्य व सर्वजण रविवारपुरते ख्रिश्चन. मी निरीश्वरवादी झालो. स्पेनमधल्या यादवीत भाग घेतला. तेथे दोन्ही बाजूंनी वापरलेले उपाय पाहिल्यावर चांगल्या उद्दिष्टासाठी वाटेल ते इलाज करण्यास हरकत नसावी या तत्त्वप्रणालीचा फोलपणा स्पष्टपणे कळून चुकला. इ. स. १९३८ मध्ये चीनमध्ये तरुण पोरे धरून आघाडीवर पाठवली जात, ते दृश्य पाहून समाजव्यवस्थेसाठी लोकांना सक्तीने सैनिक बनवणे योग्य वाटेना. अशा मनःस्थितीत वेदांताचा शोध लागला. ख्रिस्टॉफर ईशरवुड हा एक क्षणभंगुर मीपणा आहे हा शोध व ' हे आत्मन ! तू आपले यथार्थ दर्शन घडव, ' ही प्रार्थना केवढी विलक्षण ! या प्रार्थनेत व्यापार नाही, अमूक दे म्हणून अर्जदारी नाही, उराशी बाळगलेली तत्त्वे नाहीत, धर्मवेड व वेडेवाकडे विचार नाहीत, किंवा तुम्ही पापी आहात म्हणून आरडाओरड नाही. आपणच आपले कर्मकार. वेदांताला संस्कृतसारख्या असामान्य

भाषची जोड मिळाल्याने तो अधिकच प्रभावी झाला आहे. मला प्रार्थना, मंत्र, गुरू या गोष्टी फार महत्त्वाच्या वाटतात. प्रार्थना शब्दांची, पण तिचा भाव शब्दातीत होऊ शकतो व ती सर्व संकटांतून पार पाडू शकते. मला गेराल्ड हर्ड यांचे 'थर्ड मोरॅलिटी' यातले एक वाक्य नेहमी आठवते. ते सांगतात की न्यूटनने दृश्य जगातून परमेश्वराला हाकलले, डार्विनने जीवसृष्टीतून हाकलले व मानसशास्त्रज्ञांनी मेंदूतून हाकलले, पण वेदांतावरील लेखकांनी ईश्वराची परत प्रस्तावना करण्याचा यत्न चालवला आहे. ईश्वर हे एक शाश्वत तत्त्व असून मनुष्याकडे सर्व कर्तृत्व आहे, हे कळल्यावर नवीन दृष्टी आली व ख्रिश्चन धर्मातल्याही गोष्टींचा अर्थ कळू लागला. अजून मी कोण आहे हे मला कळले नाही, पण केव्हातरी एकदा अनंतत्वात मी विलीन होऊन जाईन याबद्दल खात्री वाटते."

आधिभौतिक गोष्टींत पुढे गेलेल्या पाश्चिमात्त्यांना आता वेदांताचा मोठा आधार वाटू लागला असून अमेरिकेतही गेलेल्या व्हिन्सेंट शीन, ॲलन वॅट्स यांच्यासारखे वेदांती झाले आहेत. त्यांचा वेदांताचा अभ्यास पाहिला तर मान डोलवाविशी वाटते. आजच्या युगात त्यांना ऋषी म्हटले पाहिजे. याच्या उलट भारतात प्रकार! सर पॉल ड्यूकस म्हणतात, "सर्वसाधारण भारतीयाला आपल्या संस्कृतीचा गंधही नसतो. ज्या देशात वेदांतासारख्या उच्च तत्त्वज्ञानाने जन्म घेतला त्या देशातील लोकांचे वर्तन आणि तत्त्वज्ञान यांत भयंकर तफावत आहे." प्रत्येक भारतीयाने या विधा-नाचा विचार करण्याची फार फार आवश्यकता आहे. ▫



# वि. स. वाळिंबे

यांचे

# वेधक, भिरभिरे

## आज इथे, उद्या तिथे

ब्रिटनमध्ये एका छोटचा वृत्तपत्रीय अभ्यास-क्रमासाठी गेलेल्या पत्रकाराने परतताना पॅरिस, जिनीव्हा, बर्लिन, मॉस्को अशी सफर केली. १०८ दिवसांच्या या परदेश-वास्तव्यात, त्याच्या जाणत्या दृष्टीने जे बरेच काही मनात साठवले, त्याचा हे प्रवासवर्णन एक अत्यंत हृद्य आविष्कार होय. मराठी वाङमयातील प्रवासवर्णनात ही एक केवळ चांगली भर नसून, अत्यंत आकर्षक रीतीने कमीत कमी शब्दांत प्रवासवर्णन कसे लिहावे याचा हे पुस्तक हा एक आदर्श आहे.

श्री. वाळिंबे यांची शैली अत्यंत मार्मिक आहे, प्रमेय रुचीस आणून सोडण्याचे कसब त्यांच्यापाशी आहे. या प्रवासवर्णनात जाणवतो तो विशेष असा की, प्रवासात भेटलेल्या व्यक्तिचित्रांना या प्रवासवर्णनात प्राधान्य आहे; म्हणूनच पुण्याला परतताना लेखकाच्या डोळ्यांसमोर उभी राहतात ती प्रवासात भेटलेली माणसे ! म्हातारी मिसेस हार्पर त्यांना आठवते. स्वत:ला हरवून बसणारी ॲन बर्किनशा त्यांच्या डोळ्यांपुढून हलत नाही, मॅडोलिनजवळची फ्रेंच विक्रेती, सिगरेटची भीक मागणारा गोबऱ्या गालाचा रशियन छोकरा, बिअरचे घुटके घेणारा डिक,

## पुस्तके

बारक्या डोळ्यांचा जपानी मित्र काझुओ, अशी नाना माणसे आता पुन: कधी दिसतील का, या विचारांवर या सुंदर प्रवासवर्णनाचा शेवट लेखक करतो. पुस्तक वाचत असताना या मंडळींशी वाचकांची जी धावती ओळख होते, त्यावरून लेखकाच्या या हुरहुरीशी वाचकही समरस झालेला दिसतो.

पत्रकाराच्या लेखणीत अभावाने आढळणारे वाङमय गुण व विनोदी किनारपट्टी या दोन्ही गोष्टी श्री. वाळिंबे यांच्या लेखनाला लाभलेल्या आहेत.

'थंडीचे दिवस आले की आपल्याकडे लोकांना व्यायामाची आठवण होते,' 'चर्चिल यांच्या निधनानिमित्त सुटी दिली न गेल्याने त्यांच्यावरील प्रेमाचे सरकारी प्रदर्शन झाले नाही...,' 'अखेर शब्दांचाच आधार घेऊन माणसाला भावना व्यक्त कराव्या लागतात,' 'कारंजे लडिवाळपणे उभे होते,' 'या भूमीवर हसायलाही बंदी असावी. अधिकाऱ्यांची पादत्राणे व शब्द यांचेच काय ते आवाज कानावर घुमत होते.' —यांसारखी अशी अनेक वाक्ये संदर्भासहित सांगितली पाहिजेत असे नाही.

पेनार्थ येथील वृत्तपत्रकारांसाठी बांधलेले– आतिथ्यशील आंतरराष्ट्रीयभवन, शेक्सपिअरची चिरंतन कीर्ती लाभलेली जन्मभूमी, सीन काठचे प्रतिकारशून्य रंगेल पॅरिस, दिवसरात्र अश्रू ढाळणारी बर्लिनची भिंत, सुसंस्कृत माणसाला परिचित असणाऱ्या कृतज्ञतेची पूर्णपणे फारकत झालेली मॉस्कोची राजवट, या सर्वांचे ठळक ठसे वाचकांच्या मनांवर एकीकडे उमटत असतानाच युरोपातील वृत्तपत्रसृष्टीचे धावते दर्शनदेखील श्री. वाळिंबे घडवतात.

लहान मुलाच्या हातांत भिरभिरे मिळाले की, ते मूल जसे चाळभर धावू लागते, त्याप्रमाणे वाळिंबे यांचे हे पुस्तक खाली ठेवल्यापासून मी ज्याला त्याला सांगतो आहे–

"वाळिंब्यांचं पुस्तक वाचलंत का ? जरूर वाचा ! हातांत घेतलेत तर पुरं झाल्याशिवाय ते तुम्ही खाली ठेवणार नाही." ◻ वि. ग. कानिटकर

## माझ्या जिंदगीची पटकथा

गिरगावातून चाललो होतो. बॉम्बे बुक डेपोच्या शो-केसपाशी जरा थबकलो. पुस्तकाच्या आराशीतील एका पुस्तकावर नजर खिळली. 'माझ्या जिंदगीची पटकथा.' माझ्या व्यवसायात हा 'पटकथा' शब्द मला दररोज अनंत वेळा भेटतो. छापलेला दिसला प्रथमच. साहजिकच जिज्ञासा जरा चाळवली. एक हात खिशात घालून पुस्तकावर कुठे किंमत छापली आहे का पाहू लागलो. तोपर्यंत पातळ आकार नजरेत बसला

होता. आत गेलो आणि पाच रुपये किंमत ऐकूनसुद्धा ते पुस्तक विकत घेतले. बस गाठली नि घराकडे निघालो.

किती वर्षांपूर्वी ते नक्की आठवत नाही; पण दादरच्या याझदान हॉटेलात मी व माझे एक वडील स्नेही बोलत बसलो होतो. " अरे, ते गृहस्थ बघ – ओळखतोस त्यांना ? " माझ्या स्नेह्यांनी प्रश्न केला. मी बघितलं. रेघारेघाचा अर्धा सदरा आणि आखूडसा सफेद पायजमा घातलेले एक वृद्ध गृहस्थ काऊंटरपाशी काही खरेदी करीत उभे होते. अपेक्षेप्रमाणेच माझ्या चेहऱ्यावर ओळखीचं काहीच चिन्ह न दिसल्यामुळे माझा मित्र उत्साहाने सांगू लागला–

" अरे, तुमच्या लाइनमधले आहेत ते. त्यांचं नाव केशवराव धायबर. शांतारामचे ' प्रभात ' मधले पार्टनर. "

नंतर मित्र काय बोलला आठवत नाही. मी केशवरावांकडे निरखून पाहत राहिलो. खरेदी आटोपून ते निघून गेले. केशवरावांना मी प्रथम पाहिले ते तेव्हा !

नंतर मी केशवरावांना त्या हॉटेलात किंवा त्याच्या आसपास अनेक वेळा पाहिलं आणि त्यांच्याबद्दल ऐकल्याही अनेक गोष्टी. अगदी परस्परविरोधी अशा गोष्टी ऐकल्या की मनात यायचं, त्यांना गाठूनच खरं-खोटं करूया ना ? पण त्यांच्या एकंदर उग्र स्वरूपाकडे पाहून तसं धैर्य मात्र मी कधी केलं नाही.

अलीकडे कधीतरी मी माझ्या नवीन व्यावसायिक मित्रांना दाखवतो, " ते चालले आहेत ना – ते केशवराव धायबर. " परंतु मित्रांच्या चेहऱ्यावर काही अर्थबोध झाल्याचे कुठलेच चिन्ह दिसत नाही. आपण जुनाट झाल्याची मनातल्या मनात खंत करीत किंचित वरमून पुटपुटतो – " He was one of the founders of ' Prabhat.' "

घरी आलो. पुस्तक वाचायला सुरुवात केली आणि अडुसष्ट पानांचं हे छोटं पुस्तक कुठेही न थांबता, न गोंधळता वाचून पूर्ण केलं.

केशवरावांनी सुरुवातीलाच सांगून टाकले आहे, " ही कहाणी आहे एका सामान्य कामगाराच्या जीवनाची. त्यात चढउतार, खाचखळगे आणि ठोकरा ह्यांशिवाय दुसरे काय असणार ? " पुस्तकाच्या पानापानांवर त्यांच्या सांगण्याची सत्यता पटते.

झोपडीत जन्मलेला मुलगा सात-आठ महिन्यांतच सरदार घरच्या मऊमऊ गाद्यागिरद्यांत लोळू लागतो. आणि अचानक वयाच्या अठराव्या वर्षी अंगावरच्या एका

— — — — — — — — —

**ही कहाणी आहे एका सामान्य कामगाराची.**

— — — — — — — — —

## 'मी जाणते फक्त तुमचे हृदय'

वस्त्रानिशी तिथून बाहेर पडतो. बऱ्याच उशीरा म्हणजे वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी, चित्रपट शिक्षणाची उमेदवारी सुरू करतो आणि एकूणचाळीसाव्या वर्षी भागीदारीत चित्रपट कंपनी सुरू करून मोटारीमागोमाग मोटारी बदलण्याचा शौक करण्याएवढे यश मिळवतो. ह्या सर्वच घटना केशवरावांनी एखाद्या निष्णात पट-कथाकाराच्या कौशल्याने अती वेगवानपणे सांगितल्या आहेत.

एकत्र कुटुंबात कलीने प्रवेश करावा त्याप्रमाणे भागीदारांत हेवेदावे सुरू झाले आणि केशवरावांना 'प्रभात'मधून बाहेर पडावे लागले. हवे असल्यास हे पट-कथेतले मध्यंतर!

एकत्र कुटुंबात आयुष्य घालवलेल्या माणसाला घरातलं सहकार्य संपुष्टात आल्यामुळे बाहेर पडून स्वतंत्र संसार थाटण्याची पाळी यावी, तसे केशवरावांचे झाले. सदैव चार भावांच्या पाठबळाच्या जोरावर धडाडीने पुढे पाऊल टाकण्याची सवय झालेल्यांनी स्वतःच्या हिंमतीवर स्वतंत्र संसार थाटताना उडालेल्या आपल्या तारांबळीचे केलेले वर्णन अत्यंत हृदयस्पर्शी आहे.

वयाच्या सत्तेचाळीसाव्या वर्षापासून ते आज सत्याहत्तराव्या वर्षापर्यंत केशवराव आणि यश ह्यांची लढाई अखंड चालू आहे. ह्या वयात अपयशाने असा एकसारखा पाठपुरावा केल्यावर केवळ दैवाला दोष देत जर कुणी स्वस्थ बसला तर ते सम-जण्यासारखं आहे; परंतु केशवरावांचं तसं नाही. वयाच्या शहात्तराव्या वर्षीसुद्धा त्र्यंबकेश्वराच्या ६५० अवघड पायऱ्या चढून ते शूटिंग करून आले ही त्यांची जिद्द असामान्य आहे! आलेल्या आपत्तींचे दुःख बाजूला सारून, समतोल मनाने जे मिळेल त्याचा उपभोग घेत, परिस्थिती कितीही बिकट झाली तरी ताठ मान ठेवून केशवरावांची वाटचाल चालूच आहे.

ह्या पडत्या काळात "मी पडता काळ जाणत नाही – जाणते फक्त तुमचे हृदय," असे म्हणून त्यांच्याशी विवाहबद्ध होणाऱ्या सुविद्य अभिनेत्री श्रीमती नलिनी तर्खड, किंवा ज्याच्यावरून दुसऱ्या पत्नीशी अखंड झगडा होऊन मानसिक शांतता पार रसातळाला गेली तोच दुसऱ्या पत्नीचा भाचा आजारी असताना त्यांची सेवा करण्याकरता पुढे आला – अशासारख्या मन हेलावून सोडणाऱ्या व्यक्तीही केशवरावांच्या आयुष्यात आल्या आणि ह्या अशाच व्यक्तींनी व घटनांनी अपयशाच्या ठोकरा मिळूनसुद्धा केशवरावांचे मन कडवट होऊ दिले नाही

आणि त्यामुळे सबंध आत्मकथनात कुणाचाही उपमर्द करण्याचा प्रयत्न नाही किंवा लेखकाच्या मनात कुणाहीविषयी आकस नाही, ह्याची खात्री पटते.

सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे मी केशवरावांशी बोलण्याचा प्रयत्न मनात येऊन-सुद्धा कधी केला नव्हता. पुस्तक वाचल्यावर मी मुद्दाम त्यांच्या घरी जाऊन त्यांच्याशी तासभर गप्पा मारल्या.

एखाद्या कलाकृतीचे यश म्हणजे ती तयार करणाऱ्या कलावंताच्या प्रतिभेचे यश. प्रतिभा म्हणजे ५ टक्के कल्पना व ९५ टक्के कष्ट असे असले तरी महत्त्व आहे टक्केवारीपेक्षा त्या दोन गुणांच्या अन्वयाला. तोच महत्त्वाचा समन्वय केशव-रावांच्या ह्या आत्मकथनात तरी नक्कीच आहे.

चित्रे हलतात किंवा बोलतात एवढ्याच केवळ गुणांवर चित्र यशस्वी होण्याचे दिवस संपल्यावर केशवरावांनी यशस्वीपणे दिग्दर्शित केलेली ही एक पटकथा.

**गिरीश कर्वे**

आज इथे, उद्या तिथे
लेखक : वि. स. वाळिंबे,
प्रकाशक – इनामदार बंधू प्रकाशन,
९९१ सदाशिव पेठ, पुणे २. मूल्य : ३ रु.

एका जिंदगीची पटकथा
लेखक : केशवराव धायबर
पॉप्युलर प्रकाशन
मूल्य : पाच रुपये, पृष्ठे : ६८.


**परसूच्या पशुकथा** — **वसंत सबनीस**

**सहा साहसे** — **दा. सी. देसाई**

**मूल्य प्रत्येकी दोन रुपये**

**राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.**

# लेनिनचे तंत्र आत्मसात करणारा जोसेफ जुगाश्विली

कॅस्पियन आणि काळा या दोन समुद्रांच्या दरम्यान द्वीपकल्पासारख्या पुढे आलेल्या भूभागावर कॉकेशियन पर्वतराजी उभी आहे. आशिया आणि युरोप यांच्या सीमारेषेवर उभ्या असलेल्या या पहाडी प्रदेशातील दऱ्याखोऱ्यांत अनेक लहानमोठी राज्ये निर्माण झाली नि नष्ट झाली अन पुन्हा उभीही राहिली. प्राचीन परंपरा सांगणारे जॉर्जिया हे त्यांपैकी एक प्रमुख राज्य. जॉर्जियातून वाहणाऱ्या कुरा नदीच्या तीरावर गोरी हे एक छोटेसे गाव वसलेले आहे. या छोटयाशा गावातील एका छोटयाशा घरात २१ डिसेंबर १८७९ रोजी स्टॅलिनचा जन्म झाला.

जोसेफ विसारिओनोव्हिच जुगाश्विली हे स्टॅलिनचे खरे नाव. रशियातील इतर क्रांतिकारकांप्रमाणेच त्यानेही अनेक नामांतरे केली. डेव्हिड, निझेराडझ, चिचिकॉफ, बेसोशव्हिली, काटो, व्हॅसिल्येव्ह, तेतोनिआण्टझ, कोबा अशी कितीतरी नावे जोसेफ जुगाश्विलीने वेळप्रसंगी वापरली. झार राजवटीशी हुलकावणीचे युद्ध खेळत असताना तो कोबा या नावाने ओळखला जात होता. त्यानंतर शेवटी त्याने स्टॅलिन हे नाव घेतले. तरी त्याचे जवळचे मित्र मात्र त्याला बरेच दिवस कोबा म्हणूनच संबोधीत असत. म्हणूनच १९१३ मध्ये त्याने लिहिलेल्या 'मार्क्सिझम अँड दि नॅशनल क्वेश्चन' या पुस्तकावर लेखक म्हणून 'के स्टॅलिन' असे नाव प्रसिद्ध करण्यात आलेले आहे. स्टॅलिन म्हणजे लोहपुरुष.

कॉकेशस पर्वताच्या परिसरात वसलेल्या प्रत्येक राज्याला प्रारंभापासूनच आपल्या वेगळेपणाचा अभिमान वाटत होता. इतकेच नव्हे तर वेगळेपण टिकविण्यासाठी प्रयत्नपूर्वक धडपडही केली जाई. जॉर्जियासारख्या प्रमुख राज्यात तर रशियाविरोधी भावना विशेषच प्रबळ होती. त्यामुळेच १९१२ मध्ये स्टॅलिनशी परिचय झाल्यानंतर लेनिनने त्याला या पहाडी प्रदेशामध्ये रशियासंबंधी आपुलकीची भावना कशी निर्माण होईल या प्रश्नाचा अभ्यास करण्यास सांगितले. या अभ्यासाच्या आधारावरच त्याने 'मार्क्सिझम अँड दि नॅशनल क्वेश्चन' हे पुस्तक लिहिले. १९१७ मध्ये राज्यक्रांती होऊन रशियाची सर्व सत्ता लेनिनकडे आल्यानंतर त्याने स्टॅलिनला रशियातील भिन्न भिन्न राष्ट्रकांमध्ये (नॅशनॅलिटीज) एकजूट प्रस्थापित करणाऱ्या

१५



# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

खात्याचे मंत्री नेमले. रशियाविरोधी जॉर्जियामधून आलेला स्टॅलिन अस्सल रशियन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात जन्म पावलेल्या लेनिनपेक्षाही अधिक कडवा राष्ट्रवादी कसा झाला या प्रश्नाचे उत्तर तत्सम इतर उदाहरणांवरून मिळू शकते. ज्या मानसिक प्रक्रियेमुळे कॉर्सिकात जन्मलेला नेपोलियन फ्रान्स वैभवशाली व्हावा यासाठी आयुष्यभर धडपडला किंवा ऑस्ट्रियात जन्म पावलेल्या हिटलरने बृहद् जर्मनीसाठी आपल्या प्राणांची बाजी लावली त्याच मानसिक प्रक्रियेतून जॉर्जियासारख्या कट्टर रशियाविरोधी भूमीतून निर्माण झालेला स्टॅलिन 'सारा रशिया एक राष्ट्र' या घोषणेचा पुकारा करू लागला.

लेनिनचा जन्म प्रतिष्ठित मध्यमवर्गीय कुटुंबात झाला होता तर दारिद्र्य आणि उपेक्षा सहन कराव्या लागणाऱ्या कष्टकरी अन अशिक्षित आईबापांच्या पोटी स्टॅलिन जन्मला होता. विद्येची उपासना करणाऱ्या सुसंस्कृत आईवडिलांचे छत्र लेनिनला लाभले होते तर शिवीगाळ आणि मारहाण याच भाषेत बोलणाऱ्या बापाच्या सह-

वासात स्टॅलिनचे बालपण व्यतीत झाले होते. व्होल्गाच्या तीरावर भरभराटलेल्या संस्कृतीचा वारसा लेनिनला लाभला होता तर पहाडी प्रदेशातील आठमुडी जिद्द घेऊन स्टॅलिन उभा ठाकला होता. लेनिन आणि स्टॅलिन यांच्या केवळ स्वभावातच फरक होता असे नव्हे तर ते दोघे ज्या परिस्थितीत आणि प्रदेशात वाढले तीही तितकीच भिन्न होती. त्या दोघांच्या भाषेत आणि कृतीत फरक दिसून येतो तो त्यामुळेच. हा फरक जाणून घेतला नाही तर लेनिनच्या मृत्युनंतर स्टॅलिनने जे सर्वस्वी स्वातंत्र्य, केवळ स्वतःलाच पटणारे आणि लेनिनवाद गुंडाळून ठेवणारे धोरण स्वीकारले त्यामागची कारणमीमांसा कळू शकणार नाही. झारशाही नष्ट झाल्यानंतर रशियाची सूत्रे ज्यांच्या ज्यांच्याकडे आली त्यांचे परस्परभिन्न स्वरूप ध्यानी घेणे मनोरंजक ठरेल. केरेन्स्की, मिलिउकोव्ह हे सर्वस्वी पाश्चात्त्य विचारसरणीत वाढलेले नेते प्रथम रशियाचे सूत्रधार झाले. त्यानंतर पाश्चात्त्य विचारसरणी आणि खास रशियन मनोरचना यांचा संगम साधणाऱ्या लेनिनने केरेन्स्की प्रभृतींना हुसकावून रशियाची सूत्रे त्यांच्याकडून स्वतःकडे घेतली आणि सरतेशेवटी पहाडी प्रदेशातील पाण्यावर वाढलेल्या स्टॅलिनसारख्या राकट माणसाने, काही प्रमाणांत पाश्चात्त्य आणि काही प्रमाणांत रशियन विचारधारा बाळगणाऱ्या ट्रॉटस्कीसारख्या लेनिनच्या सहकाऱ्यांना दूर सारून सर्व सत्ता आपल्या एकट्याच्या हाती घेतली.

लेनिन 'आशियाई' हा शब्द मागासलेपणाच्या समानार्थी वापरी. स्टॅलिनने 'आशियाई' हा शब्द त्या अर्थाने कधीही वापरलेला नाही. तो स्वतःला चांगल्या अर्थाने 'आशियाई' समजत असे. १९४१ च्या एप्रिलमध्ये जपान आणि रशिया यांच्यांत अनाक्रमणाचा करार झाला तेव्हा करारावर स्वाक्षरी केल्यानंतर जपानचे मात्सुओका स्टॅलिनला म्हणाले, "या कराराचे आमच्याकडून नीट पालन झाले नाही तर मला आत्महत्या करावी लागेल. कारण मी आशियाई आहे."

"होय, मीही आशियाईच आहे." स्टॅलिनने उत्तर दिले.

स्टॅलिनचे घराणे मूळ शेतकऱ्याचे. (पुढे मार्क्सवादी विचारांचा पगडा बसल्यानंतर त्याने 'मी एका कामगाराचा मुलगा आहे' असा उल्लेख केला असला तरी तो खरा नव्हे.) अपुऱ्या शेतीवर कुटुंबाची उपजीविका करता येणे अशक्य झाल्यामुळे स्टॅलिनचे वडील व्हिसॅरिअन चर्मकाराचा जोडधंदा करीत. स्टॅलिनची आई एकाटेरिना ही तर एका शेतमजुराचीच मुलगी होती. वडिलांच्या आर्थिक हलाखीमुळे स्टॅलिनला लहानपणी दारिद्र्याचा आणि दारिद्र्यापाठोपाठ येणाऱ्या कडवटपणाचा पुरेपूर अनुभव मिळाला. एकाटेरिनाला एकूण चार मुले झाली. स्टॅलिन हे तिचे शेवटचे अपत्य. स्टॅलिनचे तीनही थोरले भाऊ लहानपणीच रोगराईला बळी पडले. स्टॅलिनलाही देवीच्या रोगाने ग्रासले होते. परंतु त्यातून तो वाचला. कुटुंबाचा खर्च चालावा म्हणून एकाटेरिनादेखील मोलमजुरीची कामे करी. व्हिसॅरिअनने स्टॅलिनला वयाच्या सहाव्या वर्षी शाळेत घेतले, प्रारंभीचे धडे जॉर्जियन भाषेत गिर-

विल्यानंतर स्टॅलिनला रशियन भाषेची ओळख झाली. स्टॅलिन अकरा वर्षांचा असताना त्याच्या वडिलांचे निधन झाले व त्यामुळे त्याच्या शिक्षणात खंड पडला. १८९४ मध्ये म्हणजे वयाच्या पंधराव्या वर्षी गोरी येथील प्राथमिक शिक्षण पुरे केल्यानंतर स्टॅलिन टिफलीस येथे राहावयास गेला. टिफलीस येथील शाळा चर्चमार्फत चालविली जात असल्यामुळे तेथे मुख्यतः धार्मिक शिक्षणच दिले जाई. या शाळेतील शिस्तही अतिशय कडक होती. आपल्या मुलाने धर्मोपदेशक व्हावे अशी अडाणी एकाटेरिनाची इच्छा होती व त्यामुळे तिने स्टॅलिनला मुद्दामच या शाळेत दाखल केले. शाळेला जोडून जे वसतिगृह होते तेथेच मुलांनी राहिले पाहिजे असा त्या शाळेचा नियम होता. फक्त रविवारी दुपारी विद्यार्थ्यांना गावात जायची परवानगी मिळत असे. आकाशातील बाप आणि पृथ्वीवरील झार यांच्या आज्ञापालनातच आपले जीवन व्यतीत केले पाहिजे असे शिक्षण देणारी ही शाळा आपले विद्यार्थी फावल्या वेळात काय करतात, काय बोलतात याचा सारखा अंदाज घेत असे. विद्यार्थ्यांवर पाळत ठेवण्यासाठीच काही शिक्षकांची नेमणूक केलेली असे. या धार्मिक शाळेतील काटेकोर नियमांचा जाच असह्य झाल्यामुळेच आपल्या मनात बंडखोरीची प्रवृत्ती उफाळून आली असे स्टॅलिननेच म्हटले आहे. याबाबत त्याचा एमिल लुडविगशी झालेला संवाद ध्यानात घेण्याजोगा आहे.

**लुडविग :** तुमच्या मनात बंडखोरीची प्रवृत्ती कशी काय निर्माण झाली ? तुमच्या अशिक्षित आईवडिलांनी तुमचा लहानपणी छळ केला होता का ?

**स्टॅलिन :** नाही. माझे आईवडील अशिक्षित होते ही गोष्ट खरी असली तरी त्यांनी मला मुळीच वाईट रीतीने वागविले नाही. मी टिफलीस येथील चर्चने चालविलेल्या शाळेत गेलो आणि तेथील साचेबंद वातावरणावर चिडून मी बंडखोर बनलो. या बंडखोरीतूनच मी क्रांतीकडे व मार्क्सवादाकडे वळलो.

**लुडविग :** या धार्मिक शाळेतील शिस्तीमुळे काही फायदा निश्चित होतो असे नाही तुम्हांला वाटत ?

**स्टॅलिन :** हो. एखादे विशिष्ट काम ठराविक पद्धतीने पार पाडण्याची सवय लागणे हा मी अशा शाळेचा मोठाच फायदा मानतो. परंतु त्याचा अतिरेक झाला की या शिस्तीचे दुष्परिणाम घडून येतात. येथील शिक्षक विद्यार्थ्यांवर इतकी करडी नजर ठेवतात की शेवटी ते दडपण असह्य होऊन आपला येथे मानसिक छळ होत आहे असे विद्यार्थ्याला वाटू लागते. यातून काय साध्य होते कुणास ठाऊक ! या असल्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांवर सतत पाळत ठेवण्यात येते. सकाळी नऊची घंटा झाली की आम्ही सर्व विद्यार्थी न्याहरीसाठी भोजनगृहात जात असू. परत येऊन पाहतो तर आमच्या प्रत्येक वस्तूची झडती घेतली असल्याचे आम्हांला आढळून येई.

जॉर्जियातील या धार्मिक शाळांमध्ये रशियन भाषेची आणि संस्कृतीचीच महती गाईली जाई. त्यामुळे जॉर्जियन विद्यार्थ्यांमध्ये नकळत या शाळांविरुद्ध अस-

तोषाची भावना निर्माण होत असे. स्टॅलिनच्या जन्माच्या अगोदर सहा वर्षे म्हणजे १८७३ मध्ये जॉर्जियन राष्ट्रवादाचा प्रचार केल्याबद्दल या शाळेतून अनेक विद्यार्थ्यांची हकालपट्टी करण्यात आलेली होती. १८८५ नंतर तर टिफलीसच्या विद्यार्थी-जगतात राष्ट्रवादाबरोबरच समाजवादी विचारांचे वारेही वाहू लागले होते. सिल्व्हिस्टर जिबाल्ड्झ या तरुण शिक्षकाने स्टॅलिनला मार्क्सवादाची ओळख करून दिली. सिल्व्हिस्टर टिफलीसमध्ये प्रसिद्ध होता. कारण तो याच शाळेत विद्यार्थी असताना एकदा एका शिक्षकाने जॉर्जियन राष्ट्रवादासंबंधी तुच्छतेचे उद्गार काढताच सिल्व्हिस्टर आपल्या जागेवरून उठला आणि त्याने त्या शिक्षकाच्या थोबाडीत मारली. त्याचे हे अनपेक्षित कृत्य पाहताच इतर विद्यार्थ्यांना पराकाष्ठेचा आनंद झाला व त्यांनी टाळ्यांचा गजर करून सिल्व्हिस्टरच्या कृत्यास आपला पाठिंबा असल्याचे दाखवून दिले. या प्रकाराने शाळा चालक इतके चिडले की त्यांनी काही दिवस शाळा बंद ठेवली. केवळ मारपीट करून अस्सल जॉर्जियन माणसाचे कधीच समाधान होत नाही. विरोधकाला जगातून नष्ट केल्याशिवाय जॉर्जियन रक्त स्वस्थ बसत नाही. वर्षभरातच त्या शिक्षकाचा खून झाला. या खून प्रकरणाचे निमित्त साधून पुन्हा आणखी काही विद्यार्थ्यांची हकालपट्टी करण्यात आली. या बंडखोर विद्यार्थ्यांमधून स्वतंत्र जॉर्जियन राष्ट्रवादाचा आणि त्याबरोबरच मार्क्सवादी विचारांचा पुरस्कार करणारा तरुणांचा गट टिफलीसमध्ये आपले अस्तित्व सिद्ध करून देऊ लागला. वयाच्या पंधराव्या वर्षी स्टॅलिन टिफलीसला आला त्या वेळी तेथील प्रक्षुब्ध वातावरणाने त्याच्या मनावर दृढ संस्कार केले. १ सप्टेंबर १८९४ पासून २० जुलै १८९९ पर्यंत स्टॅलिन या शाळेत शिकत होता. परीक्षेत उत्तीर्ण होण्याइतके गुण मिळविण्याची तयारी झाली की पुढल्या अभ्यासाकडे तो दुर्लक्ष करी. शिक्षकांनी सांगूनही त्याच्या अभ्यासात वा वर्तनात सुधारणा होईना, तेव्हा अखेरीस 'तू धर्मोपदेशक होणे कधीही शक्य नाही,' असे सांगून त्याची शाळेतून हकालपट्टी झाली. शाळेतील पद्धतशीर कार्यपद्धती आणि भोवतालचे बंडखोर विचार एवढी शिदोरी घेऊन वयाच्या विसाव्या वर्षी हा जॉर्जियन तरुण आपल्या भावी जीवनाचा विचार करू लागला.

स्टॅलिनने प्रारंभी काही दिवस खाजगी शिकवण्या करून आपल्या उदरनिर्वाहाची सोय केली. कॉकेशियन विभागातील रॉबिनहुड म्हणून ओळखला जाणारा कामो हा तरुणही काही दिवस स्टॅलिनकडे शिकवणीसाठी येत असे. या शिकवण्यांपासून फारशी प्राप्ती होत नसल्यामुळे त्याला काटकसरीने राहण्याची सवय करावी लागली. रशियाचा सर्वसत्ताधीश झाल्यानंतरही स्टॅलिनच्या वागण्यात व वेषात छानछोकी-पणा किंवा नटवेपणा आला नाही. शिकवण्या करून फारशी प्राप्ती होत नाही असे आढळून आल्यानंतर स्टॅलिनने १८९९ च्या डिसेंबरमध्ये टिफलीसच्या वेधशाळेत

नोकरी धरली. रात्रीच्या वेळी ठिकठिकाणच्या हवामानाच्या नोंदी घेण्याचे काम करणारा स्टॅलिन दिवसभर कामगार क्षेत्रांत वावरत असावयाचा.

१ मे १९०१ रोजी पोलिसांचा बंदीहुकूम मोडून टिफलीसमधील कामगारांनी आपल्या मागण्यांच्या घोषणा करीत मिरवणूक काढली. कामगारांना पांगविण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला. या गोळीबारात चौदा कामगार जखमी होताच कामगारांची पांगापांग झाली. गोळीबारापाठोपाठ पोलिसांनी सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या कार्यकर्त्यांची धरपकड सुरू केली. स्टॅलिनला अटक करण्यासाठी पोलिस रात्रीच्या वेळी वेधशाळेत गेले. परंतु तो तेथे आढळला नाही. त्या नोकरीवर तो पुन्हा कधीच हजर झाला नाही. पोलिस आपल्याला पकडणार आहेत याचा सुगावा लागताच तो गोरी येथे गेला व तेथून भूमिगत कार्याची सूत्रे हलवू लागला.

येथपासून स्टॅलिनचे व्यावसायिक क्रांतिकारकाचे जीवन सुरू झाले.

मे दिनाची गडबड आटोपल्यानंतर स्टॅलिन टिफलीसला परतला. उदरनिर्वाहाची सर्व साधने बंद पडल्यामुळे मित्रांच्या मदतीवरच त्याची उपजीविका सुरू होती. टिफलीसमधल्या वर्षभराच्या विसाव्यानंतर पोलिसांना त्याचा सुगावा लागला व ११ एप्रिल १९०२ रोजी त्याची तुरुंगात रवानगी करण्यात आली. बाटुम आणि कुटाईस येथील तुरुंगांमध्ये दीड वर्ष काढल्यानंतर इतर पंधरा कार्यकर्त्यांसमवेत स्टॅलिनला पूर्व सैबेरियात तीन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले. १९०३ च्या नोव्हेंबरमध्ये स्टॅलिनची पूर्व सैबेरियाच्या रोखाने वाटचाल सुरू झाली. कडक थंडीमधील हा प्रदीर्घ आणि त्रासदायक प्रवास पुरा करून तो इर्कुत्स्क प्रांतातील नोव्हायाउदा या एका अगदी लहानशा खेडेगावात येऊन पोचला. तेथे महिना सव्वा महिना काढल्यानंतर ५ जानेवारी १९०४ रोजी स्टॅलिनने तेथून पलायन केले व फेब्रुवारीपासून तो टिफलीस आणि बाटुम या गावांमध्ये कोबा या नावाने वावरू लागला.

१९०४ पासून १९१२ पर्यंतच्या नऊ वर्षांच्या कालखंडामध्ये जॉर्जियातील एक धाडसी पण सामान्य कार्यकर्ता एवढेच स्टॅलिनच्या कार्याचे मर्यादित स्वरूप होते. १९१२ च्या डिसेंबरमध्ये क्रॅको येथे लेनिनच्या निवासस्थानी भरलेल्या बोल्शेव्हिक सेंटरच्या वेळी लेनिनशी त्याचा परिचय झाला आणि त्या वेळी लेनिनने त्याच्यावर 'मार्क्सवाद आणि राष्ट्रीय प्रश्न' हे पुस्तक लिहिण्याचे काम सोपविले. स्टॅलिनच्या मानाने पाहता त्याच्याच वयाचा ट्रॉटस्की स्टॅलिनच्या अगोदर दहा-अकरा वर्षे लेनिनच्या सहवासात आला होता. इतकेच नव्हे तर १९०५ च्या पहिल्या क्रांतीनंतर पीटर्सबर्गमध्ये कामगारांचे पहिले सोव्हिएट स्थापन करण्याची त्याने धडाडीही दाखविली होती. ट्रॉटस्की तेव्हापासूनच वरिष्ठ पातळीवर कार्यकर्ता म्हणून ओळखला जात होता.

**केवळ १९१७ च्या राज्यक्रांतीच्या वेळीच नव्हे तर त्यानंतर लेनिनचा मृत्यू होईपर्यंत लेनिन आणि ट्रॉटस्की ही नावे परस्परांशी निगडित झाली होती. लेनिनच्या**

निधनानंतर ट्रॉटस्कीला परागंदा व्हावे लागले आणि स्टॅलिन रशियाचा हुकूमशाहा झाला. त्यानंतर लेनिन–स्टॅलिन असा नवा द्वंद्वसमास एक करण्यासाठी इतिहासाची काही पाने फाडण्यात आली. काही नव्याने जोडण्यात आली. या नव्याने जोडलेल्या पानांमध्ये १९०४ पासूनच स्टॅलिन बोल्शेव्हिक क्रांतीच्या दृष्टीने किती महत्त्वाची कामगिरी पार पाडीत होता आणि लेनिन त्याच्याकडे तेव्हापासूनच किती आपुलकीने व विश्वासाने पाहत होता याची खमंग वर्णने करण्यात सरकारी इतिहासलेखकांची चढाओढ सुरू झाली. स्टॅलिनच्या मृत्युनंतर त्याच्या वारसदारांनी त्याच्या पातकांचा पाढा वाचण्याचे कार्य सुरू केले तेव्हा कोठे लेनिनच्या हयातीपर्यंत ट्रॉटस्कीच्या तुलनेने स्टॅलिन हा सामान्य कार्यकर्ता होता व ट्रॉटस्कीची वैचारिक झेपही त्याच्याजवळ कधीच नव्हती हे विशद करण्याचे धाडस रशियातील इतिहासलेखक दाखवू लागले. अर्थात आता या प्रचाराने दुसरे टोक गाठले असून क्रांतीच्या आणि तदनंतरच्या इतिहासातून स्टॅलिनचे नावदेखील गाळण्यात आलेले आहे व प्रत्येक चुकीचे खापर सोईस्करपणे स्टॅलिनच्या माथी मारण्यात येत आहे.

१९०४ च्या प्रारंभी सैबेरियामधून परतल्यानंतर स्टॅलिनचा विवाह झाला. त्याच्या त्या काळातील जीवनाप्रमाणे त्याच्या विवाहाचा निश्चित दिवसही कोणालाच माहीत नाही. इतकेच नव्हे तर इरेमाश्विलीसारखा त्याचा जुना मित्र स्टॅलिन १९०३ मध्येच विवाहबद्ध झाला होता असे सांगतो. ही माहिती खरी असेल तर टिफ्लीसच्या तुरुंगात असतानाच स्टॅलिनचा विवाह झाला असे मानावे लागते. त्याचे इतर चरित्रकार याच स्टॅलिनने १९०४ मध्ये सैबेरियातून पळून आल्यानंतर लग्न केले असे सांगतात. ट्रॉटस्की तर खवचटपणाने असे लिहितो–' १९०४ मध्ये स्टॅलिन विवाहबद्ध झाला असावा हीच माहिती मला खरी वाटते. कारण तसे नसते तर १९०४–०५ सालांमध्ये रशियात एवढ्या मोठ्या घडामोडी होत असताना ही स्वारी राजकारणाच्या बाबतीत एवढी उदासीन राहिली नसती. '

आपल्या एका जॉर्जियन मित्राच्या बहिणीची–एकाटेरिना स्वानिड्झ हिची–जीवनसहचारिणी म्हणून स्टॅलिनने निवड केली. एकाटेरिनाने क्रांतिकार्यात कधीच भाग घेतला नाही. साधीसुधी घरगुती वातावरणात वाढलेली, नवऱ्याच्या आज्ञेत राहण्यात धन्यता मानणारी एक सामान्य गृहिणी असेच तिचे वर्णन केले जाते. स्टॅलिनने मार्क्सवादाचा वैचारिक भूमिकेवरून अभ्यास केला नसल्यामुळे शेतकरी कुटुंबातील धार्मिक प्रवृत्तीच्या तरुणीशी विवाह करण्यास तो खुषीने तयार झाला असा शेरा मारण्यासही ट्रॉटस्की विसरलेला नाही. त्याचा हा आरोप खरा असो की खोटा असो, एक गोष्ट मात्र स्पष्ट दिसते ती ही की मध्य रशियातील क्रांतिकारी आंदोलनाचे नेतृत्व ज्याप्रमाणे अभ्यासू आणि बुद्धिमान वर्गाकडे होते तशी बुद्धिमान मंडळी जॉर्जियामधील पक्षसंघटनेत आढळत नव्हती. शिवाय मध्य रशियाच्या मानाने जॉर्जियासारखा पहाडी प्रदेश मागासलेला असल्यामुळे मध्य रशियात आढळणारे

स्त्रीपुरुषांचे मोकळे आणि समान पातळीवरील संबंध जॉर्जियात दिसून येणे सर्वस्वी अशक्य होते. मध्य रशियातील क्रांतिकारक संघटनेमध्ये अनेक तडफदार स्त्रिया जबाबदारीची कामे करीत होत्या. व्हेरा झासुलीच, क्रप्स्काया, रोझा लक्झेंबर्ग किंवा अॅलेक्झांड्रा कोलोनराय यांच्या कर्तृत्वाची एकही स्त्री-कार्यकर्ती जॉर्जियाने निर्माण केलेली नाही. सर्वसामान्य पहाडी रीतिरिवाजांप्रमाणेच जॉर्जियातील स्त्रियाही त्या काळी घराबाहेर पडत नसत.

स्टॅलिनच्या वैवाहिक जीवनासंबंधी इरेमाश्विली लिहितो–' त्याचे वैवाहिक जीवन सुखी होते. स्टॅलिनने नंतरच्या काळात ज्या स्त्रीपुरुष समानतेचा पुरस्कार केला तशी समानता त्याच्या घरात मुळीच आढळत नव्हती. खरे म्हणजे कोणालाही आपल्या बरोबरचा मानणे स्टॅलिनच्या स्वभावातच नव्हते. त्याचे वैवाहिक जीवन सुखी झाले याचे मुख्य कारण असे आहे की, त्याची पत्नी बुद्धीने त्याच्यापेक्षा सुमार होती. आणि आपला नवरा म्हणजे प्रतिपरमेश्वर आहे या भावनेने ती त्याच्याशी वागत होती. जॉर्जियन परंपरेत वाढलेल्या त्या गृहिणीला आपण नवऱ्याची सेवा करायची, तो सांगेल ते ऐकायचे एवढेच काय ते माहीत होते. गृहिणीची ही जबाबदारी एकाटेरिनाने चोख पार पाडली.'

लग्नानंतर बऱ्याच वर्षांनी स्टॅलिनला पुत्रप्राप्ती झाली. १९११ मध्ये स्टॅलिनने जॉर्जिया सोडले. तत्पूर्वीच एकाटेरिनाचे निधन झाले होते. आपल्या मुलाला–जॅकवला–आईजवळ ठेवून स्टॅलिन बाहेर पडला. १९११ पासून १९१९ पर्यंतच्या कालखंडातील या मुलासंबंधी कोणतीही माहिती उपलब्ध नाही. १९१९ मध्ये इरेमाश्विली टिफलीस येथील शाळेत शिक्षक असताना जॅकव जुगाशाव्हिली त्याचा विद्यार्थी होता. जॅकव सामान्य बुद्धीचा विद्यार्थी होता, असे इरेमाश्विली याने म्हटलेले आहे. स्टॅलिन क्रेमलीनचा सूत्रधार झाल्यानंतर त्याने जॅकवला आपल्याजवळ बोलावून घेतले. जॅकवने इंजिनियर व्हावे अशी स्टॅलिनची खूप इच्छा होती. पण जॅकवची अभ्यासात गती नाही असे आढळून आल्यानंतर स्टॅलिन त्याला एकदा चिडून म्हणाला, " तुला इंजिनियर होता येत नसले तर आपला वडिलोपार्जित चांभाराचा धंदा तरी सुरू कर.' वडिलांचा राग पाहून जॅकव क्रेमलिनमधून बाहेर पडला व कॉकेशसमध्ये तो इलेक्ट्रिशियनचे काम करू लागला.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जॅकव लाल सैन्यात दाखल झाला होता असे १ मे १९४५ रोजी न्यूयॉर्क टाईम्समध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीत म्हटले होते. बर्लिनहून आलेल्या बातमीत असे कळविण्यात आले होते की, नुकतीच अमेरिकन सेनेने जर्मनीतील बत्तीस हजार युद्धकैद्यांची सुटका केली असून त्यात रशियाचा प्रधानमंत्री स्टॅलिन याचा जॅकव नावाचा मुलगाही आहे. हा जॅकव १९४१ मध्ये जर्मनांच्या हाती सापडला होता.'

या बातमीसंबंधी रशियन वृत्तपत्रांनी अवाक्षर प्रसिद्ध केले नाही. परंतु ही

बातमी खरी नसल्याचे अँटन सिलिगा या युगोस्लाव्ह कम्युनिस्ट कार्यकर्त्याने लिहून ठेवले आहे. सिलिगाच्या माहितीप्रमाणे जॅकब हा सैन्यात दाखल झाला नव्हता. स्टॅलिन सैबेरियात हद्दपारीची शिक्षा भोगीत असताना तुरूखान्स्क येथील एका शेतकरी स्त्रीशी स्टॅलिनचा संबंध होता व या विवाहबाह्य संबंधापासून स्टॅलिनला एक मुलगाही झाला होता. हा मुलगा सैन्यात दाखल होऊन जर्मनांच्या हाती सापडला, असा सिलिगाचा दावा आहे.

१९१९ मध्ये स्टॅलिनने नाद्या अलिल्युयेव्हाशी दुसरा विवाह केला. या दांपत्याला दोन मुले झाली. व्हॅसिली नावाचा मुलगा आणि स्वेटलाना नावाची मुलगी. एकाटेरिनापासून झालेला जॅकब शेवटपर्यंत जुगाशाव्हिली हे आडनाव लावत असे तर हा दुसरा मुलगा व्हॅसिली जोसेफविच स्टॅलिन या रूबाबदार नावाने ओळखला जात होता.

३० जून १९४५ रोजी 'सॅटरडे इव्हिनिंग पोस्ट'मध्ये लिहिलेल्या लेखात एडगर स्नो म्हणतात–' व्हॅसिलीपेक्षा स्वेटलानावर स्टॅलिनची खास मर्जी आहे. आपल्या घराची सारी व्यवस्था त्याने स्वेटलानाकडे सोपविली आहे. नुकतेच तिचे लग्न झाले असून आता ती नवऱ्याच्या घरी राहावयास गेली आहे. तरीही वारंवार ती क्रेमलिनमध्ये येऊन स्टॅलिनची देखभाल करीत असते.'

एडगर स्नो यांनी ही माहिती प्रसिद्ध केली असली तरी सोव्हिएट वृत्तपत्रांत व्हॅसिलीचे नाव ठळक रीतीने छापले जाई. पण स्वेटलानासंबंधी एक ओळही प्रसिद्ध होत नसे अशी वस्तुस्थिती होती. इतकेच काय पण तिच्या विवाहाची बातमीदेखील प्रसिद्ध करण्यात आलेली नव्हती. तिच्या नवऱ्याचे नावही बरेच दिवस गुप्त ठेवण्यात आले होते.

१९०५ पासून स्टॅलिन बोल्शेव्हिक पक्षाचे काम करू लागल्यामुळे मेन्शेव्हिक गटातील इरेमाश्विलीबरोबरचे त्याचे संबंध दुरावले. स्टॅलिनच्या पहिल्या बायकोचे निधन झाले तेव्हा जुनी मैत्री स्मरून इरेमाश्विली तिच्या अंत्ययात्रेला हजर राहिला. आपल्या 'आठवणी'मध्ये तो लिहितो–' एकाटेरिनाच्या मृत्युमुळे स्टॅलिनला किती दुःख झाले होते हे त्याच्या कोमेजलेल्या चेहऱ्यावरून दिसून येत होते. अंत्ययात्रा दफनभूमीच्या प्रवेशदाराशी आली तेव्हा माझा हात हातात घेऊन एकाटेरिनाच्या शवपेटिकेकडे पाहत **स्टॅलिन म्हणाला, 'मला सुख देण्यासाठी तिची सतत धडपड चालू असायची. ती आता मला सोडून गेली आहे आणि तिच्याबरोबरच माझ्या हृदयातील सर्व कोमल भावनाही माझ्यापासून दूर गेल्या आहेत.' आपल्या छातीवर हात ठेवत तो म्हणाला, 'इथे आता सारे उजाड झाले आहे.' आणि खरेच तसे झाले होते. एकाटेरिनाचे दफन करताना स्टॅलिनने तिच्याबरोबरच मानवी हृदयाला अभिप्रेत असलेल्या सर्व कोमल भावभावनांचेही दफन केले. एकाटेरिनाच्या मृत्युबरोबरच जोसेफ जुगाशाव्हिली या 'माणसा'चाही मृत्यू घडला,**

**आता उरला होता तो स्टॅलिन नावाचा क्रूरकर्मा राजकारणी पुरुष.'**

गृहपाशातून मोकळीक मिळाल्यामुळे स्टॅलिनने पक्षकार्यावर आपले लक्ष केंद्रित केले. १९०५ ते १९०७ या तीन वर्षांच्या कालावधीत त्याने लेनिनच्या लिखाणाचा अभ्यास केला. या सुमारास जॉर्जियातील बरेचसे कार्यकर्ते एकतर मरण पावले किंवा मेन्शेव्हिक गटात सामील झाले. त्यामुळे आपोआपच बोल्शेव्हिक पक्षाचा जॉर्जियातील प्रमुख कार्यकर्ता म्हणून स्टॅलिन ओळखला जाऊ लागला. या काळातच त्याने लेनिनच्या लिखाणाचा जॉर्जियना अनुवाद प्रसिद्ध केला. प्रभावी पक्षसंघटना उभारून तिच्यावर आपली पकड कायम राहील हे लेनिनचे तंत्र स्टॅलिनने याच काळात आत्मसात केले. या पक्षसामर्थ्याच्या बळावरच लेनिनच्या मृत्युनंतर ट्रॉटस्कीसारख्या लेनिनच्या निकटवर्ती सहकाऱ्याला दूर फेकून देऊन स्टॅलिन स्वतःच लेनिनच्या सिंहासनावर जाऊन बसू शकला. अर्थात ट्रॉटस्कीला त्याची ज्यू जातही नडली. सत्ता हस्तगत करण्यासाठी १९०५ व १९१७ मध्ये लेनिनने वापरलेले तंत्र स्टॅलिनइतके दुसऱ्या कोणालाच समजलेही नाही आणि हाताळताही आले नाही.

जॉर्जियातील क्रांतिकारकांचा नेता म्हणून स्टॅलिनची कीर्ती लेनिनच्या कानावर पोचली होती. टिफलीस येथील टपालकचेरीवर छापा घालून अडीच लाख रूबलसची रक्कम पळविणाऱ्या कामोच्या पाठीमागे स्टॅलिनची धाडसी प्रेरणा उभी आहे ही गोष्ट सरकारी गुप्तचरांप्रमाणेच लेनिनलाही माहिती होती. म्हणूनच आपल्या प्रभावळीत स्टॅलिनचा समावेश करण्याचे त्याने ठरविले. टिफलीस प्रकरणाच्या निमित्ताने स्टॅलिनला पुन्हा हद्दपारीची शिक्षा सुनावण्यात आली. १९१२ च्या डिसेंबरमध्ये बोल्शेव्हिक पक्षाची बैठक क्रॅको येथे लेनिनच्या निवासस्थानी भरणार असल्याचे कळताच हद्दपारीला न जुमानता क्रॅको येथील बैठकीला हजर राहण्याचा स्टॅलिनने निर्णय केला. लेनिनचे अनुयायित्व स्वीकारल्याशिवाय आपल्याला पुढचा मार्ग मोकळा होणार नाही हे त्याला पक्के ठाऊक होते. केवळ जॉर्जियापुरतेच आपले कर्तृत्व मर्यादित राहावे ही गोष्ट त्याला सहन होण्यासारखी नव्हती. आणि म्हणूनच झारच्या पोलिसांचा ससेमिरा चुकवीत स्टॅलिन क्रॅको येथे पोचला. लेनिन आणि स्टॅलिन यांची या वेळी प्रदीर्घ चर्चा झाली. जॉर्जियन जनतेच्या मनातील वेगळेपणाची भावना दूर करण्यासाठी स्टॅलिनसारखा त्या भागातील खंबीर कार्यकर्ता आपल्याला खचित उपयोगी पडेल हे जाणून लेनिनने त्याच्याकडे 'मार्क्सिझम अँड दी नॅशनल क्वेश्चन' हे पुस्तक लिहिण्याचे काम सोपविले. स्टॅलिनही नेमक्या अशाच एका कामाची वाट पाहत होता.

१९१३ च्या फेब्रुवारीमध्ये मॅक्झिम गॉर्कीला धाडलेल्या पत्रात स्टॅलिनसंबंधी उल्लेख करताना लेनिनने लिहिले आहे–'मला एक चांगला जॉर्जियन सहकारी लाभला आहे.'

(क्रमशः)




# बोर्ड ऑफ स्पोर्टर्सचे काम काय?

पुणे विद्यापीठातर्फे बॅडमिंटनच्या आंतर–विभागीय स्पर्धा चाळीसगाव येथे ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात झाल्या. पुणे, नाशिक आणि जळगाव अशा तीन विभागांत जे जे महाविद्यालयीन संघ येतात त्यांमधीलच ही लढत असते. पुणे विद्यापीठाचा संघ निवडण्यासाठी या सामन्यांचा उपयोग करण्यात येतो. पुणे विभागाकरिता विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या संघांची यंदा जी निवड करण्यात आली त्याबद्दल १८ ऑगस्टच्या 'विशाल सह्याद्री'त अनीश या टोपण नावाने एक टीका करण्यात आली आहे. त्यातील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत :

(१) वर्तमानपत्रात उपविजयी पदाचे सामने होण्यापूर्वीच ही निवड करण्यात आली. म्हणजे आंतर–महाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धा पूर्ण होण्याआधीच आंतर–विभागीय स्पर्धेकरिता पुणे संघाची निवड झाली.

(२) उत्कृष्ट बॅडमिंटनपटू सत्यपाल रावत यांच्याविरुद्ध शिशिर शिरगावकर व संजय कीर्तने दोघेही हरले. पण शिरगावकर यांनी कीर्तने यांना हरविल्यामुळे शिरगावकर यांचीच निवड पुणे विभागात करावयास हवी होती. पाहावे तो संजय कीर्तने पुणे विभागाचे कर्णधार!

(३) रावत गेल्या वर्षी आंतर–महाविद्यालयीन सामने खेळले नाहीत म्हणून त्यांची निवड पुणे विद्यापीठाकरिता केली गेली नाही. उलट कु. अरुणा मेहेंदळे या यंदा आंतर–महाविद्यालयीन बॅडमिंटन–स्पर्धांत न खेळताही त्यांना पुणे विभागाचे नेतृत्व देण्यात आले!

गेल्या वर्षी सत्यपाल रावत यांच्यावर अन्याय करण्यात आला ही गोष्ट अगदी खरी आहे. आणि ज्या गृहस्थांनी रावत यांना, "तू महाराष्ट्र ज्यूनियर्स स्पर्धा खेळण्यासाठी जा," असे प्रोत्साहन दिले त्याच माणसाने रावत आंतर–महाविद्यालयीन सामने खेळले नाहीत म्हणून त्यांना पुणे विद्यापीठाकडून घेऊ नका असे

मनोहर रेगे

सांगितले ही पण गोष्ट मला माहीत आहे. जो महाराष्ट्राच्या छोटया विभागात सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून चमकतो त्याला विद्यापीठ संघात स्थान मिळत नाही ही अजब गोष्टच म्हटली पाहिजे. पण रावत यांना घेतले नाही म्हणून अरुणा मेहेंदळे यांचीही निवड करू नका हे म्हणणे पटत नाही.संघ उत्कृष्ट खेळाडूंचा बनला पाहिजे. अरुणा मेहेंदळे पुणे विद्यापीठाच्या गेल्या वर्षीच्या संघनायिका. आजारीपणामुळे यंदा आंतर–महाविद्यालयीन सामने त्या खेळल्या नाहीत. तथापि त्या जर फिट् असतील तर त्यांची निवड होण्यास हरकत नसावी. तीच गोष्ट शिरगावकर आणि कीर्तने यांच्यामधली. दोघांत चांगला कोण खेळतो हा महत्त्वाचा मुद्दा आहे. एखाद्या सामन्यात पराजय पत्करला म्हणजेच काही त्याची निवड होऊ नये असे नाही. पण कीर्तने आणि मेहेंदळे यांची कर्णधार म्हणून निवड करण्यात निवड-समितीने काय साधले कळत नाही ! त्याऐवजी रावत आणि कु. रफिया लतिफ यांचीच कर्णधार म्हणून निवड करणे योग्य झाले असते. पण ..

हा 'पण' जरा चमत्कारिक आहे. आंतर-विभागाकरिता जी एक–सदस्य समिती नेमली आहे ते गृहस्थ एम्. ई. एस्. कॉलेजच्या बॅडमिंटन कोर्टावर कधीच फिरकले नाहीत. याचा अर्थ स्पष्ट आहे. विद्यापीठाचा प्राध्यापक–वर्ग अकार्यक्षम आहे आणि त्यामुळे त्रयस्थ लोक त्याचा फायदा घेऊन अशा निवडी करतात. मग शेवटी दोष येतो पुणे विद्यापीठावर ! या सर्व प्रकाराची चौकशी होणे जरूर आहे. 'बोर्ड ऑफ स्पोर्टस्' नावाची पुणे विद्यापीठाची चौ–सदस्य क्रीडा–समिती काय करते कळत नाही !

## जुजबी सत्कार नकोत !

बडोदा येथे राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत अजिंक्य ठरलेल्या महाराष्ट्राच्या महिला खेळाडूंचा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी त्यांच्या 'वर्षा' या निवासस्थानी स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी सत्कार केला व प्रत्येक खेळाडूला या समारंभप्रसंगी छोटीशी भेट म्हणून पातळे देण्यात आली. मुख्यमंत्री श्री. नाईक म्हणाले, "विजयी परंपरा अशीच कायम ठेवून महाराष्ट्राच्या महिला खेळाडूंनी महाराष्ट्राची मान क्रीडा क्षेत्रात उंच ठेवावी." महाराष्ट्र संघाचे नेतृत्व पुण्याच्या कु. जयश्री गोखले यांनी केले होते. इतर संघ पुढीलप्रमाणे होता. कु. कुमुदिनी कोचरेकर (उपकर्णधार), कु. वासंती सातव, कु. लीला फडके, कु. नीलिमा पुसाळकर, कु. चित्रा नाबर, कु. रत्नप्रभा लाड, कु. वत्सला हुमणे व विभावरी दांडेकर (सौ. सहस्रबुद्धे).

या प्रसंगी अखिल भारतीय कबड्डी फेडरेशनचे संयुक्त चिटणीस श्री. शंकरराव साळवी यांनी मुंबईस भरणाऱ्या कबड्डी व खोखो स्पर्धांभोवती दरवर्षी कसे अनि-

श्चिततेचे वातावरण असते याचे विवरण केले. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी "असे वर्षाच्या शेवटी मागणे मांडण्याऐवजी अधूनमधून भेटत चला" असा सबुरीचा सल्ला कबड्डी संघटकांना दिला.

मुख्यमंत्री नाईक यांनी 'अधूनमधून भेटत चला' असे सांगितले असले तरी सतत बारा वर्षे राष्ट्रीय अजिक्यपद मिळविणाऱ्या संघाला आणि त्यांच्या महाराष्ट्र संघटनांना त्यांच्या पराक्रमाचे पारितोषिक म्हणून त्वरित काही रक्कम आर्थिक मदत म्हणून मुख्यमंत्र्यांनी जाहीर करणे जरूर वाटते. दहा ते बारा हजार खर्च दोन स्पर्धांना करताना मुंबईच्या स्पर्धा–चालकांच्या किती नाकीनऊ येतात हे श्री. मुकुंद आंबर्डेकर यांनी एका पत्राद्वारे 'माणूस'च्या वाचकांच्या नजरेस आणलेच आहे. केवळ प्रासंगिक जुजबी सत्कार करून खेळाडूंना खूष करण्यापलीकडे अशा समारंभांतून अधिक काही निष्पन्न होण्यासाठी सरकारतर्फे त्वरित काही पावले उचलली जाणे जरूर आहे. महाराष्ट्रातील प्रमुख शहरी भारतीय खेळांच्या ज्या अधिकृत स्पर्धा वर्षानुवर्षे भरविल्या जातात त्यांचा अहवाल मागवून यंदा त्यांपैकी अंदाजे निम्मी रक्कम तरी सरकारने आपणहून द्यावयास पाहिजे.

महिलांच्या विजयी संघाचे काही प्रदर्शनीय सामने जर सरकारने प्रमुख गावी आयोजित केले तर मुलींत आणि विद्यार्थिनींत भारतीय खेळांविषयी गोडी वाढण्याचा संभव आहे. गेल्या डिसेंबरातील आशियाई स्पर्धेत भारताच्या १०५ खेळाडूंत स्त्रियांची संख्या फक्त ४ होती! भारतीय क्रीडा–स्पर्धेत महिलांचा किती अभाव आहे त्याचे हे विदारक दृश्यच म्हणावे लागेल. सामाजिक आणि कौटुंबिक बंधने (कु. लीला फडके एका मुलाखतीत म्हणतात त्याप्रमाणे) कितीही मानली तरी सरकारने अशा क्रीडास्पर्धांमध्ये अधिक उत्साह दाखविला तर शंकरराव साळवी यांच्यासारख्या अध्वर्यूंना या कार्यात गती आणणे, नवीन नवीन कार्यक्रम हाती घेणे शक्य होईल. पुण्यात या महिनाअखेरीस होणाऱ्या कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्र सरकारने थोडेफार आर्थिक साहाय्य देऊन खेळाडूंचा आणि क्रीडा–शौकिनांचा एक नवा विश्वास स्वतःत निर्माण करावा असे आवाहन या प्रसंगी करणे अगदीच अनुचित ठरणार नाही अशी माझी खात्री आहे. नाईक साहेबांना आणखीही एक विनंती आहे की एखाद्या 'वासंती सातव'ना त्यांनी पुढील वर्षी 'अर्जुन–पदक' मिळवून देण्याचे प्रयत्न करावेत. सबंध महाराष्ट्राच्या भावना त्यांच्या पाठीशी राहतील!

# नवा आदर्श

भारतीय शालेय क्रिकेट संघ इंग्लंडमध्ये असा काही चमकत आहे की त्यामुळे मोठ्या संघाने तिथे भारताची प्रतिष्ठा गमावली हे काही काळ आपण सहज

विसरून जातो. सुरिंदर आणि मोहिंदर अमरनाथ, लक्ष्मणसिंग, दीपंकार सरकार, जसविरसिंग, अजित नाईक, राज मुकर्जी अशी विट्टी बिट्टी पोरे आम्हांला पतौडी, हनुमंतसिंग, बोर्डे आणि मंडळींची आठवणसुद्धा होऊ देत नाहीत. इंग्लंडच्या दौऱ्यात एकदाही पराभव न करता विजयाची, पराक्रमाची आणि विक्रमांची एकसारखी घोडदौड शालेय संघ करीत आहे.

या सर्वांमागे एक फार मोठे करारी आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व उभे आहे. ते म्हणजे हेमू अधिकारी ! सैन्यांतील मेजर या हुद्यावरील ते भारताचे माजी कर्णधार आहेत. भारतीय शालेय संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर जाण्यापूर्वी दिल्लीला त्याला हेमू आधिकारींनी काही दिवस 'कोंडून' ठेवले होते. शालेय खेळाडूंना भेटण्याची किंवा त्यांना बाहेर कुठेही जाण्याची व कुणांत वावरण्याची सक्त बंदी होती. अधिकारींची करडी नजर या विद्यार्थ्यांवर होती. त्यामुळे खेळावर आणि एका विशिष्ट ध्येयावरच त्या मुलांची एकाग्र दृष्टी होती. इंग्लंडच्या दौऱ्यातदेखील व्यवस्थापक हेमू अधिकारी आणि कर्णधार अजित नाईक क्वचित्‌च तोंड उघडतात, मोजके बोलतात आणि कामाला लागतात ! इंग्लंडच्या दौऱ्यात सपाटून मार खाल्ल्यानंतर भारतीय क्रिकेट संघाचे कर्णधार नवाब ऑफ पतौडी यांनी पूर्व आफ्रिकेच्या दौऱ्यावर नेहमीप्रमाणे तोंड उघडले आणि पुढील दौऱ्यात आम्ही चांगला पराक्रम करू असे आगीत तेल ओतणारे उद्‌गार काढले. म्हणजे पराभवाबद्दल नक्राश्रू ढाळावयास पतौडी तयार नाहीत. लंगडया सबबी काढून, त्यांवर पांघरूण घालावयाचे आणि पुन्हा नवा 'आशावाद' निर्माण करावयाचा !

हेमू अधिकारी यांचे म्हणूनच एका कारणासाठी मनःपूर्वक अभिनंदन करावेसे वाटते. भारतीय खेळाडूंना त्यांनी आपले ध्येय काय असावे याची एक नवी दृष्टी दिली. आपले काम खेळण्याचे. अगदी मन लावून खेळण्याचे. त्यांत सर्वस्व पणाला लावावयाचे ! त्यामुळेच शालेय संघ एवढा पराक्रम गाजवू शकला. ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यात भारताचा संघ निवडण्याची जबाबदारी हेमू अधिकारीं सारख्या चार खेळाडूंवर द्यावी. त्यांच्यासारखाच एखादा व्यवस्थापक त्या दौऱ्यावर नेमावा. म्हणजे मग भारतीय खेळाडू कसे चमकतात पाहा !

---

## हनीफ महंमद – फ्रँक वॉरेल

---

हनिफ महंमद यांचा पाकिस्तान क्रिकेट संघ जून महिन्यात इंग्लंडच्या लॉर्ड्‌स क्रीडांगणावर दाखल झाल्यापासून त्यांच्या क्रिकेट खेळात एक प्रकारची सुसूत्र अंमलबजावणी इंग्लिश टीकाकारांना आढळून आली. पहिले सहा सामने पाकिस्तानने अनिर्णित ठेवले आणि टुकुटुकू निर्जीव खेळाची एक

नवीनच प्रथा इंग्लंडच्या भूमीवर प्रस्थापावयास सुरुवात केली. भारताविरुद्ध ८ व ९ जूनला नाबाद २४६ धावा करणाऱ्या जॉफ बॉयकॉट यांनासुद्धा इंग्लंडच्या निवडसमितीने लॉर्डसच्या दुसऱ्या कसोटी सामन्यातून वगळून टाकले. कारण काय तर धीमी अनावश्यक फलंदाजी. मग अशा परिस्थितीत इंग्लंडच्या टीकाकारांना तरी स्वस्थ कसे बसावेसे वाटणार ?

परंतु पाकिस्तानचे कर्णधार हनीफ महंमद यांनी आपल्यावर कातडी बचावू खेळ केल्याचा जो आरोप करण्यात येत आहे तो मूर्खपणाचा आहे, असे सांगून टाकले. बचावपद्धती हे आमच्या राष्ट्राचे धोरणही नाही आणि भारता-पेक्षा चांगले कर्तृत्व दाखविण्याचा आमचा तसा काही हेतूही नाही, असेही सांगून ते मोकळे झाले. आम्ही इंग्लंडला चांगली लढत देऊ आणि सर्व सामने जिकण्याचा सतत प्रयत्न करू, असा हनीफ यांनी आत्मविश्वासही व्यक्त केला.

हनीफ यांच्या ह्या उद्गारानंतर पहिल्या कसोटी सामन्यात त्यांनी धीम्या गजगती खेळाची परिसीमा गाठली आणि स्वतःच्या नाबाद १८७ धावा करण्यास ५४० मिनिटे घेतली ! जिंकण्यापेक्षा न हरणे हेच त्यांच्या राष्ट्राचे नसले तरी संघाचे धोरण दिसते.

१९५२ पासून पाकिस्तान संघ ५० कसोटी सामने खेळला. पैकी हनीफ यांनी त्यातील ४८ कसोटी सामन्यांत भाग घेतला. म्हणजे हनी हे आता जुनेपुराणे खेळाडू झालेले आहेत. नवीन जगाबरोबर ते जावयास तयार नाहीत. त्यांना प्रेक्षकांची चिंता नाही आर्थिक नफ्याची ओढही दिसत नाही. थोडक्यात आपल्या संघाच्या यशापयशाखेरीज त्यांना दुसरे काहीही दिसत नाही.

चंदू बोर्डे यांनी मला सांगितलेली एक गोष्ट या संदर्भात आठवते. १९६२ च्या वेस्ट इंडीज दौऱ्यात जमेकामधील कसोटी सामन्यांतील हा एक प्रसंग आहे. दोन्ही डावांत बोर्डे शून्यावर बाद होत होते. दुसऱ्या डावात पहिली धाव कशीबशी काढताना तर ते धावबादही झाले असते. इतक्यात फ्रँक वॉरेल त्यांच्याकडे आले आणि म्हणाले, "चंदू, लक्षात ठेव. जगातील मोठ-मोठे क्रिकेटपटू दोन्ही डावांत शून्यावर बाद झालेले आहेत. मीही त्यांपैकीच एक आहे. त्यामुळे आपल्या शून्य धावा होत आहेत, याची फिकीर ठेवू नकोस. मनाला आवडणारा स्वच्छंदी खेळ तू खेळ. खेळाचे कॅरेक्टर तू गमावू नकोस."

असे अनेक फ्रँक वॉरेल जरी हनीफना भेटले तरी त्यांच्यात ती सुधारणा होईलसे वाटत नाही. त्या मानाने दुसऱ्या टोकाचा पतौडीच्या नबाबांचा खेळ परवडला म्हणायचा !

# हौसेला बरेच मोल आहे

गुजरात राज्य रायफल संस्थेचे चिटणीस श्री. मनुभाई सुरती यांनी गेल्या महिन्यात टोकियोला झालेल्या पहिल्याच आशियाई नेमबाजी स्पर्धेच्या निमित्ताने भारतीय निवड-पद्धतीवर एक झगझगीत प्रकाश टाकला आहे. २१ ते २३ जुलै-पर्यंत पार पडलेल्या या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व बिकानेरचे महाराज डॉ. करणी सिंग आणि त्यांची चौदा वर्षांची सुकन्या राज्यश्री कुमारी यांनी केले. आणि दोघांचाही बराच खालचा क्रमांक लागला. अहमदाबादला मे महिन्यात नेमबाजीच्या चाचणी स्पर्धेत आवश्यक गुणांपेक्षा राजकुमारी राज्यश्री यांना १४ गुण कमी पडले. उलट इतर स्पर्धकांपैकी शांता विश्वास आणि उद्यन चिनुभाई यांना प्रत्येकी नऊ आणि दहा गुण कमी पडले. ही स्पर्धा हवेत छर्रे उडविण्याची होती. मग कु. राज्यश्री यांचीच निवड का हो झाली ? कदाचित् विश्वास आणि चिनुभाई हे दोघेही चौदा वर्षांचे नसतील !

उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देताना त्यांची लायकी काय आहे हा प्रश्न महत्त्वाचा आहे ! आंतर-राष्ट्रीय क्रीडाक्षेत्रात भारताची निवड करताना वयापेक्षा गुणांना अधिक किंमत द्यावयास हवी ! खेळाडूंचा दर्जा पाहताना अर्थातच वयाचा भाग गौण समजला पाहिजे. जेव्हा अनुभवी खेळाडू चांगले कर्तृत्व दाखवितात, तेव्हा त्यांचीच निवड करणे अपरिहार्य ठरते. पण आमच्याकडचा खाक्या काही निराळाच आहे !

सरकारच्या जाचक बंधनांमुळे आणि मधल्या नफेबाजांमुळे ५०० रु. ची परदेशी बंदूक गिऱ्हाइकाला ५००० रु. च्या घरात पडते. सामान्य माणूस केवळ हौसेखातर हा खर्च करावयास तयार नाही. छर्रे किंवा काडतुसांच्या बाबतीत तीच गोष्ट आहे असे म्हटले तरी चालेल. काही आण्यांची काडतुसे जर काही रुपयांना पडू लागली तर हा छंद करणार कोण ? एखादा माणूस हातात बंदूक घेऊन चिमण्या-ससे मारावयास निघाला तर मला खात्री आहे की दहा-पाच जणं त्याच्यामागे केवळ गंमत म्हणून बंदूक उडवावयास जातील. पण दुर्दैवाने आमच्या भारतात हा शौक गरीबांना परवडणारा नाही. हौसेला मोल नाही असा कितीही उद्घोष आपण केला तरी हौसेला आजकाल बरेच मोल द्यावे लागते.

राष्ट्रीय रायफल संस्थेच्या एकंदर कारभारात आणि स्पर्धा भरविण्याच्या कामात बराच गोंधळ आहे. त्यांनी निवडलेल्या सात नेमबाजपटूंतून सरकारने अंतिम शिक्कामोर्तब केले दोन संस्थानिक पिता-पुत्रींवर ! अशाने हा खेळ सामान्य जन-मानसात रुजणे शक्यच नाही. ०

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ परमेश्वराचा फोटो

साल्वाडोर डाली या प्रसिद्ध पाश्चिमात्त्य अभिनव चित्रकाराने अशी घोषणा केली आहे की, इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या साहाय्याने आपण परमेश्वराचा फोटो काढणार आहोत. कल्पना अक्षरश: गगनाला गवसणी घालणारी आहे यात शंका नाही ! कारण ख्रिस्ती पाश्चिमात्त्यांचा आकाशातला बाप धरतीवर डालीच्या स्टुडिओत उतरला तरच हे शक्य आहे. खरे म्हणजे हिंदूंचा कुठलाही देव ख्रिस्ती देवापेक्षा अधिक 'फोटोजेनिक' आहे यात मला तिळमात्र शंका वाटत नाही. शंकराचा मेक-अप, लक्ष्मीचा नखरा, राम–पंचायतनाचा फॅमिली ग्रुप, विठोबा–रखुमाईचा न्यूली मॅरीड कपलचा थाट, शेषशायी विष्णूची पोज किंवा दिल्लीच्या बिर्ला मंदिरातला तेहतीस कोटी देवांचा कॉन्सेन्ट्रेशन कँप पाहिला की एवढी व्हरायटी डालीला ख्रिस्ती धर्मात कधीच मिळायची नाही याची खात्री वाटते.

जाऊ द्या. डालीने एकदा परमेश्वराचा फोटो काढला की तमाम भगत-गणांचा 'साक्षात्कारा'चा प्रश्न सुटेल एवढे मात्र खरे! मला वाटते, फोटोवर देवाचा ऑटोग्राफ घेतला तर प्रत्येक भक्त मोक्षप्राप्तीचे सर्टिफिकेट म्हणून त्या फोटोचा उपयोग करू शकेल. पण एक गोष्ट मात्र माझ्या लक्षात आली नाही, अन् ती म्हणजे इलेक्ट्रॉनिक उपकरणांची काय आवश्यकता ? खरे म्हणजे देवाचा फोटो एखाद्या शाळकरी मुलाच्या बेबी ब्राऊनीनेदेखील काढता आला नाही तर देवाचं देवपण ते काय राहिलं ? पण तेवढा भरंवसा नसेल तर मात्र परमेश्वराला माझे असे आग्रहाने सांगणे आहे की, त्याने चांगल्यापैकी जर्मन किंवा जपानी कॅमेऱ्याचाच आग्रह धरावा. हो, उगीच ओव्हर–एक्स्पोजर किंवा अंडर–एक्स्पोजरमुळे देवाचा चेहरा अधिक काळसर किंवा अधिक फिकट दिसायला नको. त्यातून परमेश्वर चष्मा लावीत असेल तर त्याने एक्स्पोजर टाइमच्या बाबतीत खूपच काळजी घेण्याची डालीला सक्त ताकीद देऊन ठेवावी. नाही तर फोटोत देवाचे डोळे अक्षरश: पांढरे झालेले दिसायचे. आणि देवा, एक मात्र खास विनंती बरं का,– कॅमेऱ्यासमोर उगीच देव आनंद टाइप हसू ओढून ताणून आणू नका. चेहरा कसा नॅचरली हसरा दिसला पाहिजे. म्हणजे त्याचे काय आहे, फोटो काढून घेण्याच्या बाबतीत तुम्ही आधीच नवखे आहात म्हणून आपली सूचना करून ठेवली.


## □ गुन्हेगार बदके

परवा एक गंमतीदार बातमी वाचली. एका फ्रेंच शेतकऱ्याच्या तीन बदकांनी जवळच्या नदीत नगरपालिकेच्या नियमाविरुद्ध मासे पकडल्यामुळे त्याला दंड करण्यात आला. त्यान कोर्टात बचाव करताना म्हटले की, बदकांना मासेमारीचे नियम माहीत नाहीत– पण त्याचा काही उपयोग झाला नाही. बरोबर आहे ! हल्लीच्या सुशिक्षित जमान्यात सरकारी नियमांची प्रत्येकाला माहिती असणे आवश्यक आहे. त्यातून फ्रेंच बदकांना फ्रेंच भाषेतली पाटी वाचता आली नाही तर ती नामुष्कीचीच गोष्ट नाही का ? की ती बदके या शेतकऱ्याने परदेशाहून आणली होती ? बदके परदेशी असतील तर त्यांना फ्रेंच चालीरीती व नीती–नियम शिकविणे हे तर त्याचे पहिले कर्तव्य होते. आता चुकीची भरपाई म्हणून त्याने या गुन्हेगार बदकांना नोकरीवरुन काढून टाकून आज्ञाधारक कोंबडया पाळाव्यात म्हणजे त्या फ्रेंच उकीरडा फुंकण्यात सुखाने कायदेशीर जीवन घालवतील.

## □ आत्मनिंदेचे एरंडेल

शस्त्रक्रिया करायला घेण्याच्या आधी परमेश्वराची प्रार्थना करणारे पाश्चिमात्य डॉक्टर मला ऐकून माहीत आहेत. पण अशा आणीबाणीच्या वेळी परमेश्वराचा विचार मनात आणावयाच्या ऐवजी 'माओचा विचार' मनात आणणे पेशंटच्या दृष्टीने अधिक हितकारक आहे, असे साम्यवादी चीनमधल्या डॉक्टरमंडळींचे शास्त्रीय मत दिसते; कारण वैद्यक व्यवसायाला वाहिलेल्या एका चिनी मासिकाच्या ताज्या अंकात पहिल्याच पानावर "माओच्या विचारांचे सामर्थ्य" या विषयावर लेख आला आहे. हा लेख वाचनात आला नाही तरी त्यात काय असेल याची कल्पना करता येते : हृदयाचे स्पंदन बंद पडत असेल तर कोरॅमीन देऊ नये–माओच्या विचारांचे इंजेक्शन द्यावे. डोके दुखत असल्यास ते माओ–विरोधी विचारांमुळेच दुखत असणार यांत शंका नाही. टायफॉइड किंवा न्युमोनियाचे जंतू माओ–भक्त असतील तर प्रत्येक माओनिष्ठाने त्यांचे आपल्या शरीरात पालनपोषण केले पाहिजे. दर रविवारी पर्गोलॅक्सची गोळी न घेता आत्मनिंदेचा डोस घेतला म्हणजे शौचास साफ होते. एकंदर प्रकृती चांगली ठेवण्यासाठी नियमित व्यायामाची आवश्यकता आहे– व दर आठवडयाला नियमितपणे पेकिंगमधील एखाद्या परदेशी वकिलातीची मोडतोड किंवा जाळपोळ करण्याइतका दुसरा चांगला व्यायाम नाही......





# पुरुषोत्तम करंडक

पुणे येथे दहा दिवस चालू असलेल्या 'पुरुषोत्तम करंडक' स्पर्धांचा २६ ऑगस्ट रोजी समारोप झाला. त्याप्रसंगी बोलतानां श्री. पाळंदे यांनी मांडलेले काही विचार.

पुरुषोत्तम करंडक आंतर महाविद्यालयीन नाटच-स्पर्धांना यंदा ५ वर्षे पूर्ण झाली. 'महाराष्ट्रीय कलोपासक' या संस्थेच्या वतीने भरविण्यात येत असलेल्या या स्पर्धांना प्रतिवर्षी वाढता प्रतिसाद मिळत आहे. चालू वर्षी स्पर्धेमध्ये पंधरा एकांकिका झाल्या. दररोज दोन या प्रमाणे एक आठवडाभर चाललेल्या या स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ प्राचार्य एन. जी. सुरू यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. या प्रसंगी परीक्षकांचे वतीने बोलताना श्री. वासुदेवराव पाळंदे यांनी अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

लेखनापासून ते प्रत्यक्ष प्रयोग व त्याचे संयोजनापर्यंतच्या सर्व जबाबदाऱ्या

विद्यार्थ्यांनी पार पाडाव्यात, अशी स्पर्धा-आयोजकांची इच्छा आहे. या संदर्भात विद्यार्थी-दिग्दर्शकांनी स्पर्धेमध्ये वाढत्या प्रमाणात येण्याबाबत श्री. पाळंदे यांनी नापसंती व्यक्त केली. त्यांच्या या विचारांशी मी पूर्णपणे सहमत आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कुवतीला निश्चितपणे काही मर्यादा पडतात. दिग्दर्शक हा नाटकाचा मुख्य सूत्रधार या नात्याने परिपूर्ण प्रयोगासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाजूंचे परिपूर्ण ज्ञान त्याला असणे अगत्याचे आहे. अशा परिस्थितीत नाट्यविषयक ज्ञानाचा परिपोष ज्यांच्या बाबतीत व्हावयाचा आहे, अशा कच्च्या मडक्यांच्या हाती नाटकाची सूत्रे सोपवण्यात, विशेषत:, ती त्यांच्या हाती जावीत, असा अट्टाहासाने प्रयत्न करण्यात काय अर्थ आहे ?

विद्यार्थ्यांनी नाटिकेचे दिग्दर्शन करण्यात केवळ प्रयोगाची हानी होते, असे नाही, तर जे नवीन कलावंत या स्पर्धेतून रंगभूमीवर येतात, त्यांचेही त्यांच्या नकळत

## विद्यार्थी आणि दिग्दर्शन !

परंतु निश्चितपणे नुकसान होते. अपरिपक्व व चुकीचे मार्गदर्शन मिळत असूनही नाट्यप्रयोगात भाग घेणारे कलावंत विद्यार्थी-दिग्दर्शकाच्या मार्गदर्शनाखाली त्याच्या आदेशाप्रमाणे भूमिका साकार करतात. परिणामी अंधानुकरण, भूमिकांच्या संदर्भात साचेबंदपणा, संवाद बोलण्यातील अवास्तव नाटकीपणा, कृत्रिम व बेढब हातवारे यांसारखे अनेक दोष विद्यार्थी-कलावंतांमध्ये निर्माण होतात आणि दुर्दैवाने आपल्यामध्ये हे दोष आहेत, याची जाणीवही या विद्यार्थ्यांमध्ये राहत नाही आणि स्वाभाविकपणेच निर्माण झालेले हे दोष पुढील काळातही कायम राहतात.

विद्यार्थी-दिग्दर्शकाच्या प्रश्नाची दुसरी बाजूही गुंतागुंतीची आहे. स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थी-दिग्दर्शकाला पारितोषिक असल्याने बहुतेक महाविद्यालयांनी निदान कार्यक्रम-पत्रिकेवर व आवश्यक त्या प्रवेश-अर्जात कोणातरी विद्यार्थी-दिग्दर्शकाचे नाव ठेवून दिले. प्रत्यक्ष नाटकाच्या तालमींना मात्र दुसऱ्या कोणा अधिकारी व्यक्तीचे मार्गदर्शन झाल्याचे निश्चितपणे जाणवत होते. स्वत:चे नाव नसल्याने अशा एकांकिकांना मार्गदर्शन करण्यास नाट्यक्षेत्रातील व्यक्ती फारशा उत्सुक नसतात. परंतु विद्यार्थ्यांना अजिबात टाळणे शक्य होत नाही. त्यामुळे चार-सहा तालमींना हजर राहून ते प्रथम विद्यार्थी-दिग्दर्शकाची स्वारी घोड्यावर बसवतात. तज्ज्ञांनी सांगितलेले सर्वच उचलण्याची कुवत विद्यार्थी-दिग्दर्शकात नसते, त्यामुळे अशा मार्गदर्शनाचा अनुकूल उपयोग होण्याऐवजी प्रयोगावर त्याचा विपरीत परिणाम होतो. या उलट एखाद्या उत्साही तज्ज्ञाने पडद्यामागे राहून सर्व सूत्रे हलवली तर प्रयोग किती नेटका होतो, याचाही प्रत्यय या वेळी आला.

विद्यार्थी–दिग्दर्शनाचे पारितोषिक घेणाऱ्या श्रीनिवास पानवलकरांचे उदाहरण घ्या. आपल्याला मिळालेली दोन्ही पारितोषिके आपण संपूर्णतया व्यक्तिगत जबाबदारीवर मिळवली आहेत, असा दावा जर ते करतील, तर ते स्वत:शीच प्रतारणा करीत आहेत असे म्हणावे लागेल. उघड उघड स्वत:च्या नावाने ज्यांनी प्रयोग सादर केले, त्या दोन्ही नाटचक्षेत्रांतील दिग्दर्शकांचे प्रयोग निर्विवादपणे अन्य प्रयोगांपेक्षा सरस होते. श्रीराम खरे यांचे 'उतराई' व श्री. मो. वा. केळकर यांच्या 'राधेय' एकांकींचा या संदर्भात उल्लेख करता येईल.

नवीन होतकरू कलावंतांना व प्रसंगी नामवंतांनाही अचूक मार्गदर्शन करणाऱ्या तज्ज्ञ दिग्दर्शकाची नितांत गरज असते. महाविद्यालयीन स्पर्धांतून अनेक कलावंत प्रथमच रंगभूमीवर येतात. अशा वेळी त्यांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणे अत्यंत आवश्यक असते. सुदैवाने हौशी नाटचक्षेत्रातील अनेक तज्ज्ञ मंडळी पुण्यात आहेत. पुरुषोत्तम करंडक स्पर्धांच्या निमित्ताने होणाऱ्या नाटचप्रयोगांना मार्गदर्शन करण्यास ती उत्सुक आहेत.

अशा तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ स्वीकारण्यापासून महाराष्ट्रीय कलोपासक विद्यार्थ्यांना परावृत्त करीत आहे.

खोटया नावाने येणाऱ्या वाढत्या विद्यार्थी–दिग्दर्शकांऐवजी तज्ज्ञांचे सरळ मार्गदर्शन लाभले असते तर अनेक कलावंतांना त्याचा लाभ मिळाला असता. वानगीदाखल खालील कलावंतांचा उल्लेख करतो.

विवेक घाटगे (फर्ग्युसन) – एकांकिका 'सावित्री, मी आलो'. वसंत करमरकर (टिळक आयुर्वेद महाविद्यालय)– 'गुंता'. दिलीप कोल्हटकर (म. ए. सो. महाविद्यालय)– 'काळवेळ'. विद्यार्थी–दिग्दर्शकाच्या हव्यासाला बळी पडलेला कलावंत म्हणून विलास लोणारीचा उल्लेख करावा लागेल. उत्तम मार्गदर्शन लाभते तर 'कथ्थक'मधील त्याची हृषिकेशची भूमिका किती तरी सरस झाली असती. याखेरीज स. प. च्या 'धुकं' मधील संजीवनी गोडबोले यांनाही अचूक मार्गदर्शन अधिक लाभदायक ठरले असते.

या पार्श्वभूमीवर आग्रहाची सूचना करावीशी वाटते की, स्पर्धा संयोजकांनी विद्यार्थी–दिग्दर्शकांना उत्तेजन देण्याचा मुळीच प्रयत्न करू नये. जब्बार पटेल किंवा धनंजय गोळे यांच्यासारखे विद्यार्थी–दिग्दर्शक अपवादात्मक म्हणावे लागतील. दिग्दर्शक म्हणून स्वत:चे खोटे नाव देऊन तज्ज्ञांचा मोडका तोडका आधार घेण्याच्या या वृत्तीला उत्तेजन मिळाले तर, विद्यार्थी–दिग्दर्शकांची संख्या निर्विवादपणे वाढेल. फक्त प्रयोगातील नाटचगुण घटत जाऊन प्रयोगांचा दर्जा प्रतिवर्षी खालावत जाईल.

स्पर्धांचा निकाल जाहीर झाला. अनेक उलट सुलट प्रतिक्रिया यांबावत व्यक्त झाल्या. स्पर्धकांनी या संदर्भात आपापसांत कुजबुजत बसण्यापेक्षा परीक्षकांशी चर्चा

का करू नये ? परीक्षकांची बाजू विद्यार्थ्यांना समजावी व आपल्या प्रयोगांत नेमके काय कमी पडले, याची जाणीव त्यांना करून द्यावी म्हणून या वर्षीपासून परीक्षक व स्पर्धक यांच्या एकत्रित बैठकीची एक योजना अंमलात आणण्यात येणार आहे. उपक्रम निश्चितपणे स्वागतार्ह आहे. परंतु अशा उपक्रमांतून कडवटपणा निर्माण होणार नाही याची दक्षता घेणे अत्यंत अगत्याचे आहे. चालू वर्षाच्या संदर्भात बोलायचे झाले तर दुसऱ्या क्रमांकाच्या सांघिक परितोषिकांबाबत केवळ स्पर्धकांतच नव्हे, तर जाणकारांतही नाराजी आहे.

## प्रेक्षक–परीक्षक वाढते अंतर

वैयक्तिक अभिनय-नैपुण्याचे पारितोषिक मिळवल्याबद्दल मोहन आगाशे यांचेही खुल्या मनाने स्वागत करता येत नाही. त्यांची जमादाराची भूमिका सुरेख झाली. विशेषत:, चेहऱ्यावरील अत्यंत प्रभावी भावदर्शनाचे त्यांचे कौशल्य निर्विवादपणे प्रथम श्रेणीचे होते. तरीही स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट कलावंत म्हणून त्यांचे स्वागत करणे निदान मला तरी जमणार नाही. संजीवनी रानडे, धनंजय गोळे अथवा सुचेता रांगणेकर यांना हा मान मिळणे वास्तव ठरले असते.

या निवेदनात परीक्षकांवर टीका करण्याचा मुळीच उद्देश नाही. परीक्षकांचे निर्णय याच स्पर्धेच्या अंतिम मर्यादा. केवळ स्पर्धकांनी नव्हे तर, प्रेक्षकांनी व इतर संबंधितांनीही त्यांच्या निर्णयाचा स्वीकार केलाच पाहिजे. मात्र असे असूनही अशा स्वरूपाच्या बैठकी नाट्य शिक्षणास महत्त्वपूर्ण मदत करतील यात शंका नाही.

स्पर्धांची सीझन तिकिटे काढणाऱ्या प्रेक्षकांना प्रयोग–पुस्तिकेबरोबर एक अर्ज देण्यात येतो. स्पर्धेतील निर्णयाबाबतचे अंदाज त्यांनी व्यक्त करावेत. परीक्षकांच्या निर्णयाशी त्यांचे अंदाज अचूक जुळल्यास विजयी प्रेक्षकास २५ रुपयांचे पारितोषिक देण्यात येते. या अंदाज-स्पर्धेमध्ये सुमारे १०० प्रेक्षकांनी यंदा भाग घेतला. परंतु या वर्षी व गेल्या वर्षीही हे पारितोषिक देण्याचा योग आला नाही. परीक्षक–प्रेक्षकांतील वाढत्या अंतराचे द्योतक म्हणून या घटनेचा जाता जाता उल्लेख करतो इतकेच !

अभिनयाच्या परिपूर्णतेच्या कसोट्या ठरवताना चेहऱ्यावर भावदर्शन घडवण्याचे कलाकाराचे सामर्थ्य, संवाद बोलण्याची त्याची पद्धत, आवाजावरील त्याचा ताबा व विशिष्ट लय साधून ( Timing ) संवाद बोलण्याची कुवत, या महत्त्वाच्या कसोट्यांबरोबरच कलावंतांचा रंगमंचावरील वावर, अन्य पात्रांना त्यांच्याकडून मिळत असणारा प्रतिसाद, या गोष्टीही महत्त्वपूर्ण आहेत.

काम करणाऱ्या कलावंताचे वय व तो साकार करत असलेल्या व्यक्तिरेखेचे वय नेहमीच मिळते-जुळते असते असे नाही. अशा परिस्थितीत पात्राचे अपेक्षित वय दाखवण्याची कलावंताची ताकद, त्याचा अभिनयाचा दर्जा ठरवताना विचारात घ्यावी लागते.

या कसोटचा विचारात घेऊन व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची कमाल ताकद लक्षात घेऊन यंदाच्या वर्षी पुरुषोत्तम करंडकाच्या निमित्ताने रंगभूमीवर आलेल्या दहा कलावंतांची गुणानुक्रमे निवड पुढीलप्रमाणे करता येईल —

(१) संजीवनी रानडे (२) धनंजय गोळे (३) सुचेता रांगणेकर (४) शरयू गोगटे (५) मोहन आगाशे (६) संजीवनी गोडबोले (७) श्रीनिवास पानवलकर, (८) विक्रम गोखले (९) कल्पना भालेराव (१०) सुभाष जोशी. सांघिक यशाच्या कसोटयांवर— सरहद्द, बारा पस्तीस, उतराई, सावित्री, मी आलो व राधेय असा क्रम लावावासा वाटतो.

सुमारे २०० विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या प्रयत्नांतून फुललेल्या या स्पर्धा संपल्या. स्पर्धेच्या निमित्ताने रंगभूमीवर आलेल्या कलावंतांपैकी वरील काही कलावंत राज्य-नाटय-महोत्सवात पाहावयास मिळावेत एवढी अपेक्षा आहे. अशा कलावंतांना संधी मिळाल्यानेच स्पर्धेचे यश उंचावत जाणार आहे.

**शरद गोखले**

## बिचारे प्रेक्षक

गंभीर प्रवृत्तीच्या नाटय प्रयोगाचे यश बव्हंशी समर्थ कलाकारावर अवलंबून असते. प्रत्येक महाविद्यालयाजवळ असे कलावंत असतातच असे नाही, तरी पण अट्टाहासाने ही मंडळी गंभीर प्रवृत्तीच्या एकांकिका निवडतात. स्वाभाविकपणेच प्रयोग मार खायला लागतो आणि अत्याचार होतो तो गरीब बिचाऱ्या प्रेक्षकांवर. उपस्थितांपैकी बहुसंख्य प्रेक्षक विद्यार्थीच असतात. ' सतरा वर्षे ' ' कथ्थक ' या एकांकिकांचा प्रायोगिक दर्जा अतिसामान्य असूनही थोडाफार अपवाद वगळता विद्यार्थी-प्रेक्षकांनी या प्रयोगांनाही पुरेशी शांतता दिली. एक जुने जाणते नट-दिग्दर्शक श्री. के. नारायण काळे या संदर्भात म्हणाले, " असा प्रेक्षक आम्हांला लाभत नाही. "

□

या वर्षी झालेल्या एकूण नाटिकांपैकी चार प्रयोगांत केवळ दोन पात्रे होती. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी एकही स्त्री कलावंत पाहावयास मिळाला नाही. आणि दोन एकांकिकांमध्ये मिळून केवळ चारच पात्रे रंगभूमीवर-आली. जास्तीत जास्त पात्रे रंगभूमीवर आणण्याचा मान टिळक आयुर्वेद महाविद्यालयाने मिळवला. या मंडळींनी १४ पात्री ' गुंता ' उलगडण्याचा प्रयत्न केला.

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

दि. ९ ते १५ सप्टेंबर ६७ चे भविष्य

श्री. गो. जोशी

सायनाचार्य, नासिक

**मेष :** निष्ठा आणि निर्धार तुमच्या रक्तातच आहे. आणि म्हणूनच अपयशाचा डाग सहसा तुमच्या चारित्र्याला लागू शकत नाही. आणि या तुमच्या साहसी प्रवृत्तीतूनच दिव्यता, लोकोत्तरता तुमच्या जीवनात प्रकटलेली आहे.

या तुमच्या अभिजात गुणप्रवृत्तींना अनुकूल अशी ग्रहरचनाही या वेळी अंतरिक्षात निर्माण झालेली आहे. साडेसातीतही काही चांगले क्षण असू शकतात आणि ते आपण या वेळीच तत्परतेने वेचू शकाल.

या कालापासून व्यावसायिक यश कधी नव्हते एवढे मिळू शकेल. लोकोत्तरता आणि अनन्यसाधारणता याच काली प्रकटेल. तुमचे महत्त्व आणि माहात्म्य या वेळी खूपच वाढू लागेल.

दि. १२ ते १५ चा काल संस्मरणीय ठरावा.

**वृषभ :** सप्तमस्थानच्या मंगळामुळे या वेळी आपल्या जीवनात मधून मधून स्फोट व्हायला लागतील, संघर्षामुळे ठिणग्या उडू लागतील, विचार बधीर आणि बोथट बनू लागतील. पण अशाही परिस्थितीतून आपण निष्कलंक राहाल. स्वास्थ्य हरवल्याची जाणीव पदोपदी होईल. प्रगती रोखली जाते की काय अशी भीतीही मनाला वाटू लागेल. पण सारी अनिष्टता क्षणकालाची.

सूर्याचे कन्या राशीत आगमन घडताच चमत्कार झाल्यामुळे सारे पेचपाच सुटायला लागतील. मार्ग निर्वेध–निष्कंटक बनेल. कौटुंबिक वातावरण गढूळ बनेल, भागीदारांची मने कलुषित बनू

लागतील. विरोधक डोके वर काढतील की काय अशी धास्ती वाटू लागेल. प्रत्यक्षात मात्र असं काही घडणार नाही. दि. १४–१५ पासून परिस्थिती निवळू लागेल.

**मिथुन :** तुमच्या आगळ्या कर्तृत्वाचे जगाला दर्शन घडावे अशीच महत्त्वपूर्ण ग्रहरचना या वेळी अंतरिक्षात घडून येत आहे. सूर्य आणि गुरू – सर्वात मोठे तेजोगोल तुमच्या पराक्रमस्थानातून संचार करणार आहेत. तुमचे महत्त्व सिद्ध करायला एवढे बस्स आहे.

षष्ठांतील मंगळामुळे विरोधकांना ठोकरून काढू शकाल, हितशत्रूंची तोंडे बंद करू शकाल. तुमच्या कर्तृत्वाची झेप एवढी मोठी आहे की, या वेळी तुम्हांला लाभणाऱ्या नेत्रदीपक यशामुळे अनेकांच्या नजरा तुमच्यावर खिळून जातील.

दूरच्या दौऱ्यावर निघावे लागेल, अनेक रेंगाळलेली कामे हातावेगळी कराल. सहसा न मिळणारी प्रतिष्ठा सहजसुलभपणे मिळवून दाखवाल.

दि. १२ ते १४ येथूनच अपेक्षित यश मिळू लागेल.

**कर्क :** चौथ्या मंगळामुळे आजवर न सुटलेले तुमचे प्रगतीचे गणित आता झटपट सुटावे – मंगळाचे राश्यंतर घडलेले आहे. शिवाय धनस्थानी गुरूच्या रूपाने साक्षात परब्रह्म प्रकटले आहे. इतका सर्वांगाने चांगला काल यापूर्वी कित्येक वर्षे आपण अनुभवलेला नसावा. या वेळी समाजाला तुमच्या नेतृत्वाची गरज भासू लागेल. नोकरीधंद्यांतील प्रतिष्ठेचे स्थान केवळ तुमच्यासाठी राखून ठेवले जाईल.

अनेक अडीअडचणींवर आता सहजासहजी मात करू शकाल. ग्रहांनी अनुकूल कौल दिलाच आहे, प्रयत्नांची शिकस्त केलीत तर दिव्य–भव्य घडवून आणू शकाल.

दि. ९ ते ११ येथूनच तुमच्या उत्साहाला उधाण यायला लागेल.

**सिंह :** एक तपाच्या कालावधीनंतर गुरूचे तुमच्या राशीत आगमन घडत आहे. आणि म्हणूनच तो तुमच्या आजवरच्या साऱ्या असफल आशाआकांक्षा पूर्णांशाने सफल करू शकेल. या वेळी तुमचा सामाजिक दर्जा उंचावेल, राजकीय प्रतिष्ठा वाढेल, व्यवसायधंद्यात तर उत्तुंग यश लाभेल.

आगामी महिन्याभराच्या कालातच एखाद्या गटाचे पुढारीपण तुम्हांला स्वीकारावे लागेल, लोकनियुक्त संस्थांमध्ये तुमच्याच गळयांत अध्यक्षपदाची माळ पडेल असे मांगल्याचे क्षण क्वचितच निर्माण होत असतात आणि ते वेचून घेतलेत तर तुमचे माहात्म्य खूपच वाढीस लागेल.

दूरचा प्रवास-स्थानांतर-बदल अशाही घटना घडून याव्यात.

दि. ११ ते १५ या काळात अनंत प्रगत घटना घडाव्यात.

**कन्या :**–सध्या तुमच्या राशीच्या आगेमागे अनेक ग्रहांची गर्दी झालेली असल्यामुळे तुमच्या व्यक्तिमत्त्वावरही त्याचे पडसाद उमटल्याशिवाय राहणार नाहीत.

पराक्रमस्थ मंगळाचाच प्रभाव अधिक पडेल. मंगळाचे नेतृत्व ज्याला लाभले, त्याला सर्व काही लाभले.

या वेळच्या व्ययस्थानातील बहुसंख्य ग्रहांमुळे वाढत्या खर्चाचा ताण थोडाफार सहन करावाही लागेल. पण त्यामुळे काही फारसे बिघडण्यासारखे नाही. याच आठवड्यापासून स्थानांतराचे, प्रवासाचे योग दिसू लागतील, परप्रांतीयांच्या सहकार्याने नवे व्यवसायक्षेत्र उभारले जाईल.

धान्योत्पादन, रासायनिक द्रव्ये, परराष्ट्रीय आयात–निर्यात अशा व्यावसायिकांना हे दिवस निश्चितच प्रगतीचे–लाभाचे ठरावेत.

दि. ११–१३–१५ या काली अनेकांचे सहकार्य लाभेल.

**तूळ :** गुरू एकादशात हवातसा आहे. त्याचे दातृत्व आणि सूर्याचे कर्तृत्व या वेळी पदोपदी आपल्या प्रत्ययास येईल. दर १२ वर्षांनीच अशी ग्रहस्थिती तुमच्या वाट्यास येत असते. समर्थ व अधिकारी व्यक्तींशी तुमचे घनिष्ठ संबंध यायला लागतील. यशस्वी उद्योगपतींचे मार्गदर्शन लाभेल. कला–क्षेत्रांत काही अलौकिक आणि नेत्रदीपक कार्य आपल्या हातून घडेल.

साहित्यिकांना आणि कलावंतांना इतका यशदायी काल यापूर्वी क्वचितच अनुभवण्यास मिळाला असेल.

नोकरीधंद्यात अनपेक्षित लाभ होतील. बिघडलेले संबंध सुधारतील, सांसारिक जीवनात अत्यानंदकारक घटना घडून यायला लागतील.

या वेळी आपण आपली सारी शक्ती आणि बुद्धी पणास लावून कोणत्याही कार्यक्षेत्रात पदार्पण केलेत तर घवघवीत यश निश्चितच मिळवाल.

दि. १२ ते १५ या कालात सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.

**वृश्चिक :** मंगळ तुमच्या राशीतून जात असल्यामुळे, केव्हा केव्हा व्यवसाय-धंद्यात खटकेल. नित्यनैमित्तिक व्यवहारांत झटापटीचेही प्रसंग येतील, पण त्यामुळे काही फारसे बिघडेल असे नाही. उलट या संघर्षामधूनच काही विशेष प्रगतिकारक घटना जन्मास येतील.

वैद्यकीय-संशोधनक्षेत्रांत नेत्रदीपक यशाचे मानकरी व्हाल. नोकरीधंद्यातील नव्या योजना आकार घेऊ लागतील, सांस्कृतिक कार्यक्रमांत आघाडीवर राहण्याचा मान मिळेल.

या साऱ्या गोष्टींबरोबरच मंगळामुळे काही मानसिक व्यथा–विवंचनाही जाणवायला लागतील. जुने विकार बळावतील, औषधी-खर्चही खूप वाढेल, असे या कालाचे संमिश्र स्वरूप जाणवू लागेल.

दि. ११–१३–१४–१५ या काली बऱ्याच अनुकूल व प्रगतिपर गोष्टी घडाव्यात.

**धनू :** भाग्यातील गुरूचे सामर्थ्य अजून तुम्ही अनुभवलेले नसेल. १२ व्या वर्षी तुम्ही कदाचित लहान असाल, आजच्याइतके कार्यक्षेत्रात गढून गेला नसाल. त्या वेळी त्याच्या अफाट सामर्थ्याची तुम्हांला फारशी जाणीवही झाली नसेल.

ही तुमची आणीबाणीची वेळ. मोठ्या बिकट प्रसंगांमधून तुमचे जीवन कसेतरी

आदळत-आपटत जात असेल अशा वेळी भाग्यस्थ गुरूचा मदतीचा हात पुढे होत आहे. आपत्कालातील साहाय्यकर्ता परमेश्वरासारखा वाटतो. ही तुमची वेळ तशीच आहे. त्याचे मांगल्य पदोपदी प्रचीतीला येऊ लागेल. आता हेटाळणी करणारे लोक तुमच्यावर स्तुतिसुमने उधळू लागतील. कधी न होणाऱ्या या घटना घडू लागल्या हाच तुमचा विजय. तुमच्या सत्यनिष्ठेचा आणि निर्धाराचाही.

दि. १२ ते १५ पासून सारे काही अपेक्षेप्रमाणे घडून यायला लागेल.

**मकर :** बुध-हर्षल भाग्यात आणि मंगळ लाभात एवढ्या अनुकूलतेवरही तुमचे ईप्सित साध्य होईल. हर्षल भाग्यात ही तर जीवनात पुन्हा कधी न होणारी घटना. अशा वेळी गुरु–शनी अनुकूल की प्रतिकूल हे पाहायचीही गरज नाही.

या काली जबाबदाऱ्यांचे ओझे खूपच वाढेल, अनंत कामे हातावेगळी करण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल आणि ती सारी कामे यशस्वीही होतील.

मुख्यत्वे सुंदर व मौल्यवान वस्तू, सौंदर्यप्रसाधने, जडजवाहीर अशा व्यवहारात प्रचंड लाभ उठवू शकाल. तुमच्या साऱ्या परिश्रमांचे श्रेय या वेळी पदरी पडावे. नवे करारमदार होतील, व्यवहार-धंद्यात संपन्न भागीदार लाभतील.

दि. ९–१०–११ या काली आश्चर्यकारक चांगल्या घडून येतील.

**कुंभ :** मंगळ दशमात म्हणजे आवाज. या वेळी तुम्ही आपले कार्यक्षेत्र दणाणून सोडाल. माघार घेणे, घोळ घालीत बसणे आता तुम्हांला परवडण्यासारखे नाही.

मानसिक स्वास्थ्य गवसेल, नवे व्यवसायक्षेत्र हाती येईल. अनपेक्षितपणे पैसे हाती खेळू लागतील. निराशा, अस्वस्थता, उदासीनता हे सारे आता विसरू शकता.

प्रवासाचे प्रस्थान ठेवावे लागेल, उद्योगधंद्याचे तंत्र बदलावे लागेल. हिंमत धरून मोठ्या उलाढाली केल्या तर अफाट लाभ पदरी पाडू शकाल. तुमची साडेसाती आता आहे नाही सारखीच.

दि. १२ ते १५ पासून अनेक प्रगत घटना घडाव्यात.

**मीन :** मंगळ भाग्यात आला ना? बस्स झाले! त्याच्यावर विसंबून निर्धास्तपणे कामास लागा. अपेक्षेपेक्षा अधिक यश लाभेल.

या आठवड्यापासून तुम्हांला खूपच धावपळ–धडपड करावी लागणार आहे. पण त्या परिश्रमांचे श्रेय निश्चित पदरी पडेल. बदली–बढतीचे योग दिसू लागतील. भंगलेल्या आशा-आकांक्षा सांधल्या जातील. तुमच्या मार्गात विघ्ने निर्माण करणारांना आता दहा वेळा विचार करावा लागेल.

विरोधक तुमच्या आसपासही फिरकणार नाहीत. अपयश, अवहेलना, अपेक्षाभंग यांचा डाग चुकूनही पडू शकणार नाही. परिश्रम मात्र अहोरात्र करावे लागतील.

दि. १०–१२–१५ या वेळी सर्वत्र अनुकूल वातावरण दिसू लागेल.

O



## पुरंदरच्या बुरुजावरून

# औरंगजेबाचे आयुष्य

### ब. मो. पुरंदरे

औरंगजेब अत्यंत धैर्याचा माणूस होता. तो कोणालाही भीत नसे. शिवाजीमहाराज, राणा राजसिंह, छत्रसाल बुंदेला वगैरे अनेक जबरदस्त शत्रू त्याच्याविरुद्ध उठलेले होते. पण औरंगजेब कधीही डरला नाही, डगमगला नाही. ऐन तरुण वयात तर एकदा बेफाम हत्ती त्याच्या अंगावर चवताळून आला होता. मूर्तिमंत मृत्यूच ! पण औरंगजेब घाबरला नाही. जीव वाचवण्यासाठी पळाला नाही. त्याने उलट त्या हत्तीवरच चाल केली, हत्ती जास्तच खवळला. तरीही औरंगजेब हत्तीवर तुटून पडला. त्याने हत्तीला ठार मारलं. औरंगजेब मरणालाही भीत नसे, पण

तो अतिशय भीत असे स्वतःच्या मुलांना ! आपली पोरं आपल्याविरुद्ध बंड करतील, अशी त्याला सारखी ध्यानी-मनी भीती वाटत असे.

स्वत: औरंगजेबाने आपल्या बापाविरुद्ध बंड केलं होतं, युद्ध केलं होतं. बापाला (शाहजहानला) कैद करून मरेपर्यंत आग्र्याच्या किल्लचात ठेवलं होतं. सगळचा सख्ख्या भावांची विल्हेवाट लावून तो स्वत: बादशाह झाला होता. आपली पोरंही एक दिवस अशीच आपली विल्हेवाट लावतील अशी त्याला सारखी धास्ती वाटत असे; अन् बापाविरुद्ध बंड करणं हा मोंगली घराण्याचा कुळधर्मच होऊन बसला होता. सलीम, शाहजहान आणि स्वत: औरंगजेब यांनी गादी बळकावण्याकरिता बापाविरुद्ध बंड केलं. आता तीच भीती आपल्या पोरांच्या बाबतीत औरंगजेबाला वाटत होती.

—आणि झालंच शेवटी तसं ! औरंगजेबाचा धाकटा मुलगा मुहम्मद अकबर हा बंड करून उठला. या वेळी औरंगजेबाचं वय पासष्ट वर्षांचं होतं म्हणजे तो म्हातारा होता. वय झालं होतं, पण तो थकला नव्हता. प्रचंड उमेदीने तो अकबराविरुद्ध चालून निघाला. शेवटी अकबर महाराष्ट्रात छत्रपती संभाजीमहाराजांच्या आश्रयाला आला. औरंगजेबही अफाट दळबादळ घेऊन महाराष्ट्रावर चालून आला. अकबरालाही नेस्तनाबूद करतो आणि मराठी राज्यही पार बुडवून टाकतो अशा दुहेरी महत्त्वाकांक्षेने हे प्रचंड धरण महाराष्ट्राच्या रोखाने फुटलं. दिल्लीहून निघण्यापूर्वी त्याने आपल्या थोरल्या कन्येला आग्र्याच्या किल्लचात कैदेत ठेवलं. तिचं नाव झेबुन्निसा. ही बंडखोर अकबराला सामील आहे असा औरंगजेबाला संशय होता.

अखेर बंडखोर अकबर अपयशी होऊन इराणला निघून गेला. औरंगजेबाची चिंता इराणपर्यंत दूर गेली. आता तो मराठी राज्य बुडविण्यासाठी ठाण मांडून बसला. वर्षं उलटत होती. त्याचं वय वाढत होतं. वयाची पंचाहत्तरी उलटली होती. तरीही मराठी राज्य काही बुडत नव्हतं. औरंगजेबाची जिद्दही सुटत नव्हती. त्याला खात्री वाटत होती की, आपण हे राज्य नक्की बुडवू. चिंता फक्त एकच होती की, आपली उरलेली तीन पोरं आपल्याविरुद्ध बंड करतील की काय ! अन् जो जो वय वाढत होतं तो तो ही चिंताही वाढत होती. म्हणून तो ह्या पोरांना

वचक दाखविण्यासाठी वारंवार म्हणत असे कीं, परमेश्वराने मला एकशे पंचवीस वर्षांचं आयुष्य दिलं आहे !

आपण सव्वाशे वर्षं जगणार आहोत, हे तो वेळी अवेळी नेहमीच बोलत असे; लिहीत असे.

त्याचे तीनही मुलगे त्याने दक्षिणेत बरोबर आणले होते. पण त्यांना तो कधीही आपल्याजवळ ठेवीत नसे. त्याला भीती वाटे की, ही पोरं मला मारतील. त्याचा कामबक्ष नावाचा मुलगा जिंजीच्या मोहिमेवर होता. वेढा वर्षंन् वर्षं चालू होता. कामबक्ष आपल्या बायका-पोरांसह मराठ्यांच्या जिंजीला वेढा घालून बसला होता. या वेळी औरंगजेबाचा मुक्काम महाराष्ट्रात भीमाकाठी होता. औरंगजेबाला ऐंशीवे वर्ष लागले त्याच वर्षी तिकडे जिंजीला कामबक्षाला मुलगा झाला. छावणीत आनंदी-आनंद उडाला. वाद्यं वाजली, तोफा उडाल्या.

आपल्याला पुत्र झाल्याची ही आनंदाची वार्ता शाहजादा कामबक्षानें ताबडतोब औरंगजेबास कळवली. कामबक्षाने बापाकडे एक पत्र व मिठाई पाठविली.

पत्र आणि मिठाई औरंगजेबास मिळाली. पत्रात कामबक्षाने लिहिलं होतं की, ' मला पुत्र झाला. तुम्हांला नातू झाला. ह्या नातवाचे नाव काय ठेवू ते कळवा. तुम्ही सांगाल तेच नाव ठेवीन. '

औरंगजेबाने कामबक्षाला उत्तर पाठवलं की, ' बेटा कामबक्ष, तुझं पत्र आणि मिठाई पावली ! अतिशय आनंद झाला. नव्या नातवाचं नाव काय ठेवू म्हणून तू विचारलं आहेस, पण बेटा, ह्या मुलाचं नाव तूच ठेव. ह्या मुलाला जो मुलगा होईल त्याचं नाव मी ठेवीन ! '

—म्हणजे इतक्यात मी काही मरत नाही; मी सव्वाशे वर्षं जगणार आहे. दिल्लीची गादी बळकावण्याचा विचार मनात येत असेल तर सोडून दे, असंच औरंगजेबाला आपल्या बेटयास सुनवायचं होतं

या वेळी औरंगजेबाचं वय होतं अवघं ऐंशी वर्षांचं !

## मुक्ताफळे पान ९ वरून

द गॉल धूम पळाले. दौरा रद्द करून पळाले. कारण, त्यांना कॅनडात फ्रेंचांचे स्वतंत्र राज्य हवे आहे. कारण त्यामुळे अमेरिकेची ' खांडं ' होणार आहेत !

कॅनडातील फ्रेंचांनी आपले पाद्री, आपली चर्चेस, आपली भाषा यांचा सतत पाठपुरावा केला, म्हणून ना तिथे ते आज आपले ' खांड ' मागू शकले ? भारतातल्या मुसलमानांना या फ्रेंचांपासून खूपच शिकता येईल. तूर्त त्यांनी " उर्दू भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा द्या—व्हायव्हा उर्दू ! " असा मोठा गिल्ला करावा ! कोणी नाही हो रागवणार ! आधी गिल्ला, मग किल्ला, पाठोपाठ हल्ला आणि शेवटी ' अल्ला हो अकबर. ' उर्दू सलामत तो फाळणी पचास !!

## □ डांबरवाले सबूर !

पुणे तेथे काय उणे ? ९ ' ऑगस्ट 'ला पुण्यात संयुक्त समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते हातात डांबराची डबडी घेऊन धावत सुटले होते. ब्रिटिश साम्राज्यशाहीची प्रतीके ठेवणाऱ्या ' कॅन्टोनमेंट ' बोर्डाचा त्या दिवशी धिक्कार होता. " ९ ऑगस्ट झिंदाबाद " म्हणत हा ५० पुरुष व १५ स्त्रियांचा घोळका ' एल्फिन्स्टनरोड ' या रस्त्यावरील पाटीला डांबर फासायला निघाला होता.

आम्ही म्हणू मंडळी जरा सबूर ! ९ ऑगस्ट का म्हणता ? श्रावण-भाद्रपद का नाही ? वाटेत धाप लागल्यावर कॉफी प्यायला असाल एखाद्या हॉटेलात जाऊन ! कॉफीला प्रतिशब्द नाही का ? आणि हॉटेलात जाण्यापेक्षा ' उपाहारगृहात ' चला असे का नाही म्हणालात ? एल्फिन्स्टन साहेबाचे नाव लिहिलेल्या रस्त्यावरील लाकडी पाट्यांना तुम्ही डांबर लावू शकला तरी मेकॉले साहेबाने आपल्या सगळ्यांच्या तोंडात जे साम्राज्यशाहीचे प्रतीक कायमचे बसवले आहे, त्या प्रत्येक तोंडाला डांबर लावायचे म्हटले तर डांबर किती लागेल ?

ब्रिटिश इथे असताना भाषाशुद्धीची चळवळ करणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांची यथेच्छ निंदा तुम्हीच करीत होता आणि आज अखेर डांबर फासण्याचा निरुपद्रवी सत्याग्रह सुरू केलात ! डांबर फासायला निघालेल्या डॉक्टर आढाव, डॉक्टर कुमठा, ॲडव्होकेट अकोलकर यांनी आपली नावे वैद्य आढाव, वैद्य कुमठा, निर्बंधपंडित अकोलकर अशी छापवून येतील, असा आग्रह का धरला नाही ! जाता जाता निदान पाच पन्नास इंग्रजी शब्द हटवून सावरकर गेले—म्हणून तुम्हांला महापौर, नगरपालिका, दिनांक, दिग्दर्शक, छायाचित्रकार, संकलक, जुळारी, टंकलेखक, हे शब्द आज खटकत नाहीत. तुम्ही निदान आपल्या नावातून तरी शुद्धी सुरू करा !

—ग्यानबा

O

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H–649

“ सारे जग श्वास रोखून बसेल ”

असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या
झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर